विज्ञान जगताचा फेरफटका

सेंट पीटर कॅथड्रलवर शामराव वाटवे

लेखक

शाम वाटवे

लेखक-प्रकाशक
एम्. एस्. वाटवे
(शाम वाटवे)
जमखंडी.

मुखपृष्ठ कव्हर फोटोचे वर्णन

माझ्या प्रवासाचा शेवटचा टप्पा रोम. रोम नगरांतील पोप नगरींत असतां 'सेंट पीटर' जगप्रसिद्ध कॅथड्रल पाहिले. त्या कॅथड्रलवरील शिखरासमोर उभे राहून फोटो काढून घेण्याचा यात्रिकांचा जणू एक प्रघातच आहे. मी तेथें उभे राहून एक फोटो काढून घेतला.

मुद्रक:-
श्री. पोंक्षे बंधू
हनुमान प्रिंटिंग प्रेस
जमखंडी.

* समर्पण *

ज्या ज्या सन्मित्रांनीं मला प्रेरणा, उत्तेजन व आशिर्वाद, दिला व जी मंडळी माझ्या परदेश प्रवासाला व तदनंतरच्या माझ्या या प्रकाशनाला कारणीभूत झाली त्या माझ्या सन्मित्रांना हे स्नेहपुष्प समर्पण.

शाम वाटवे

(एम्. एस्. वाटवे)

- दोन शब्द -

माझ्या पुस्तकाचा बराचसा मजकूर २-२॥ वर्षांपूर्वीच छापून तयार झाला व तो क्रमशः नवहिंदमधून प्रकाशित झाला. तरी त्याचे पुस्तकांत रूपांतर व्हायला एवढा काळ लागला. अनेक अडचणी निर्माण झाल्या; पुढे माझ्याकडून त्याकडे दुर्लक्ष होऊन पुस्तक पूर्ण होण्यास विलंब झाला. तरी पण विलंबाने का होईना हे प्रवास वर्णनपर पुस्तक आतां प्रकाशित होत आहे याबाबत मला व माझ्या सहकाऱ्यांना अत्यंत आनंद होत आहे.

तसे पाहिले तर हे प्रवास वर्णनपर पुस्तक आहे काय? असा प्रश्न वाचकासमोर पडण्याचा संभव आहे. कारण वर्णनपर उतारे तसे फार कमी व वर्णन लिहण्यांत मी तसा प्रतिथयश लेखकही नव्हे. माझी प्रवासांतील दिनचरी मी त्या त्या दिवशीच्या रात्री झोपायच्या आधी लिहली. अर्थात त्या डायरीमध्यें कांहीं घटना व घटनावर्णनें आली व त्याचबरोबर कांहीं लहानमोठी वर्णने आलेली आहेत. त्याच डायरीचे प्रकाशन जणू या पुस्तकांत झालेले आहे. प्रत्यक्ष देश पाहिल्यावर वस्तू पाहिल्यावर व त्या त्या देशांतील लोक त्यांच्या रीती, त्यांचे उद्योग पाहिल्याबरोबर माझ्या मनावर जे जे कांहीं उमटले ते त्या त्या दिवशी जसेच्या तसे टिपलेले या वर्णनांत आढळेल.

माझ्या कांहीं मित्रांनीं माझी ही डायरी वाचली व मला सूचना दिली कीं पुस्तक रूपाने हे प्रसिद्ध व्हायचे असल्यास त्यांत खूप फरक करायला हवा वगैरे, वगैरे. त्याला मी उत्तर दिले, " मी माझी प्रवासाची बिबे जसीच्या तशी त्या त्या वेळीं रेखाटली

आहेत. त्यात बदल करायचा म्हणजे माझ्या मनांत निर्माण झालेल्या भावांतच बदल करावा असे होईल. त्याकरिता या लिखाणाला पुस्तकाचें रूप येवो न येवो मी जसेच्या तसेच प्रकट करणार आहे ". माझे हे लिखाण सध्या पुस्तकरूपाने विकावे हाही यांत उद्देश नसल्यानें माझ्या मनांतील पटले माझ्या सन्मित्रापुढे ठेवण्यासाठीं हे लिखाण आहे तसेच या खेपेस प्रसिद्ध करावे अशी माझी अुत्कट इच्छा. म्हणूनच हे सारे मी सर्वप्रथम लिहिले तसेच वाचकांसमोर ठेवलेले आहे.

अर्थात विकावू पुस्तक म्हणून प्रकाशन करायचा योगच जर आला तर मग त्या विचारांत व वर्णनांत कसा कसा बदल करण्यांत यावा याचा विचार करायला येईल. सध्या ही कांहीं डायरीची पानें माझ्या मित्रांना, चाहत्यांना माझी भेट म्हणून समर्पण करता यावीत याच अेक अुद्देशानें प्रकाशित केलेली असल्यानें या विचारांचे हे खाजगी वितरण आहे असेच मला वाटते.

" आंखो देखा हाल " प्रमाणें या लिखाणाची शैली आहे. माझ्या वाचकांना अशी विनंती आहे कीं त्यानी ही पानें वाचायला घ्यायच्यावेळीं स्वतःच प्रवासाला निघाले असल्याची कल्पना करून वाचायला सुरवात करावी तरच त्यांतील नाविन्य, व भावनांचे गूढ उमगेल. परदेश प्रवासाची जी वर्णनें लिहिली गेली आहेत ती लिहिणारी सरकारी खर्चाने मोठ्या इतमानाने गेलेली मंडळी, मी अेक सामान्य स्वयंसेवक म्हणून गेलेला मनुष्य माझ्या. प्रवासांतील कांहीं काळ मी भारतीय स्वयंसेवक संघटनांचा प्रतिनिधी स्वयंसेवक म्हणून होतो. व पुढे अेक सामान्य भारतीय प्रवासी म्हणून प्रवास केला. भारतीय प्रतिनिधी म्हणून युगोस्लाव्ह

देशांत जोपर्यंत होतो तोपर्यंत तेथील सोयी, वातावरण, माझे तेथील स्थानमान वेगळे होते. शिवाय त्या काळांत मी २००-२५० परदेशी मित्रांत मिसळून गेलेलो होतो. युगोस्लाव्ह देश सोडला नि मी माझ्या स्वतःच्या प्रवासाच्या छंदाच्या पूर्ततेसाठीं अेकलकोंडा भारतीय प्रवासी म्हणून प्रवास करू लागलो. हे दोन्ही फरक माझ्या लिखाणांतून स्वच्छ प्रकट झालेले आहेत. प्रथमार्धांत मी स्वयंसेवक प्रतिनिधी आहे तर अुत्तरार्धांत मी प्रवासी म्हणून फिरलो आहे.

स्वखर्चाने भारतीय प्रतिनिधित्व करण्याचा मला योग आला ते मी अत्यंत यशस्वीपणे केले आहे हे लिहण्यांत मला अभिमान वाटतो. त्याचप्रमाणें अेक भारतीय प्रवासी म्हणून युरोपीय देश पाहून सहीसलामत मी परत आलो यांतही मला आनंद आहे. अनेक भारतीय प्रवासासाठीं किंवा शिक्षणासाठीं म्हणून परदेशांत गेले ते त्यांचे कांहींतरीच झाले किंवा त्यांनी परत येतांना नाहीं त्या त्या बला, व्यसनें स्वतःबरोबर आणली व आपण परदेशाला जाऊन आल्याचाच जणू निर्वाळा लोकांना दिला. पण मी मात्र तसे कांहींच करू शकलो नाही. अेक भारतीय म्हणूनच परदेशांत गेलो व अेक अत्यंत साधा भारतीय म्हणूनच परत आलो. माझ्या कांहीं मित्रांनीं याबाबत मला प्रश्नही विचारले अर्थात ते चेष्टेनें. मीही त्यांना चेष्टेनेच अुत्तर दिले, "तिर्थरूप गंगाभागीरथी ताजमहल पाहायला गेली व परत आली" असेच ना आपले म्हणणे ? खूप हंशा पिकला व माझ्या मित्रांचे अेकदा समाधान झाले.

मला प्रवास करायची प्रेरणा देणारी माझी अनेक मित्र-मंडळी आहेत. त्यांनी मला प्रेरणा, व सहानुभूती दिली नसती तर मी परदेशाला गेलोच नसतो. अ. भा. सेवादलांतील माझे

स्नेही, माझे सन्मित्र संघांतील स्नेही, कर्नाटकांतील सेवादलांतील माझे स्नेही, व मुंबईतील माझी मित्रमंडळी, जमखंडीतील व बाहेरील माझी मित्रमंडळी यांच्या आशिर्वादानें माझा प्रवास होऊ शकला याचा मी अत्यंत ऋणी आहे. हे पुस्तक पूर्ण करून त्या ऋणांतून थोडेतरी अुतराई होईन असे मी माझे मित्र कै. ना. द. जोशीना म्हटले होते. आज या वेळीं ते आमच्यांत नाहींत याचे मला फार वाईट वाटते.

नवहिंदचे मालक पोंक्षे बंधू व कायालियाची मंडळी यांचे अुपकार मी कसे फेडावे ? यांनाही मी कधींच विसरू शकणार नाहीं. या पुस्तक प्रकाशन कार्यांत आणखीही अनेकानीं मला मदत केली आहे त्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

जमखंडी
ता. ८-२-६६

शाम वाटवे
(एम्. एस्. वाटवे)

विज्ञान जगताचा फेरफटका

ही खुळचट कल्पना डोक्यांत शिरली केव्हां ?

बेंगळूरला ६५ व्या कां. अधिवेशनाचे कामासाठीं गेलो असतां माझे अेक जूने सहकारी श्री. एस्. एन्. सुब्बराव यांची व माझी नेहमीं बोलणीं व गप्पा होत असत. नुकतेच ते अेका युवकसम्मेलनासाठीं मास्कोला गेले होते व येताना कांहीं युरोपीय देश फिरून आलेले होते. सहज अेकदा ते म्हणाले कीं शामराव सेवा दलाचें प्रतिनिधित्व करायला परदेशी जाल काय? मला तेंव्हां ती कल्पना जरा विचित्रच वाटली. तरी पण 'आलिया भोगासी' तयार असण्याचा माझा स्वभावच असल्याने मी लगेच त्यांना होकार दिला. ते म्हणाले सेवादल आम्हांला केवळ प्रतिनिधित्व तेवढेच देईल व जाण्यायेण्याच्या खर्चाची आम्हीच व्यवस्था करायला हवी. येवढ्यावरच आमचें बोलणें त्यावेळीं थांबले व आम्ही आमच्या कामाला लागलो.

पुढें अेकदां बेगळूरमध्येंच माझे अेक सहकारी श्री. ठाकूरभाई शहा यांचे बरोबर परदेश गमनाबद्दल चर्चा निघाली २-३ दिवसांच्या सम्मेलनाला जाणें बरें कां अेखाद्या १ महिना १॥ महिन्याच्या शिबिराला जाणें बरें याचा आम्ही विचार करून अेखाद्या शिबिरासाठीं गेल्यास परदेशांत रहायला मिळते व पैसा खर्च केल्याचें सार्थक होतें असा आम्ही दोघानीं मिळून विचार केला.

मला अ. भा. सेवादलाकडून माझ्या परदेशगमनाचे इच्छे बद्दल विचारण्यात आले होते, त्यावेळी मी अेखाद्या शिबिरासाठीं जाईन असे कळवले होतें. ही गोष्ट १९५९ डिसेंबरमधील. पुढे आमचेपुढे हा विचारच आला नाहीं व जानेवारी १९६० मध्यें कॉंग्रेसचे. अधिवेशन झाले त्यांत मी स्वयंसेवकदलाचा शिबिराधिपति म्हणून काम केले. माझ्या कामाची खूप प्रशंसा झाली.

पुढे ४ अेक महिन्यांनी म्हैसूर प्रदेश कॉंग्रेस कमेटीकडून मी म्हैसूर प्रदेशामधील सेवादल-संघटनाचे संयोजक म्हणून काम करावे अशी विचारणा करण्यांत आली. मी अेक प्रापंचिक मनुष्य असल्यानें मला सेवादलासाठीं पूर्ण वेळ देऊन काम करणें शक्य नव्हते म्हणून मी माझ्या कांहीं अटी त्यांचेपुढें ठेवल्या. मी जमखंडीस राहूनच दलाचे काम पहाणार. प्रत्येक महिन्यात फार तर ७-८ दिवस बेंगळूरला जाऊन ऑफिसचे वगैरे काम करणार वगैरे वगैरे. कॉंग्रेस कमेटीने माझ्या सर्व अटी मान्य केल्या व माझी ऑनररी संयोजक म्हणून निवड केली तेंव्हापासून परत माझा म्हैसूर सेवादलाशी व अ. भा. सेवादलाशी संबंध सुरू झाला.

मधून मधून कधीकाळी परदेश गमनाचा विचार डोक्यांत येई तेंव्हा पैशाची व्यवस्था कशी करायची हाच विचार डोक्यांत येई व २००० रु. धंद्यातून अथवा व्यक्तीगत पैशातून घ्यावे व जाऊन यावे असे वाटे. हा विचार मी दुसऱ्याशी बोललो असेल तर तो चेष्टेनें फक्त माझ्या धर्मपत्नीबरोबरच. सहजच निघालेला विचार असलेनें "जा पाहिजे तर" असे ती मला अुत्तर देई व तो विचार तेथेच थांबे.

आमची घराची परिस्थिती बेताचीच. माझे थोरले दोन्ही भाऊ पदवीधर व्हायच्या वेळीं माझे वडील अकाली मरण पावले. त्यावेळीं मी इंग्रजी ६ वी त होतो. पुढील वर्षीच मी मॅट्रिक झालो व माझ्या शिक्षणाचा प्रश्न पुढे आला. भावांना खर्चाचा भुर्दंड नको म्हणून मी १ वर्षाचा कॉमर्सचा कोर्स घेऊन दुसरेच वर्षी चटकन नोकरी करायचे ठरवले व कॉमर्स कोर्ससाठीं १९४१ सालीं पुण्यास आलो. आम्हीं सन्मित्र संघाचे लोक पुरोगामी असल्यानें पुण्यास गेल्यावर माझे मित्र शामराव यादवाडकर यांचे बरोबर पुण्यास नुकत्याच निघालेल्या राष्ट्रसेवादलांत आम्ही स्वयंसेवक म्हणून दाखल झालो व त्यावेळी कॉंग्रेसच्या राजकीय चळवळीत भाग घेऊ लागलो. पुण्यास राजकीय ज्ञानही

भरपूर मिळाले व कार्य करायला वावही तितकाच मिळाला. त्यामुळें मी माझी आर्थिक परिस्थिती विसरून गेलो व परीक्षा पास झाल्या वर नोकरीच्या मागे न लागता १९४२ च्या 'चलेजाव' ठराव झाला त्या A I. C. C ला मुंबईला स्वयंसेवक म्हणून गेलो. पुढे भूमीगत कार्यांत पदार्पण केलें. महाडचा मोर्चा केला, परत पुण्याला आलो. पुण्याहून परत भूमीगत कार्यासाठीं जुन्नरला गेलो. तेथे खेड मध्यें अचानक पडकला गेलो व १ वर्ष येरवडयाची हवा खायला मिळाली. येरवडयाला गेल्यानंतर माझे सर्व जीवनच बदलून गेले व नोकरी करावी वगैरे वगैरे माझे विचार कसे काय नाहीसे झाले कळले नाहीं. जेलमध्यें असतानाच पुढील कार्याचे मोठे मोठे मनोरे बांधले. नोकरी व प्रपंचाकडे लक्ष न देता राष्ट्रीय कार्याला लागायचे वगैरे विचार मनावर बिंबले.

कर्नाटकांतील सेवादलाचा घनिष्ट संबंध आला गुलहोसूर गोकाक, लक्ष्मेश्वर, मोसूर व कार्कष्ठ शिबिराचा शिबिराधिपति म्हणून काम केले.

१९४८ सालीं जयपूर अधिवेशनाला अेक पथक घेऊन गेलो. मी कर्नाटकाचा दलपति झालो. १९४९ पर्यंत काम केले. बागलकोटास राजेन्द्रप्रसादांचे अध्यक्षतेखालो दलाची रॅली केली. १२०० स्वयसेवक स्वखर्चानें आले होते. पुढे निवडणुकांचे वेळी क. प्र. कॉं. मध्यें व मजमध्यें वांधे आले व दलपतित्व सोडले. जमखंडीस आलो व धंदा करायचे ठरविले.

१९४९ सालीं स. ग. ट्रे. कॉं. मध्यें पार्ट टाईम हिंदी शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. आठवडयांत फक्त ५-६ तास काम त्यामुळें रेडिओ दुरस्ती, व्यापार लाअुडस्पीकर सर्व करता आले. प्रापंचिक मनुष्याचे पोट भरूं लागले. पोटाची व्यवस्था झाली. जीवन स्थिर झालें. तोपर्यंत पुणें युनिव्हर्सिटी निघाली व तिनें External studentship सुरू केली शिक्षणाची माझी अपुरी तहान जागृत

झालीं व बाळ रानडे व भास्कर जोगळेकर यांचे सहाय्यानें F. Y. Arts ला नांव लावलें. Int. Arts व B. A. with Hindi Hon. 1957 ला पास झालो.

असा हा जीवनक्रम असल्यानें परदेश गमनाची कल्पना जरा विचित्र, विलक्षण व भयंकर खर्चाची मला जरी वाटली तरी ती अशक्य कांहीं नाहीं असाच माझा ग्रह झाला व परदेश गमनाचा हा जो योग मला मिळणार आहे तो हातचा सोडायचा नाहीं असा मी मनाचा निर्धार केला.

अ. भा. कॉंग्रेस सेवादल कचेरीबरोबर पत्रव्यवहार सुरू केला व माझ्या कामाची पूर्ण माहिती व सूचना वगैरें सर्व प्राप्त करून घेतल्या. माझे बंधू, आप्त व कांहीं स्नेही यांना पत्रानें माझा गुप्त निर्णय कळवला व त्यांचेकडून सम्मती मिळाली.

योजनेचीं चक्रें फिरूं लागलीं व माझ्या रोजच्या व्यवहारा-बरोबरच परदेश प्रवासाची तयारी हा माझा रोजचा उद्योग झाला. पासपोर्टसाठीं अर्ज, प्रवासाची वाहन - व्यवस्था याची खटपट सुरू झाली. प्रथम बोटीनें जाण्याची खटपट केली कारण हा प्रवास सोयीचा व मनोरंजक असतो पण माझें नशीब बोटीच्या प्रवासाचें नव्हतें व मला बोटीचें तिकीट मिळूं शकलें नाहीं व नाइलाजानें विमानाचें तिकीट खरेदी करायचें ठरलें. अर्थातच यामुळें माझा खर्चाचा अंदाज वाढूं लागला व Bombay London Return Round Tour तिकिटाची किंमतच ३२८९ रु. झाली. हा आंकडा ऐकतांच मन जरा बिचकलें पण एकदां परदेश गमनाचा विचार तो आतां १०००-१२०० रुपयासाठीं काय म्हणून मोडायचा असा विचार आला, शिवाय या महागाईच्या तिकिटानें मी युरोप खंडांतील सर्व मोठमोठ्या शहरांना भेटीं देणार असल्यानें मला याचा एक अनमोल आनंद वाटूं लागला व येईल तो खर्च करायचा व त्याची कशीतरी व्यवस्था करावी असे मीं ठरवले. एकूण खर्चाच्या अंदाजाचा आंकडा ५००० वर गेला.

ज्यावेळीं मी माझ्या मनोनिर्धाराचें प्रकटीकरण माझ्या कांहीं स्नेह्यापुढें केले त्यावेळीं कांहींनीं मला माझ्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. कांहींनीं माझें कौतुक करून माझा उत्साह दुप्पट केला तर कांहींनीं "शामराव तुम्ही फार मोठे धाडस करतां आहां" एवढेंच म्हटलें. अशा या रंगीबेरंगी प्रतिक्रियेनें परदेश प्रवासाचे माझें कुतुहल आणखी वाढलें व मी जायचे दिवस मोजूं लागलो.

युगोस्लोव्हियांत शिबिरासाठीं अंदाजे २५ दिवस व नंतर युरोपच्या प्रवासासाठीं दीड महिना असा मी आराखडा तयार केला. माझा निर्णय पक्का केला त्यावेळीं शाम यादवाडकर आदि माझे कांहीं स्नेही मला भेटले व त्यानीं माझ्या प्रवासखर्चाचा भार थोड्या प्रमाणांत हलका केला. कांहीं सप्रेम भेंट देण्याची त्यांनी आपली इच्छा प्रकट केली. मित्रांकडून मिळणारी भेट म्हणजे बहुमोल आशिर्वादच असें मी मानलें व या विनंतीचा स्वीकार केला. निघायचे आदले दिवशीं माझ्या स्नेह्यांकडून मला निरोप समारंभ झाला व सप्रेम भेंट म्हणून मला ११०१ रु. मिळाले. तो सोहाळा हा माझ्या आयुष्यांतील कधीही न विसरणारा प्रसंग असे मी मानतो. गांवांतही मला अनेक संस्थांनीं व व्यक्तींनीं निरोप दिला व २-७-६१ रोजीं एकदाचा मी माझ्या परदेश प्रवासासाठीं निघालो.

२: इस्तंबूल

युरोप प्रवासाचा आराखडा तयार केला तेंव्हाच इस्तंबूलला भेट देऊन ती नगरी व आसपासच्या धर्मयुद्धाचा विभाग असे सर्व पहायचे ठरवलेच होतें. वाहनांच्या व्यवस्था आड आल्यानें ह्या नगरांतील मुक्काम २ दिवसा ऐवजी १ दिवस झाला.

ता. ४-७-६१ रोजीं मुंबईहून निघालेले विमान कैरोला वेळेवर पोंहोचले असले तरी कैरो इस्तंबूल विमान ३ तास उशीरा निघाले

त्यामुळें तेथें रहायचा वेळ आणखी कमीच झाला. तेथें ओळख देखील नाही. युथ हॉस्टेल नाही त्यामुळे 'प्लाझा' नांवाच्या सर्व साधारण पण दिवसाला ३० तीस म्हणजे अंदाजे १७-१८ रु. केवळ राहणेंभाडे घेणाऱ्या खानावळीत रहावे लागले. इकडील मांसाहारी जेवण जेवणें अशक्य असल्याने फलाहारासाठीं, टॅक्सीसाठीं वगैरे खर्च करावा लागला तो वेगळाच. दुसरी गोष्ट म्हणजे येथून अथेन्सला निघणारे विमान ता. ६-७-६१ लाच असल्यानें कर्यक्रम १ वेळेतच आटपावा लागला. धर्मभूमीचा हिस्सा पहावयाला वेळच मिळाला नाही नगर मात्र ५-६ तास अेक सारखें पायी फिरून पाहून घेतले. नगराची ठेवणमात्र अजब, मी कधी पाहिली नसलेली अशी आहे. अमोर समोर दोन मोठ्या टेकड्या (ज्यांच्यामध्यें नदीचेमुख, जलप्रवाह) व आजूबाजूच्या भागावर असे हे शहर दोन भागांत वसलेले आहे. गांवाच्या दक्षिण व अुत्तर अशा दोन्ही भागांस अलग अलग तट आहेत. आता ते भग्न झालेले आहेत. दोन्ही दोन्ही कडील तट रोमन बांधणीचे आहेत. तट जरी बहुतेक सर्व ठिकाणी पडलेले असले तरी दोन्ही भागांच्या मधोमध असलेली 'रोम कमानींची' रांग अजून पाहण्या इतपत शाबूत आहे. इतर गांव पाहता, विजापूर जसे पडीक आहे तसेच पडीक वाटते. पण जुन्या इमारती पाडून नव्या अमेरिकन पद्धतीच्या सिमेंटच्या चौकोनी इमारती मात्र वर येऊं लागल्या आहेत.

गांवावर मुसलमानी वास्तुकलेचे प्रभाव जास्त दिसतात. जागो जागी अनेक मशीदी असून त्यांत सुलतानामशीद, नगरमशीद. नीली मशीद, वगैरे फारच भव्य अशा मशीदी आहेत. नगर मशीदींतील द्वाराचे बाजूचे दोन खांब फिरते असे आहेत. सर्व कामें संगमरवराची आहेत. व दगडही फार वापरला आहे. क्वचितच विटांचे काम दिसून येते प्रत्येक मशीदी समोर २-४ उंच असे मनोरे आहेत.

मशीदींची बांधणी, आंतील नक्षीकाम, घुमट बांधण्याची पद्धत पाहिली तर येथील मुसलमानी वास्तुकलेवर रोमन वास्तुकलेचीं

खूपच छाप पडली असावीसी वाटते. येथील सामान्यपणें वापरला जाणारा दगड आमचेकडे विजय नगरकडे जसा पांढरा व कणखर असा दगड मिळतो अगदी तसलाच दगड इकडे मिळत असल्यानें बांधकामात त्याचाच सरीस अुपयोग केलेला आहे. मोठमोठे राज मार्ग सुद्धा बारिक बारीक चौकोनी दगड सांधवून बनवलेले आहेत पण दगडांची सांधणी फारच व्यवस्थित आहे. आमचेकडेंही अनेक क्षेत्रात दगडांचे मार्ग आहेतच. आमचे कडील दगडीमार्ग वाहनांची अडवणूक व मोडतोड करतात एवढेच नव्हे तर पायचालू भक्ताला लोटांगण घालायला भाग पाडतात.

दोन्हीं टेकड्यामध्यें नदीचे मुख असल्यानें भरपूर खोल रुंद, व निळे असें सुंदर पाणी दिसते. या प्रवाहांतून जलमार्गे व्यापार वाहतूक तर मोठ्या प्रमाणांत चालूच असते, व जलसंचय नगराचे मधोमध असल्यानें जलक्रीडा करणें ही एक मोठी हौस होऊन बसलेली आहे. शेकडोंनीं लोक जलक्रीडा करून आनंद लुटत असतात. सायंकाळचे वेळीं जलक्रीडेची इतकीं गर्दी असते कीं 'क्यू' लागलेला असतो.

मला इकडील भाषा कळत नाहीं व इंग्लीश इकडील लोकांना फारसे कळत नाहीं, त्यामुळें 'इंग्लीस, इंग्लीस' हिंदू हिंदू असेच मला म्हणत व खाणाखुणानीच बोलणें चालूं असे. दोन मशिदीत जाऊन मुद्दाम मी तेथील लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला. खाणाखुणानीच थोडे फार बोलणें झाले. मशिदींत प्रार्थनेला जाताना पादत्राणें बरोबर हातांत घेऊन जायची व आपल्या जवळ ठेऊन घेऊनच प्रार्थना करायची असा येथील प्रघात आहे. मी पादत्राणें बाहेर सोडून आंत चाललो असतां मला एकानें पादत्राणें हातांत घेऊन जाण्यास सांगितले. सामुहिक नमाजापेक्षां लोक आपल्या सवडी प्रमाणें वैयक्तिक नमाज करून जात असतात. सामुहिक नमाजाचे वेळीं गायन पठणासाठीं संगीत संचाची (Orchestra) व लाऊड स्पीकरची व्यवस्था केलेली आहे. एका वेळीं ३-४ हजार लोक तरी

सहजपणें नमाज पढतील अशा भव्य व सुव्यवस्थित मशिदी आहेत. बैठक म्हणून सगळींकडें गालिचे अंथरलेले दिसतात.

लोकांत धार्मिक कट्टरता दिसावी तितकी दिसून येत नाहीं. माझेंकडून एका मशिदीतील लोकांनी भारतीय वैदिक धर्म समजावून घेतला. 'बौद्ध' व 'वैदिक हिंदू' हे दोन्हीं एकच धर्म असे त्यांचे विचार त्यांना खाणाखुणांनीं फरक सांगण्याचा प्रयत्न केला. बौद्धमताचा व वैदिक मताचा फरक मी समजाऊन सांगितला. वैदिक धर्मांतील व पुराणांतील माहिती त्यांना अगदीच अंधूक आहे. राम व कृष्ण हे अवतार त्यांना माहित आहेत. राम, कृष्णांचीं मी नांवें घेताच त्यांना ऐकून आनंद झाला "हे आम्हाला माहित आहे" अशा तऱ्हेचें शब्द त्यानी उच्चारलें.

सर्व मंडळी नेहमी आपापल्या कामांत गुंतलेली असतात. सायंकाळी मैदानावर लहान थोर विद्यार्थी व हौशी खेळाडू फूटबॉल मोठ्या हौसेनें खेळत असतात. एकूण राजकीय वैचारिक ज्ञान येथील लोकांना फार कमी आहे. जगाच्या राजकारणाची माहिती त्याना फारशी नाहीं. 'कम्युनिस्ट आमचे शत्रू आहेत' एवढीच अेक 'सामान्य भावना आहे. मी युगोस्लाव्हियात जाणार असल्याचे सांगताच 'तो देश कम्युनिस्ट तेथें कशाला जाता ?" असे एका दोघानी विचारले मी केवळ सूहंन वेळ काढला. येथील लोकांचे राहणें पूर्णपणें पाश्चिमात्य पद्धतीचे झाले असल्यानें ख्रिस्ती कोण व मुसलमान कोण हे कळतच नाहीं. सर्वांची भाषाही तद्देशीय तुर्की भाषा असलेनेंही परदेशचे लोक यांचेशी बोलून कांहीं समजून घेतील हे कठीण जगांत सर्व कडे चालणारी इंग्रजी येथील क्वचितच लोकाना थोडीं फार समजते.

बहुजन मुसलमान धर्माचे असले तरी सामान्यतः मुसलमानांत 'पडदा' आदी इकडील चाली रीती तिकडे क्वचितच पहायला मिळतात. स्त्री पुरुष खुशाल मोकळेपणानें फिरत असताना सर्रास दिसतात. हा सर्व युरोपीय रीती-पद्धतींचा प्रभाव असावा असे वाटते.

" युरोप खंडाच्या प्रवेश द्वारात १ ले मुसलमानी राष्ट्र ! " यात आमचे कडील मुसलमानी रीती-पद्धतीचा लवलेशही पहायला मिळत नाहीं.

३: यवन नगरी अथेन्स

साक्रोटीस, प्लेटो यांनी निर्माण केलेली नगर नीति जेथें जन्माला आली, जगज्जेता सिकंदर जिथें उदयाला आला, ज्या नगरीला ख्रिस्त पूर्व ३००० वर्षे पर्यंतचा इतिहास आहे व ज्याची राज्य व्यवस्था ग्रीक, तुर्क, रोमन अशा त्या त्या कालिन बलाढ्य साम्राज्यांचे हातून आल्यागेल्यानें त्या नगरीचे महत्व विशेषच वाढलेले आहे. लोकशाही राज्य व्यवस्थेचे अगमस्थान जें नगर आहे, ती नगरी व ग्रीक देश पाहायचें मनांत फार दिवसा पासून होते म्हणून माझ्या प्रवासामध्यें अथेन्सचा समावेश मुद्दाम केला होता. अथेन्स पहायला मी दोन दिवस निर्दिष्ट केले होते. पण अनुभवानें ते अपूरे पडले मग ग्रीस देश पाहायचे तर दूरच राहो.

ठरल्याप्रमाणें मी दि. ६-७-६१ रोजीं मीं इस्तंबूलहून विमान मार्गे अथेन्सला दुपारीं १२॥ वा. येऊन पोहोचलो. येथें यूथहॉस्टेल असल्यानें व मला तेथें जागेची व्यवस्था झाल्यानें खर्चाचे दृष्टीनें बरीच सवलत निर्माण झाली. भाडे अेक दिवसाला १२ ड्राथम म्हणजे अंदाजें रोजी ४ रु. पडल्यानें समाधान झाले. थोडी विश्रांती घेऊन दुपारीं अेका फ्रेंच युवका बरोबर (तोमिनिक) अक्रोपोलिस पहायला गेलो. सदरहू अत्यंत जुना भग्न राजवाडा नगराजवळच्याच डोंगरावर आहे. राजवाड्याचे कांहीं अवशेषच पहायला मिळतात जे अवशेष पहायला मिळतात, त्यावरुनच त्याची भव्यता व पुरातन ग्रीकांची वास्तूकला त्यांची श्रेष्ठता व भव्यता लक्षांत येते. ख्रिस्त पूर्व काळांत ग्रीकानी नगरी वसवली. ख्रिस्ती शतकानंतर रोमन

सम्राजानी इथें राज्य केले व नगराची शोभा रोमन पद्धतीनी वाढविली. पण पुढें येथें तुर्कांचे राज्य झाले व त्यानी राजकीय सूड घेण्याच्या उद्देशानें सर्व प्राचीन प्राकार, इमारती वगैरे नष्ट भ्रष्ट करून टाकले, अगदी अली अलीकडेंच ग्रीकांचे हातीं आपला देश आला व तेंव्हां पासून या नगरीची पुनर्बांधणी सुरु झाली. ३-४ शेहे वर्षांच्या काळांत अथेन्स नगर जगांतील एक अत्याधुनिक नगरांत मणण्याजोगें नगर झाले नाहीं. मात्र अत्याधुनिक इमारती, रस्तें, ट्यूब ट्रेन्स, विजेच्या गाड्या व बसेस् भुमिगत रस्तें, भुमिगत कारखानें, विजेची विपुलता या सर्व गोष्टींनें आतां नगर फारच सुंदर असें झालेलें आहे. नगरांतील रस्ते व इमारती पूर्व नियोजित अशी असलेनें फारच सुंदर दिसते.

अथेन्स नगर एक बाजूला समुद्र किनारा व चोहों बाजूनें डोंगर टेकड्यामध्यें वसलेले आहे. अितकें जुनें शहर असून आंता इथें जुनाट पडकी घरें पहायला सुद्धां मिळत नाहीत सर्वकडें चौकोनी इमल्याची सिमेंट कॉंक्रिट व अमेरिकन पद्धतीची घरेच दिसून येतात. येथील प्रत्येक घराला तळमजला असायचाच. त्यांत कारखाना (छोटी खानी) वगैरे असे कांहीं असायचे. अथेन्समध्यें जुनें जे कांहीं आहे ते फक्त इतिहास, कला प्रसिद्ध असेच व तेही सरकारनें राखून ठेवलेले आहे. अलीकडें तरी ग्रीस सरकार अथेन्सच्या जुन्या इमारती, राजवाडे वगैरे जसेच्या तसें बांधून नवीन करण्याचें कामांत गुंतलेले असून या कामावर सरकारचा अतोनांत खर्च चाललेला आहे. सध्या बांधकाम चालूं आहे.

जुलै हा येथील सुट्टीचा उन्हाळीं महिना. म्हणजे सुखाचा महिना. करितां सर्व जुन्या व नव्या राष्ट्रीय इमारतावर सुंदर रोषणाई आहे. नगरातील इतर सर्व लोकांनीही आपापल्या दुकानांवरून रोषणाई (विजेची) केलेली असल्यानें रात्रीं नगर विजेच्या झगझगाटानें चमकत असते व रात्रीं सुद्धां हे शहर पाहायला जायला

उत्साह वाटत असतो. शहर सफाई तर वाखाणण्या सारखी. सफाई करणारे कामगार चोवीस तास आपल्या कामावर पाटी, खोरी झाडू घेऊन रुजू असतात. कुठं एकादा कागदाचा कपटा पडला कीं लगेच तो उचलला जातो. गटारे भूमिगत असल्यानें तो प्रश्नच नाहीं

सध्यां इकडें उन्हाळा सुरू असल्यानें पहाटे ४ वाजतां उजाडते, व रात्री ८॥ वाजेपर्यंत अंधार पडत नाहीं. सूर्योदय पहाटें ५ वा. होतो व सूर्यास्त सायंकाळी ७॥ चे सुमारास होतो. त्यामुळें लोकांना उत्साह वाटून मोठ्या हुरुपानें सर्वजण आपापल्या कामांत गुंग आहेत. उन्हाळा मात्र येथें फारच कडक आहे. दुपारी बाहेर फिरतांना अगदी उन्हाचें चटके बसत असतात. म्हणून दुपारीं २ ते ४ पर्यंत सर्व सामसूम. वास्तविक हा थंड व समशीतोष्ण प्रदेश. पण सध्यां येथें अगावर कपडा घालण्याची अथवा झोंपते वेळी पांघरुन घेण्याची सोयच नाहीं. उन्हाळा असल्यानें समुद्रांत पोहायला जाण्याचा येथील लोकांचा छंद आहे. बायका पुरुष सर्वच खेळी-मेळीनें हजारोंच्या संख्येनें समुद्रांत पोहत असतांना दिसतात.

यथें सर्वसाधारणपणें ग्रीक भाषा (मुख्यत्वे करून) व फ्रांसीसी व इंग्रजी भाषा बोलल्या जातात. इस्तंबूलांत जो भाषेची अडचण पडली ती येथें पडली नाहीं. सर्वसाधारणपणें इंग्रजी कोणाला बोलायला जरी आली नाही तरी समजत असल्यानें काम चालत होते. येथील लोकही चांगले आहेत. कुणालाही कांहींही जरी विचारले तरी ते माझे म्हणणें समजून घेण्याचा प्रयत्न करून योग्य ते मार्गदर्शन करत असत व मी कुठला, आमचा देश कसा आहे वगैरें विचारपूस करून अथेन्स नगर आपल्याला कसे काय वाटले असा प्रश्न करीत असत. अर्थात मी अथेन्स नगर 'very fine, good,' असे सांगत असे. आपण डेमॉक्रेट आहोत हे सांगण्यांत येथील लोकांना अभिमान आहे. कम्युनिस्ट विचारांशी या लोकांचे शत्रुत्व आहेसे वाटते. मी युगोस्लोव्हियांत

जाणार आहे असे म्हणताच लोक मला म्हणाले, 'आपण कोण आहात ?' मी उत्तरलो 'मीही डेमॉक्रॅटिक आहे' मग 'आपण तेथें कां जाता ?' मी म्हटले, तेथें एका कामावर मी जात आहे व तेथील राजवटीशीं मला घेऊन काम करायचे आहे ?' तरी पण ते म्हणालेच "कम्युनिस्ट बॅंड" लोकांचा एक समज आहे कीं, युगोस्लाव्हियांतील बहुजन डेमॉक्रेट आहेत. पण त्यांना नाइलाजानें कम्युनिझम मान्य करावा लागत आहे. व्यक्तीशः टिटो चांगला आहे. पण त्यांचे राजकीय विचार लोकांना मान्य नाहीत वगैरे वगैरे. भारताचे (मॅथम गांदी) महात्मा गांधी व (नेखरू) नेहरू या लोकांना माहीत असून ते थोर व वंद्य पुरुष असे हे लोक मानतात. मी त्यांच्याशी हस्तांदोलन करून नंतर भारतीय पद्धतीचा नमस्कार केला. तर त्यांनींही आम्हाला हा भारतीय नमस्कार माहीत आहे असे सांगून तसाच उलट नमस्कार केला.

येथील एकूण भग्नावेष पहातां मला एकदम विजयनगरच्या अवशेषांची आठवण आली. तेथील नाशाला व येथील नाशाला राजकीय मूडच कारणीभूत झालेला आहे. विजयनगरचे अवशेष पाहून जसे आम्ही त्या लोकांची सांस्कृतिक पातळी किती वरच्या दर्जाची होती असे म्हणतो, याप्रमाणें विचार येथेंही यंतात. फरक एवढाच आहे कीं, विजयनगरचे अवशेष दिवसे दिवस आपले शेष अस्तित्वहीं गमावूं लागले आहेत. पण येथील सरकार येथील अवशेषांचे नवीनीकरण करून आपले ऐतिहासिक वैभव परत एकदां फुलवूं पहात आहेत.

४: युगोस्लाव्ह देश

दि. ८-७-६१ रोजी अथेन्सहून विमानमार्गें बेलग्रेडला आलो. युगोस्लाव्हियांत चांगले २०-२२ दिवस राहायला मिळणार त्यामुळें युगोस्लाव्हियात तेथील लोक त्यांची राहणी त्यांची राजस्थिती, तेथील हवामान, आर्थिक परिस्थिती याचा खूपच अभ्यास करायला मिळाला.

युगोस्लाव्हिया देश तसे पाहता कांहीं प्रेक्षणीय देश नव्हे. येथें पूर्वी इतिहास प्रसिद्ध असे कांही नाहीं. याही देशाला खूपच इतिहास जरी असला तरी जागतिक इतिहासांत नोंद व्हावी अशी कांही या देशाची अैतिहासिक माहिती नाही जो कांहीं इतिहास या देशाला आहे तो केवळ गुलामीचा आहे. अैतिहासिक काळी हा देश कधी भरभराटीला आला होता असे मुळीच नाही. अनेक वर्षे रशियन, जर्मन रोमन साम्राज्याखालीं दडपला गेल्यावर १७ व्या शतका-पासून हा देश 'तुर्क' साम्राज्य पूर्णपणें चिरडला गेलेला आहे. वीसाव्या शतकांत तुर्क साम्राज्य जसे नाहीसे झाले तेव्हां हा देश कुठे मान वर काढतो तो जर्मनानी याची मानगुटी आपल्या हातांत घेतली व या देशाचा स्वातंत्र्याच झगडा असाच चालू राहिला. वीसाव्या शतकांत या देशांत कम्युनिष्ट पक्षाचा प्रभाव वाढला व त्यांनी येथील राजशाहीशी तसेंच तुर्कीशाहीशीं झगडा देऊन भरपूर रक्तपाता नंतर स्वातंत्र्य मिळविले. या भागांत कम्युनिष्ट पद्धतीची राजवट असून Federation of Yugoslov Republics असे याचें नांव असून यां फेडरेशनमध्यें सहा रिपब्लिक्स असून प्रत्येक रिपब्लिकमध्यें तालुकवजा छोटी कम्यून्स आहेत. कम्यून हा या राज्याचा सर्वांत लहान पण मूलगामी घटक असून कम्यून मंडळ, रिपब्लिक असेंब्ली व फेडरल कौन्सिल व फेडरल सरकार अशी येथील राज्यरचना आहे. फेडरल सरकारच्या हाती संरक्षण, परदेश नीती, पोलीस, अर्थ-व्यवस्था, समाजव्यवस्था, रेल्वेज रोडस् व वाहतुक, न्याय अशी महत्वाची खातीं असून रिपब्लिक ही स्वतंत्र स्वयंभू सरकारे असल्यासारखी आपल्या असेंब्लीमध्यें कायदे कानू करून स्वतंत्र राज्यकारभार करतात. मताधिकार प्रत्येक सोळा वर्षे उलटलेल्या पुरुषस्त्रीस आहे. लरे, एल्लारिस, मखिजेनिया, बारोइना वगैरे या देशाची रिपब्लिक्स आहेत. कम्यून मंडळातूनच रिपब्लिक असेंब्लीचे व फेडरल कौन्सिलचे सभासद निवडले जातात व त्यांतूनच देशाचा प्रेसिडेंट निवडला जातो.

देशाचे एकूण क्षेत्रफळ आमच्या मैसूर राज्यापेक्षा थोडे कमीच पण जास्त नाही. इतके असले तरी त्यांत सहा घटक राज्ये आहेत. देशाच्या पश्चिम बाजूस समुद्रकिनारा व पूर्व बाजूस रशिया आहे फेडरल राजधानी बेलग्रेड आहे. कम्युनिष्ट पद्धतीची राजवट येथे असली तरी सोव्हिएट रशियाशीं या देशाचे संबंध आजपर्यंत तरी बरे नाहींत. अलीकडे ते सुधारूं पहात आहेत असे चालू परिस्थितीवरून वाटते. मार्शल टिटोचे वर्चस्व सोव्हिएट रशियनांना नको आहेसे वाटते व या देशांत मार्शल टिटो फारच लोकप्रिय असून त्याची जवळजवळ व्यक्तीपूजा लहानथोर सर्वच करतात. उदा:—

एक दिवस कँपमध्यें एका डॅनिश तरुणानें एका कासवाचे पाठीवर टिटोचे व कम्यू पार्टी सेक्रेटरीचे नांव लिहिले. ते कासव आल्या वाटेनें निघून गेले हे काहीं युगोस्लाव्ह लोकांनीं पाहिले. सायंकाळीं कँप कौन्सिलमध्यें हा विषय निघाला व कँप कमांडरनें त्या मुलाला Expell करायचा विचार पुढें आणला. खूप गरमा गरम चर्चा झाली. शेवटी मी भाषण करून आंतरराष्ट्रीय बंधुत्व निर्माण करूं इच्छिणारे आम्ही असल्या एका सामान्य चूकीवर जर असे रागावणार असलो तर मूळ उद्देशावरच आळा घालण्या-सारखे होणार आहे असे म्हटले. जेव्हां जगाच्या अनेक देशांतून अनेक विचाराचे लोक एकत्रित आले आहेत तेव्हां त्यांचे सर्वांचे नवे नवे विचार असणें अत्यंत सहाजिक आहे व लोकांच्या निर-निराळ्या विचारधारा व विचाराचे अधिष्ठान असते. उदा- भारतांत आमच्या भारतीय देवादिकांची नावें चहा दुकानें, कापड दुकानें वगैरेंच्या नांवावर लिहिली असतात. म्हणून आम्हाला काहींच वाटत नाहीं. इतकेच काय आमच्या सांप्रत पुढाऱ्यांची नांवें वाटेल तशी वाकडी तिकडी लिहिली जातात पण त्याकडे कुणाचेच लक्ष असत नाहीं. 'कासव' हे युगोस्लाव्ह लोकांना अत्यंत अपवित्र जनावर असेल पण हिंदू धर्मांत ते दशावतारांतील एक अवतार

आहे. तेव्हां विनाकारण या प्रश्नाला महत्व देण्यांत अर्थ नाहीं. ज्या मनुष्यानें हे कृत्य केले ते अज्ञानानें केलेले आहे असे सांगितले. तरी पण युगोस्लाव्ह लोकांना या घटनेचे वाईट वाटले. याबद्दल आम्हा सर्व देशाच्या प्रतिनिधीनाही अत्यंत वाईट वाटते व त्यासाठीं मंडळाचे आम्ही कांहीं सभासद याबद्दल दिलगिरी व्यक्त करायला तयार आहो असे सांगितल्यावर व या विचाराला कौन्सिलच्या सर्व सभासदानीं एकदम पाठिंबा दिल्यावर कॅप कमांडरला माझा विचार मान्य करावा लागला. सांगायचा विचार हा कीं युगोस्लाव्ह लोकांत टिटोच्या व्यक्तित्वाच्या महत्वाचा कितो अतिरेक झाला आहे एवढेच.

या देशात लोक फार लाघवी आहेत. परदेशीय मनुष्या-बरोबर तर फार आतिथ्यानें वागतात. नेहमीं चेहरा हसतमुख असतो. जरी एकमेकांना भाषा कळत नसली तरी खाणाखुणानी आपल्या देशाची खूप माहिती सांगतात व आपल्याजवळ असलेली वस्तू मग ती तंबाखू असो अथवा एखादे फळ असो दुसऱ्याला प्रेमानें देतात. हे लोक आर्थिकदृष्टया फारच गरीब आहेत. २० वर्षाच्या स्वातंत्र्यांतील वाटचालीनंतर यांचे जीवनमान कुठें भार-ताच्या जीवनमानाबरोबर आलेसे वाटते. लोक फार कष्टाळू आहेत. आम्ही एका खेड्यातच रहात असल्यानें त्यांचे जीवन चांगले पहायला मिळाले. सकाळचे ५ वाजल्यापासून रात्रीचे ८ ९ वाजेपर्यंत कामें करीत असतात. येथील हवामान त्यांच्या या कामाला अत्यंत पोषक असे आहे. शेतकामांत गाडीला गाय अथवा म्हैस झुंपली जाते व औते ओढण्यांतहीं सर्रास म्हशीचा, गायींचा, बैलांचा व घोड्यांचा उपयोग केला जातो. सर्वकडे कालव्याच्या पाण्याची चांगली सोय असल्यानें वर्षभर शेतकामें चालू असतात. रास तुडवायला घोड्यांचा उपयोग केला जातो. रास आमचेकडील प्रमाणेंच केली जाते. घोडे मोठे उमदे असतात. आमचेकडे रेससाठीं जे घोडे वापरले जातात तसले घोडे येथें सर्रास पहायला

मिळतात. इकडील लोकांवर धर्माचा पगडा फार कमीं आहे. इकडे ख्रिश्चन व मुसलमान असे लोक असून रविवारीं अथवा नमाजाचे दिवशींच कांहीं थोडे धर्मकार्यं होईल तेवढेच. येरव्हीच्या दैनंदिन व्यवहारावर इकडे धर्मबंधन फार कमी आहे. मोठ्याला उद्योगधद्याचे राष्ट्रीकरण, शेतीमध्यें को-ऑ. फॉर्मिंग झाल्यानें मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकी नष्ट झाल्यानें श्रीमंत, गरीब भेद फारसा वाटत नाहीं. तरी पण आर्थिक समता येथें निर्माण व्हायला अजून फार वर्षे लागतील असे वाटते. शेती व छोटे-खानी उद्योग यात खाजगी मालकी अजून सरकारमान्य आहे. व्यक्तीला मर्यादित क्षेत्रांत स्वतंत्र कार्य करण्याची मुभा आहे ही एक चांगली गोष्ट आहे. येथील लोकांचे आरोग्यमान चांगले आहे. शिवाय वैद्यकीय मदत सरकारी मोफत आहे. मात्र इकडील लोक लहानापासून थोरापर्यंत दारू, बीरपासून व्हिस्कीपर्यंत सर्रास पितात व सिगरेट अथवा चिरूटही ओढतात आमच्यासारख्या गांधीवादी विचाराच्या लोकांना हे विलक्षण वाटणें सहाजिकच आहे.

या देशांतील खेडी.

मी ७।८ युगोस्लाव्ह खेड्यांतून प्रवास केला. खेड्यांची व्यवस्था आमचेकडे जशी खेडी आहेत तशीच आहेत. गांववाडा उंचवठ्यावर अगर उतारावर आहे. घरें कौलारू, झोपडीवजा, दगडी अशी सर्वतऱ्हेची आहेत. रस्तें, बोळ वगैरें सर्वकांहीं आमच्या खेड्यासारखेच आहेत. पाण्यासाठीं ओढें, नदी तथा लहान लहान विहिरींचा उपयोग केला जातो. नळ मात्र अजून सर्व खेड्यांत आलेले नाहींत. कांहीं खेड्यांत वीज मात्र आलेली आहे व सरसकट लोकांनीं वीज घेतलेली आहे. वीज आणणेंस साधे लाकडी साटे वापरले असून घरगुती कनेक्शन देण्यासाठीं फारशी कांहीं किटकिट नसते. आपल्या खेड्यासारखी मात्र ही खेडी एकवटलेली नसतात. कोंकणबाजूची खेडी जशी निरनिराळ्या वाड्यांची विखुरलेली असतात तशी इकडील खेड्यांतील घरें विखुरलेली आढळतात.

इकडील लोकांत साक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यानें धार्मिक अंध भावना व विचारांची कर्मठता आढळून येत नाहीं. खेड्यांतील यच्चयावत लोकांना मा. टिटोचे नांव माहीत आहे. खेड्यांतील धंदा बहुतेक शेती, मेंढरे पाळणें व जनावरें पाळणें हाच आहे. शेतीसाठीं बहुतेक सर्व ठिकाणीं कालव्याचे पाणी उपलब्ध असले तरी लोक म्हाताऱ्यापासून ते लहान मुलापर्यंत आंग मोडून आपल्या शेतांतून कामें करीत असतात. अजून इकडे यांत्रिक शेतीं फारशी आलेली नाहीं. सामान्यतः हातऔतेंच वापरण्यांत येतात. डोंगराळ मुलूख खूपच असल्यानें मेंढपाळांनाही आपला धंदा करण्यास भरपूर अवकाश आहे. खेडवळ लोकांचा पोषाख विजार, सदरा फार तर जाकीट व एखादी साहेबी टोपी. बायका झगे व स्वेटर घालतात. धोतर किंवा साडी इकडे अजिबात माहीतच नाहीं. अलंकाराचीही फारशी हौस इकडे दिसून येत नाहीं. सोन्याबद्दल तर हाव इकडें नाहींच नाहीं. सणावारी अथवा रविवारीं चर्चला जाण्यासाठीं बायका फार तर नीटनेटका पोषाख करून गळ्यांत मणिमाला व हातांत आंगठी घालतात. आम्ही कांहीं मुलींना बांगड्या दिल्या तर या बांगड्या काय कामाच्या व कशासाठीं वापरायच्या वगैरें प्रश्न त्यानीं विचारले व त्यांना बांगड्यांचा सौंदर्यप्रसाधने म्हणून उपयोग करतात असे सांगावे लागले. साधारणपणें पुरुष असो अथवा स्त्री असो केसांना तेल लावायची प्रथा इकडें मुळींच नाहीं. विशेषप्रसंगीं फार तर केंस विंचरून त्यावर सुगंधी लेपन करतील एवढेंच. लग्नसोहळेसुद्धा इकडें फारसे थाटानें होत नाहींत. मोठाल्या जेवणावळी अथवा गांवजेवणें होत नाहींत. धर्म-मंदिरांत रजिस्ट्रारपुढें नोंद होऊन लग्नें होतात.

युगोस्लाव्हितांत मी बिओग्रेड स्कोपिया, कुमानोव्ह वगैरें शहरें पाहिली. रस्तें डांबरी अथवा कांक्रीटचे असून नव्या इमारती बहुमजली चौकोनी कांक्रीट बांधणीची होऊं लागली आहेत. कांहीं जुनी घरें मात्र कौलारू पद्धतीची अशी आहेत. घरोघरीं

नळाची व्यवस्था, विजेची व्यवस्था गॅसची व्यवस्था असतेच. शिवाय थंडीच्या दिवसांत खोल्या गरम ठेवण्यासाठीं विजेच्या शेगड्यांची पण व्यवस्था असते. इकडें पहांटें ४ वाजतां उजाडते. त्यामुळें लोक सकाळीं ७ वाजेपर्यंत न्याहरी करून कामाला बाहेर पडतातच. कामांत मग दुकानचे, ऑफीसचे, कारखान्याचे कसलेही असो, बायको, पुरुष असा भेद मुळींच नाहीं. सर्वच कामावर जात असतात. सर्वच आपापल्या कामाच्या गडबडींत असतात. सर्वसाधारणपणें सकाळीं ४ तास काम. पुढें जेवणाची सुट्टी व परत सायंकाळीं ४ पासून रात्री ९ वाजेपर्यंत काम असा क्रम असतो. दुकानातून प्रत्येक मालावर त्यांची किंमत लिहिलेली दिसते. मागायचे वगैरे कांहीं नाहीं. दुकानांत माल इतस्ततः सर्वकडे पडलेला असतो पण कुणी चोरील किंवा लांबवेल अशी भिती कुणालाही नसते. जो कुणी माल घेतो तो कॅशरकडें पैसे देतो. कॅशर लगेच कॅशमशिनवर पैसे नोंदवितो व बाकीचे पैसे परत करतो. कोणताही माल दाखवितात, घ्यावाच असा निर्बंध नाहीं. दुकानांत सायंकाळीं एकच गर्दी असते. पण व्यापार निवांतपणें चालूं असतो. सायंकाळीं फिरायला जाणें, हॉटेलांत जाणें वगैरें लोकांच्या आवडीच्या गोष्टीं असतात. बहुतेक गरम पयें पिण्याचा प्रथा कमी. फळांचा रस अथवा अनेक प्रकाराचा दारू सामान्यपणें प्याली जाते. चहा, कॉफी मागितल्यास मिळतो. पण दूध मिश्रित चहा, कॉफी कोठेंच मिळत नाहीं. आमच्यासारख्यानें जर दूध मागितलेच तर मिळते. पण मग लोक सारे आमच्याकडें पाहूं लागतात. चहात दूध कोणीच घेत नाहींत. चहांत मोसंब्याची फोड पिळण्याचा पद्धत आहे. सकाळीं सर्व दुकानदार आपापली दुकानें साफ करतांना दिसतात. मालक स्वतःच स्वतःची कामें करीत असतात. शहरांतील सफाईसाठीं झाडूवाले दिवसभर झाडू व टोपली घेऊन फिरत असतात. त्यांचा ड्रेस पँट, शर्ट, साहेबी टोपी असाच त्या झाडूवाल्यांचा पोषाख असतो. आमच्याकडें महारांचा पोषाख पाहिलेलें आम्ही असल्या या पोषाखाच्या झाडू-

वाल्यांना पाहून आम्हाला आश्चर्य वाटते. मात्र रस्तें अत्यंत स्वच्छ असतात. जागोजागीं लहान लहान कचरा पेट्या असतात. लोक कागद कपटे अगदी नेमके त्या डब्यांत टाकत असतात. चहा-फराळाच्या व इतर दुकानांतून सुद्धां बायकांचे प्रमाण जास्त आढळते व त्या अत्यंत नम्रपणें गिऱ्हाईकांशीं बोलत चालत असतात. शहरांत सर्वजणच गडबडीत असतात. त्यामुळें बोलाचाल फारशी असत नाहीं. दुकानांत मात्र आमच्यासारखा परकीय कांहीं चौकशी करूं लागला तर आमची, आमच्या देशांची थोडी चौकशी होते. शहरांत प्रत्येकाला आमच्या देशाचे नांव, आमची राजधानी नवी दिल्ली व पं. नेहरू व महात्मा गांधी यांचो नावें सर्वांना माहीत आहेत मी एकदां एका दुकानांत गेलो, चहाची चौकशी केली. नाहीं म्हणाला. तेव्हां दूध मागितले. माझी भाषा त्यांना कळली नाही, त्यांची भाषा मला कळली. शेवटो त्यांनीं एक प्यालाभर कांहींसे पेय दुधासारखे पांढरे दिले मी ते घेतले. त्याचे पैसे दिले व प्यालो ते ताक होते. परत मां स्वीट स्वीट म्हणून चौकशी केली तेव्हा तो दुकानदार म्हाणाला, दूध गोड शिल्लक नाहीं. कांहीही असो, आम्हाला दुधाऐवजी ताकच मिळाले, आणखी काही तरी नाही.

शहरामधून करखान्यांची गर्दी आहे. मात्र विशेष परवानगी शिवाय कोणताही कारखाना दाखवला जात नाहीं. शहरें सर्व आंखीव बांधणीची आहेत. हा देश बरींच वर्षे तुर्क अमलाखालीं असल्यानें तुर्की पद्धती व बांधणीचा प्रभाव जुन्या शहरी भागांत बराच दिसून येतो. रात्रौ जेवण झाल्यावर अकॉर्डिन अथवा बँडच्या साथीवर गाणी म्हणून नाचायची प्रथा सर्वकडें सरसकट असून गल्लोगल्ली डान्स क्लब आहेत. उघड्यावर नाच चालूं असतात. मात्र मला या नाचांत कला अशी अजिबात दिसून आली नाहीं. आमचा भारतीय नाच ताल सूरबद्ध असा असतो तर इकडें त्याचा निधि निषेधच नाहीं. स्त्री पुरुष परस्पर हात धरून नाचत असतात कसेतरी.

इंटरनॅशनल ब्रिगेड.

Unity Fraternity Hiway Project वर काम करण्यासाठीं खालील देशांचे प्रतिनिधी म्हणजे इंग्लंड २५, प. जर्मनी ४०, फ्रान्स २०, बेल्जीयम ५, डेन्मार्क १०, स्वीडन २, हॉलंड १२, ट्युनिशिया ३७, घाना ६, मोरोक्को ४, इसरेल ३, पोलंड १५, भारत ७, सिलोन २, यू. एस. ए १२, अर्जेंटीना ८, चिली ५, ब्राझील १ व इतर कांही असे मिळून एकूण २६० स्वयंसेवक आले होते. यापैकी जवळ जवळ ८० टक्के विद्यार्थी व तेही हिचहाइक करीत आपला सुट्टीचा वेळ घालविण्यासाठी आलेले आढळले. युरोपच्या सर्व देशांत जुलै व आगष्ट दोन महिनें शाळा कॉलेजाना सुट्या असल्यानें खूपच विद्यार्थी अशा प्रवासावर निघतात यांत त्यांचा आर्थिक काटकसरीचाही अेक भाग असतो. स्वतःचा खर्च वाचतो व देश व लोक पहायला मिळतात. युगोस्लाव्ह पीपल्स यूथनें जगांतील ४५० संघटनांना आमंत्रणें पाठविली होती पण त्या त्या संघटनाचे अधिकृत प्रतिनिधी असे फक्त ४।६ देशांतूनच आले होते. त्यांत भारत, प. जर्मनी, पोलंड, ट्युनिशिया, घाना, अर्जेंटीना, चीली, हेच काय ते देश. बाकीचे लोक स्टूडंटस्कार्ड घेऊन आलेले त्यामुळें त्या त्या देशाच्या राजकीय स्थितीबद्दल माहिती गोळा करून विचारांची देवघेव करायचा प्रवृती फारच कमी आढळली मीहून वरील सर्व देशांच्या प्रतिनिधी बरोबर वैयक्तीक, खाजगी अगर बैठकीमध्यें बरीच माहिती गोळा केली व भारताबद्दल बरीच माहिती सांगितली तसा मी सर्वच देशाच्या लोकांना भेटलो व त्यांच्या देशाची बरीच माहिती विचारलीं. बऱ्याच लोकांना शैक्षणीक माहितीव्यतिरिक्त इतर फारसे माहित नसल्याचे दिसले. आम्हा भारतीयाजवळ आंतर राष्ट्रीय मैत्रीबद्दल जी आस्था आहे तशी आस्था इतर देशांच्या लोकांजवळ फारच कमी प्रमाणांत आढळली. कोणी आपला देश धनाढ्य असल्यानें दुसऱ्या देशाबद्दल बेपर्वा आहेत तर कोणी

असें हें काम रोज सकाळीं ६ तास चालायचे

युनिटी फर्टनिटी हाय वे कँपवर जेथें २५० परराष्ट्रांतील स्वयंसेवक श्रमदान करीत होते त्या ठिकाणीं स्वतः लेखक श्री. वाटवे श्रमदान करीत असतांना. जवळच्या काटेरी झाडाला गणवेषाचा शर्ट लावून बनियनवर काम करीत असतांना. कामानें फार घाम येऊन घामाच्या धारा तोंडावर ओघळूं नयेत म्हणून घाम टिपून घेण्यासाठीं डोक्याला हातरुमाल बांधलेला आहे.

सदर कँपमध्येच माझे डेन्मार्कचे मित्र श्री. मॅड्ज हे काम करीत असतांना त्यांचा हा फोटो घेतलेला असून सध्या श्री. मॅड्ज हे डेन्मार्क मधील एका हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत.

स्वतःला फारच सुसंस्कृत समजून इतर देशाबरोबर विचारांची देवाण घेवाण करण्यास उद्युक्त नाही तर कुणाला इतर देशांचीच काय आपल्या देशाचीही फारशी माहिती नाही. त्यामुळें सर्व देशाची माहिती गोळा करण्याचे काम पूर्ण होऊं शकले नाही.

या शिबिरात अनेक देशांचे लोक आले असल्यानें सर्व देशाचे रीतिरिवाज, पोषाख वगैरे पहायला मिळाले. आम्ही जे समजून आहो कि परदेशचे लोक पोषाखांत फार टापटिपीचे असतात. ते साफ चुकीचे आहे असे मला येथे आढळून आले. सध्या उन्हाळा असल्यामुळें तर बहुतेक सर्वच लोक नेहमी उघडे नागवे अथवा अगदी थोडेसे कपडे अंगावर घातलेले आढळत. पोषाखात अभ्रत आहे. अशी समजूत कोणाचीच दिसून आली नाही या आमच्या चुकीच्या भावनेंबद्दल फिरून फिरून स्वतःलाच हसावे असे वाटे. अर्थात आम्हाला येथील उन्हाळा सुद्धा हिवाळ्यासारखा वाटे त्यामुळें आम्ही भारतीय मात्र सायंकाळीं व सकाळीं गरम कपडे घालत असूं. शिबिरांत जवळ जवळ ३० टक्के मुली होत्या. त्याही उघड्या नागव्याच असायच्या. केसाना तेल लावतच नाहीत विचरतात व फार तर ओठाला लिपस्टीक लावतात स्त्रियांचा पोषाख इतका साधा पाहून तर मला आश्चर्याचा धक्काच बसला आपली मर्यादा सांभाळण्यासाठीं व आपले सौंदर्य ओझरतेच दिसावे अशा रीतीनें अंगभर साडी, चोळी, अलंकार सौंदर्यप्रसाधनाचा उपयोग करणाऱ्या भारतीय स्त्रिया कोठें व या स्त्रिया कोठे? नशिबाने कोणतीच भारतीय स्त्री या शिबिरांत आली नसल्यानें याची तुलना जितकी करावी तितकी करता येणार नाही. असो! परदेशी मुली तर पुरुषाशीसुद्धा इतक्या मिळून मिसळून अेकमेकांच्या अंगाखांद्याशी प्रसंगी धक्काबुक्की सुद्धां अगदी निसंकोच करत असतात. एकेकदां कां नेहमींच स्त्री-पुरुष एकमेकांचे चुंबन व आलिंगन देणें घेणें पाहिले. असले प्रकार उघड रीतीनें करीत असल्याने आम्हा भारतीयाना हा तर अतिरेक वाटतोच पण याला काय संस्कृती म्हणायचे? असा एक

प्रश्न मजपुढें अनेक वेळा उभाराहत असे. एकाच पलंगावर स्त्री-पुरुष दिवसा ढवळ्या हौशीनें झोपलेले मी अनेक वेळा पाहिले व मीच डोळे झांकून घ्यावे असे मला वाटले. आम्हा भारतीयाना हे सर्वच नवीन त्यात मी तर या सर्व प्रकारांत अत्यंत अरसिक. त्यामुळें मला नेहमीच डोळें झांकून घ्यावेसे वाटे पण मी हे सर्व पहायलाच आलो असल्यानें मुद्दाम निर्लज्य होऊन डोळे उघडून हे सर्व प्रकार पहात असे. स्त्री-पुरुष भेद जर मी कोठे पाहिला तर तो फक्त संडास व स्नानगृहे वेगवेगळी आहेत एवढाच पाहिला पुरुष स्नान गृहात नागवे होऊन सामुहिक शॉवर कारंज्याखाली स्नान करित असतात. आम्ही हे पाहिले पण स्वतः नागवे होऊन स्नान करणें चार चौघात शक्य झाले नाही. आम्ही पँट घालूनच स्नान केले. सरसकट सर्व लोक तंबाखू ओढत असतात त्याला धरबंध कांहीच असत नाही. चहा कॉफीचे या लोकांना फारसे व्यसन असे नाही एखादेवेळी चहा कॉफी दूधाविना घेतात. मला असली चहा कॉफी मुळीच आवडेना, पण इलाज नाही घ्यावीच लागे. कारण दुसरे कांहीं मिळत नसे. जेवणांत हे लोक नेहमी ब्रेड, बटर, खारावलेले अथवा शिजवलेले मीट (बीफ) खात असतात. फळे टॉमॅटो वगैरें जेवणांत असतात हाच येथील आहार. पण आम्हा ७ भारतीयानी व ४-५ युरोपीयानी शाकाहारी भोजनाचा हट्ट धरल्यामुळें आम्हाला शिधा मिळें व आम्हीच स्वयंपाक करून घेऊन जेवत असूं पण डाळी वगैरे नसल्यानें आमचा आहार पूर्ण होत नसे.

आम्ही एकूण रस्ता २ फर्लांग केला.

८० फूट रुंदीचा रस्ता तयार करण्याचे काम अंतरराष्ट्रीय ब्रिगेडला देण्यात आले होते. जंगलामध्यें २० C. M. एवढी माती खरडून रस्त्याचा बेड तयार करण्याचे काम आमचे ! सर्वच लोक माती ओढण्याच्या गाड्या Wheel Barros, फावडी, शॉवेल्स व कुदळी Picks घेऊन रोज सकाळी ८ ते १२ वा. पर्यंत काम करित असून मध्यें १५ मि. स्नॅक्स (अल्पोपहार) मिळत असे. काम

करायला युरोपीयन मुले मुली आमच्यापेक्षा कितीतरी सरस ठरल्या. विश्रांती नाही ते एकसारखे काम करायचा त्यांचा काटकपणा आमच्या जवळ नाही हे आम्ही तेव्हांच ओळखले. या लोकांची जोडी करण्याचा मी मात्र आटोकाट प्रयत्न करी पण मग दुपारी इतका शीण येई कि ३-४ तास झोपून राहायचाच ! हे युरोपीयन मात्र लहानशी वामकुक्षी घेऊन हिंडायला फिरायला लागायचे तरी पण माझ्या वयाची चाळीशी जवळ येऊनसुद्धा मा इतके काम केले व मला ताप, आजार वगैरे कांहींच आला नाही याचे मला राहून राहून आश्चर्य वाटले. आमच्या भारतीय दलांत २५ वयातले सर्व युवक असूनही ते माझ्या इतके व एकसारखे काम करूं शकले नाहींत व नेहमी ते आपल्या विश्रामासाठीं माझी कामाची गति कमी करायची विनंती करीत असत.

कामाला प्रत्येक रविवारीं सुट्टी असे व त्या दिवशीं प्रवास अथवा कुणाचे भाषण वगैरें अशी व्यवस्था केली जाई. सुट्टीच्या वेळांत आम्हाला कोच, बसेसमधून घेऊन जाऊन एक लेक व हायड्रोलेटिक् पावर स्टेशन, पोरसेलीन फॅक्टरी, रोमन शिल्प अवशेष, एक Collective Farm व लहान लेक (ज्याचा केवळ पाणी पुरवठ्यासाठीं उपयोग होतो) व ओख्रदसारखे मोठे सरोवर अशी स्थळें दाखविण्यांत आली. शिवाय कुमोनोव्ह, स्कोपीयोसारखी शहरें दाखविण्यांत आलीच. स्कोपीयोमध्यें परराष्ट्रनीतीवर, समाजव्यवस्थेवर, राष्ट्राच्या आर्थिक रचनेवर व तबनोचेमध्यें Peoples youth वर व Communes वर अशी भाषणें झाली. भाषणानंतर प्रश्न वगैरें विचारायला भरपूर वेळ दिला जात असे व खूप चर्चा होई. भाषणापेक्षां प्रश्नोत्तरांतच फार वेळ जाई. पण मूळ विषयाचे चांगले आकलन होई.

रोज सायंकाळीं आम्हीं मित्रमंडळी मैल दीड मैल रस्त्यानें अथवा एखाद्या खेड्याकडे फिरायला जात होतो. आपापल्या देशा

बद्दलची माहिती सांगणें चाले. शिवाय युगोस्लाव्ह जनता भेटली म्हणजे त्यांचेबरोबर खुणेनी व एखाद्या तुटक शब्दानिशी बोलणी चालत. विशेषतः भारताबद्दल त्यानां फार कौतुक वाटले व नेखरू (नेहरू) इंदिया, न्यू देखली (न्यू दिल्ली) वगैरें कांहीं नांवें सांगून आपले भारताबद्दलचे ज्ञान व आपुलकी प्रगट करीत असत. आम्हीही परस्पर प्रेम व सलोखा प्रगट करण्यासाठीं नेहरू टीटो जिवियो, अथवा जिंदाबाद म्हणून त्यांना सांगून अलिंगन देत घेत असूं. ज्वारी व तूर आदी डाळी, ऊंस व ज्यूट सोडला तर बाकी सर्व पिकें उदाहरणार्थ मका, गहूं, थोडासा भात, कापूस, थोडा हरभरा, टोमॅटो, मिर्ची आदी पिकें येथें होतात. मिर्ची विलायती ढबू पद्धतीची. त्यामुळें तिखट नाहींच. मग पिकाबद्दल चर्चा होऊन, कुणाचे पीक जेर्बो (चांगले) असे प्रश्न चालत. मी नेहमींच आमचे पीक चांगले असे सांगे. खूप गप्पा चालत. आम्हाला सिगरेट देत, मी ओढत नाहीं असे सांगे. अशा गप्पा करून आम्हीं सायंकाळीं परत येऊन जेवण करून मनरंजनाच्या कार्यक्रमाला हजर रहात असूं. ३।४ वेळां Documentary Films दाखवत व प्रत्येक दिवशीं कोणत्या तरी देशाच्या ग्रुपचा मनरंजनाचा कार्यक्रम चाले. सर्वच परदेशी पद्धती. तरी पण नाविन्यानें पहात असूं. मनरंजनात मुख्यतः गाणी, नाच, वाद्य वादन व मूक नाट्य असे. आमच्या भारतीय समुहानर्फे कार्यक्रम झाला नाही. मी खूप करायला उत्सुक पण माझे जोडीदार उत्सुक नसत. पण ३०-७-६१ रोजीं शेवटचा दिवस. सर्व देशांचे कार्यक्रम ठरले व आम्हावर पाळी आली. श्री भागवत यांनीं Mouth organ वर २-३ गाणी वाजविली व मी सेवादलाचे गाणें 'आज नया नारा' हे म्हणून दाखविले. आमचा कार्यक्रम कांहीं तसा उत्तम नव्हता. पण भारतीय दलाचा कार्यक्रम या कौतुकानें प्रेक्षकांनीं खूपच टाळ्या वाजवून आमची वाहवा केली. माझ्या गाण्याला टाळ्या पडणार नाहींत, माझा आवाज बरोबर नाही

म्हणून मी गाणे आधी म्हणावे व भागवतानी बाजा नंतर वाज-वावा असे ठरले. पण मजा अशी कीं, माझा आवाज छानच लागला. गाणे छान झाले व लोकांचा टाळ्यांचा गजर झाला व मला खूप आनंद वाटला.

शिबिराच्या वेळेंत मी ब्राझील, फ्रान्स, इग्लंड, पोलंड, घाना, ट्युनिशिया, अर्जेंटिना, चीन, सिलोन वगैरें देशाबद्दल बरीच माहिती गोळा करूं शकलो. त्या त्या देशाच्या लोकांना भेटून विचारांची देवघेव चाले. युगोस्लाव्हियाची माहिती तर सर्वांगिण झाली. कारण या अवघींत युगोस्लाव्हियावर बरीच अभ्यासात्मक भाषणें झाली. देश फिरलो व खूप माहिती मिळविली.

जगांतील अनेक देशांचे लोक आल्यानें त्या त्या देशांच्या चालीरिती, सस्कृति, राहणी याची खूप माहिती झाली. कोणत्याच देशांत धर्माला व जातीला स्थान राहिलेले नाहीं. पण आमचा देश धर्म व जातीपातींच्या बंधनांत जखडलेला असल्यानें आमच्या देशाची प्रगती किती मंदगतीनें होत आहे याची पूर्ण जाणीव मला झाली व या परिस्थितीबद्दल वाईट वाटले. पण धार्मिक विचारांत आमचे वैदिक तत्वज्ञान सर्वांपेक्षां श्रेष्ठ व अत्यंत तर्कशुद्ध असे तत्वज्ञान आहे असे चर्चेनें वाटले व मी मित्रांना थोड्याफार प्रमाणांत पटवून दिले. विशेषतः आमच्या धर्मांतील पुनर्जन्म, अहिंसा, सर्वभूत हित, परमात्माच्या अस्तित्वाची कल्पना वगैरें मित्रांना आवडली. आमच्या धर्मांच्या रूढी (प्रघात) बद्दल मात्र मी जेव्हां विचार केला तेंव्हा असे वाटले कीं या जर परकियापुढें सांगितल्या तर ते याला हंसतील व आमच्या तत्वज्ञानाचेच हंसे होईल.

Peoples youth of Yugoslavia ही एक कम्युनिष्ट पार्टीची युथ संघटना असून तिला सरकारी मान्यता आहे, ग्रँट आहे, सबसिडी आहे आणि काय नाहीं ? या संस्थेचे काम म्हणजे सरकारी काम चालल्यासारखे ! कशाला कमी नाहीं, त्यामुळेंच

या संस्थेनें I. B. ची व्यवस्था अमाप पैसा खर्च करून केली. आम्ही तर परदेशांतील संस्थांचे प्रतिनिधि. आमची बेलग्रेडमध्यें हॉटेल (मास्कोआ) मध्यें राहण्याची व्यवस्था. सर्वकडे कारमधून फिरायची व्यवस्था. रेल्वेचे तिकीट, सीट सर्वांकांहीं उत्तम व्यवस्था झाली. सुदैवानें परदेशसंबंध समितीच्या चेअरमन मि लॅटिकामला कॅंपमध्यें आल्यावेळीं भेटल्या. खूप १ तास बोलत बसलो होतो. विचारांची देवघेव खूप झाली. ऐकून खूपच समाधान झाले. तिलाही माझे विचार ऐकून आनंद झाला व तिनें मला ४ दिवस जास्त, पाहुणा म्हणून राहायची विनंती केली व मला ती मान्य करून रहावे लागले. व्यवस्थाही फारच छान केलेली होती.

या देशांतील तरुणांत National Brigades मध्यें केवढा अदम्य उत्साह ! हजारोंच्या संख्येनें तरुण आज देशाच्या कामावर लागलेले. अशी एखादी संघटना आमच्या देशांत सुरू होईल व त्याला सरकारमार्फत पूर्ण सहाय्य व मान्यता मिळेल तर आमच्या देशाची प्रगती फारच झपाट्यानें होणें शक्य आहे. P. Y. चे काम पाहून आमच्या भारत सेवक समाजाची कींव आली. वाईट वाटले.

कॅंपतर्फे आम्हाला कुमानोव्ह, स्कोपिया, टिटोव्हिलेस, ओख्रीद, स्थोबी (रोमन अवशेष) बेलग्रेड, टिटो, याड, बिटोला आदी शहरें, प्रेसपान्सो, ओख्रीद, माक्रोवा आदी सरोवरें, स्तोबी येथील रोमन अवशेष, माक्रोवा येथील हायड्रो इलेक्ट्रिक स्टेशन, टिटोवामधील कास व पोरसेलीन हाऊस वेअर कारखाना, चर्चे, मशीदी वगैरें दाखविण्यांत आली. बेलग्रेडमध्यें मजसाठीं खास टेलिफोन व रेडियो फॅक्टरी दाखविणेंची व्यवस्था करण्यांत आली होती. पण मला अवचितच व्हिएन्नाला निघावे लागले. कारण पुढें माझा Visa संपत होता. म्हणून मला विमानतळावर स्पे. गाडीनें पोहोंचविण्यांत येऊन निरोप देण्यांत आला, सोबत श्री निकोला व शेठ आले होते.

व्हिएन्ना (ऑस्ट्रीया)

विमान सर्व्हिसच्या कारणानें निर्दिष्ट वेळेपेक्षां, मी १ दिवस आधींच व्हिएन्नाला निघालो. दुपारीं ४ वाजतां बेलग्रेड सोडले. Austrian Airlines चे व्हिसकौंट ६५४ विमान फारच छान, व्यवस्था उत्तम. आज प्रथम मला London Times English News Paper विमानांत वाचायला मिळाले. ५-३० ला व्हिएन्नाला आलो. केवढे लांब रुंद शहर हे! विमानतळावरून गांवांत येईपर्यंत मला मोटारीनें अर्धा तास लागला. पुढें मग हॉस्टेल शोधायचा उद्योग. मी गांगरून गेलो. अवाढव्य गांव शिवाय हॉस्टेलपर्यंत बस किंवा ट्राम व्यवस्था नाहीं. चालत जाण्याच्या अंतरापेक्षा खूप दूर हे हॉस्टेल. काय करावे कळेना. सायंकाळ होऊं लागलेली, मी अनेक लोकांना रस्ता विचारला, अनेकांनीं लहानापासून तो म्हाताऱ्यापर्यंत सर्वांनीं मदत (मार्गदर्शन) केली. थोडा ट्रामनें व नंतर पायीं अमा शेवटीं रात्री ८ वाजतां हॉस्टेलला येऊन लागलो, समाधान वाटले. काय सुंदर हॉस्टेल हे! एखादे सुंदर हॉटेल झक मारेल अशी एथील व्यवस्था. एकूण ३४० बेड्सची व्यवस्था. सुंदर पलंग, गाद्या, गरम पांघरुणें, सामान ठेवायला कपाटें. हँगर, सुंदर टॉयलेटची व्यवस्था, गरम पाण्याचे नळ व कारंजासुद्धा. मी तर हॉस्टेलमध्यें गेलो व लगेच कपडे वगैरें धुवून गरम पाण्यानें अभ्यंगस्नान केले. पण हे शहर अत्यंत महाग असे आहे. गरीबानें रहायची सोय नाहीं. विमान तळापासून गांवांत यायला २० शिलींगिन (१ पौंड म्हणजे ७१ शिलींगिन) द्यावे लागले. एथून टॅक्सी करून हॉस्टेल पर्यंत यायला टॅक्सीवांला ४० शिलींगिन मागूं लागला. पण मी ट्रामनें केवळ ३ शि. मध्यें आलो. हॉस्टेलचे भाडे रोज १७ शि. ब्रेक फास्ट वगैरें सर्व चार्ज निराळा. शेवटीं एकदां व्हिएन्ना हॉस्टेलमध्यें येऊन उतरलो. २ दिवसाचे भाडे वगैरें देऊन अंथरु-

गावर थोडा वेळ अंग टाकले. मी यायला ८ वाजलेले. त्यामुळें हॉस्टेलमध्यें तर जेवण मिळालेच नाहीं व बाहेरही फार महाग म्हणून घेऊच नये असे ठरवून रात्रीं ९ च्या सुमारास अशाच एका नवपरिचित स्विस मित्राबरोबर जाऊन कॉफी घेऊन आलो. एक कप कॉफीची किंमत ३॥ शि. या स्विस मित्राचें नांव मार्कस मुल्लर. हाच माझा झ्युरिचमध्यें यजमान झाला.

ता. ५ ला सकाळीं ५ वा. उठलो, प्रातर्विधी अटोपला. ऊन पाणी असल्यानें कारंज्याखालीं स्नान केले. थोडेफार लिहिले, ब्रेकफास्ट केला व बाहेर निघालो. येथून कार्लप्लाटझला ट्यूबट्रेनचे तिकीट ३ शि. या भागांतच बहुतेक सर्व प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. पैसे जास्त जाईनात कां, पण व्हिएन्ना शहर दोन दिवस पाहून डोळ्याचे पारणें फिटले. ऑस्ट्रियाचे लोकच मुळीं सौंदर्योपासक असावेत असे वाटते. त्यांत येथील राजे लोकांनाही वस्तूकलेची व सौंदर्याची आवड फार. त्यामुळें त्यांनीं शतकानु-शतकें बांधविलेल्या इमारती कशा अगदी नवीन अशा राखून ठेवलेल्या आहेत ! या शहरांतील रस्तें, इमारती सर्वच प्रेक्षणीय. एखादी सुद्धा ओंगळ इमारत नांवाला मिळावयाची नाहीं. येथील दुकानें तर अशी सजविलेली आहेत कीं, मला वाटते अशी सजावट आणखी कोठें पहायला मिळेल किंवा नाहीं शंकाच आहे. लोकहि तितकेच सौंदर्यप्रेमी. पुरुष असोत अथवा स्त्रिया असोत, तऱ्हेतऱ्हेचे पोषाख घातलेले. स्त्रिया गळ्यांत-कानांत मौक्तिक माळा, सोन्याच्या साखळ्या, हातांत आंगठ्या, केशभूषा सुंदर सजवलेली, लोक स्वभावानें तितकेच चांगले आहेत. परकीय मनुष्यानें कांहीं विचारले कीं, त्याला पूर्ण मार्गदर्शन करायचेच !! अशी येथील ठेवण असल्यावर ही नगरी इतकी प्रेक्षणीय कां बरे होणार नाहीं ? सध्या इंग्लंडमध्यें घोडागाड्या (Victoria) आहेत किंवा नाहींत कोण जाणें ? पण व्हिएन्नांत आहेत व त्याही सुंदर सजवलेल्या स्थितींत चालू आहेत व त्यांत बसून जाणारे शौकीन लोकहि आहेतच.

बाकी सर्व शहराचे दळणवळण जवळजवळ ट्रॅम, बस व टूरिंग-कार यांनीच जास्त होते. पायी चालणारे लोकहि खूप, पण सायकल फार कमी आढळते. रस्तें चांगले व रुंद, बाजूला फूटपाथ असलेले व रस्ता ओलांडावयाच्या जागा ठरलेल्या. रहदारीचे नियंत्रण दिव्यानें केले जात असते प्रत्येक चौकांत एक पोलीस उभा असतो. काय सुंदर पोषाख पोलीसांचे! (नाहींतर आमच्या भारताचे पोलीसांचे!) मोठमोठाले चौक ओलांडायला Escalatorg भूमिगत विद्युत्चलित इंजिनें असलेले रस्तें असून, त्या भूमिगत रस्त्यामध्येंहि दुकानें, हॉटेल वगैरें सर्वकांहीं किंबहुना वरच्यापेक्षाहि सुंदर सजावट असलेली दुकानें वगैरें आहेत. त्यामुळें विश्रांतीला भूमिगत भागांतच जावे असें वाटतें बहुतेक सर्व इमारती बहुमजली असून सर्वकडें विजेच्या जिन्यांची व्यवस्था आहे व्हिएन्ना शहराची वस्ती २०,००,००० आहे. पण शहर आमच्या मुंबई शहरापेक्षा थोडे मोठेच भरेल असे अगदी विस्तारित व सुसज्जित आहे. ऑस्ट्रीय देशाची वस्ती एकूण ६०,००,००० त्यांत व्हिएन्नाची $\frac{१}{३}$ वस्ती आहे. शहरांत ठिकठिकाणीं बागा, विश्रांतीची स्थानें, पुतळे, कारंजें, सर्वकांहीं वाखाणण्यासारखे आहे. जवळ जवळ दोन ताम मी कलॅल्लाट्स जवळील रींग भागांतील व्यवस्था पाहण्यांत घालविले व नंतर कार्लस्चर्च पहायला गेलो. हे चर्च इतर चर्चांसारखे उंच, गगनभेदी मनोऱ्यांचे नसून गोलघुमटाचे आकाराचे व मुख्य दालनासमोर दोन उंच मनोरे असलेले आहे मी आंत गेलो तर सर्व चर्चभर नक्षीकाम ख्रिस्तियन पुराण कथांचे पेंटींगस् असे असून समोरच्या गाभाऱ्यांत येशू ख्रिस्ताची प्रतिमा व क्रास अत्यंत शृंगारलेली. सर्व चर्च दिव्यांच्या झगझगाटानें शोभून दिसते. माडीवर चर्चचा ऑर्केस्ट्रा आहे. अनेक अलगुजे लावलेला. मी जेव्हां आंत गेलो त्यावेळी अनेक लोक आंत बसलेले होते. मी सर्व चर्च पाहिले व थोडावेळ बसलो तो घंटा वाजली ऑर्केस्ट्रा सुरु झाला व चर्चचा धर्मगुरु बाहेर आला त्यानें सर्वांना आशिर्वाद दिला, व नंतर तेथे एक लग्न

समारंभ होता त्यावेळी त्यानें वधू-वराना उपदेश देऊन आशिर्वाद देऊन ते लग्न लावले मला एक अजीब समारंभ सहजच पहायला मिळाला.

येथे प्रसिद्ध असलेले स्टिकेनडम चर्च ही पाहिले. याचे मनोरे गगनभेदी असे असून त्याचे कळस ग्रणकुचीदार असे आहेत आतील भाग फारच उंच व नक्षीकामानें व चित्रकलेनें सजविलेला आहे. भिंती सर्व संगमरवरी आहेत. नक्षीकाम सर्व चुका सिमेटनें केलेले असून अनेक धर्मगुरु व सम्राटांचे पुतळे सिंहासनावर बसलेले अथवा उभे राहिलेले असे आहेत. या चर्चमध्येंही बरीच भाविक मंडळी होती. आरती चालली असावी धर्मगुरु उपदेश सांगत होता, ऑरकेस्टा चालू होता. पाहून समधान वाटले. आमचेकडे नक्षीकाम शीलेमध्यें कोरलेले, तर इकडील चुनेगच्चीत हा मोठा आमचेकडील व इकडील फरक आहे. पण कोणतीही गोष्ट जपून राखून ठेवण्याची या लोकांची केवढी हौस ! आजही या सर्व इमारती नवनवीन आहेत असे वाटते. जुनी चर्चेस व जुन्या स्मरणार्थ बांधलेल्या इमारती त्यांतील पुतळे नक्षीकाम खूपच पाहिले.

दुपारी स्टेटस् ऑपेरा पहायचे ठरले. हे एक जुने राज्य नाट्य गृह असून ही इमारत १० व्या शतकांत बांधलली असून सर्व संगम रवरी, सोनेरी रंगकाम केलेली, निरनिराळ्या चित्रकला रंगवलेली व सजविलेली अशी आहे. खास व्यवस्था, खाजगी व्यवस्था, व सार्व जनिक व्यवस्था मिळून एके वेळी २५०० प्रेक्षक बसतील अशी व्यवस्था येथें असून याचे स्टेज ५०' × ५०' × ६०' असे मोठे असून स्टेजचा कोणताही भाग मागे, पुढे, वर, खाली, करता येतो. रोलिंग स्टेज आहे. नाटकाला, नाचाला, गाण्याला सर्व तऱ्हेच्या कार्यक्रमाला उपयोगी पडण्यासारखी व्यवस्था सर्व कांही आहे. प्रत्येक नटासाठीं रंग खोल्या (खोल्यासारखे रंगमहाल) आहेत. अंदाजे १००-१२५ लोकांचा ऑरकेस्टा बसेल येवढी जागा आहे. छतावर सोनेरी मुलाम्याची खूपच चित्रे रंगवलेली आहेत. स्वतः

राजाना व पाहुण्या मंडळीना बसायची जागा खास व्यवस्थेची अशी आहे. हे नाटचगृह बांधायला त्यावेळी अंदाजे १० कोटी रू. लागले म्हणें ! पण पुढें दुसऱ्या महायुद्धात याचेवर बॉम्बफेक झाला व याचा बराच हिस्सा मुख्य म्हणजे रंगपट वगैरे सर्व नासधूस होऊन गेला १९४५ पासून पडलेला भाग परत बांधायची सुरवात होऊन तो भाग १९५५ साली पूर्ण झाला. त्याला परत १० कोटी रुपये लागले म्हणें ! अधुनिक बांधणीमुळें स्टेजवरील आताची सर्व व्यवस्था स्वयंचालित अशी करण्यात आली आहे. सिनेमा, टेलिव्हिजन वगैरेचीही व्यवस्था करण्यांत आली आहे. नाटचगृहांतील जे नवीन काम (नक्षी वगैरे) अगदी जुन्यासारखे बनवण्याचा प्रयत्न झालेला आहे. पण जे कांही जुने भाग शाबूत राहिलेले म्हणतात ते पाहिले म्हणजे जुन्या कलाकुसरीची सर नव्या कामाला येणेंच शक्य नाहीं असे वाटते.

हे नाटचगृह जगप्रसिद्ध असे असून या सारखे नाटचगृह जगांत क्वचितच कोठेतरी पहायला मिळेल असे वाटते. याचे तिकीट ६ शि. असूनही लोकांचे थवेच्या थवे पहायला हजर असतात म्हणून निर निराळ्या भाषेच्या लोकाना त्यांच्या त्यांच्या भाषेंत सर्व माहिती करून देणारे दुभाषें असून ते जवळ जवळ १ तासात पूर्ण मार्ग दर्शन करून सर्व माहिती समजावून सांगतात.

मी अनबर्न कॅसलही पाहिला. काय तो सुंदर राजवाडा, काय ती सुंदर बाग, काय ते बागेतील उत्तमोत्तम पुतळे व शेवटी उंच-वटचावर कारंजे, बागा व विजय मंदिर संगमरवरी बांधणीचे ! या विजय मंजिलावर उभे राहिले म्हणजे सर्व व्हिएन्ना शहर दिसते. इतके हे उंच आहे. याच राजवाड्यांत क्रुश्चेव व केनडी यांची भेट व जेवणें झाली होती म्हणतात. हा राजवाडा कैसरनें विजय स्मारक म्हणून १९ व्या शतकाच्या शेवटी बांधवलेला असल्यानें अत्यंत नवीन व सुंदर स्थितीत पहायला मिळतो. याची बाग तर

विस्तृत अशी असून बागेच्या प्रत्येक विभागाची ठेवण, त्याचे सुंदर रस्ते, बागेतील वृक्ष, सर्व कांहीं निरनिराळे! या बागेचे वैभव काय वर्णावे?

व्हिएन्ना शहर उन्हाळ्यामध्यें परदेशी प्रवाशानी गजबजलेले असते. पण प्रत्येक ठिकाणी जबर तिकीट लावलेलें! विद्यार्थ्यांसाठीं अर्धा चार्ज! मी जरी विद्यार्थी म्हणून अर्धा चार्ज दिला तरी माझा जवळ जवळ १ पौंड तिकीटामध्येंच खर्च झाला. शिवाय Conducted Tours बसेसनी सर्व पहायची व्यवस्थाही आहे. मग त्या किती महागाईच्या याचा विचारच करवत नाहीं.

एकूण व्हिएन्ना राज्य प्रवाश्याकडून खूपच पैसा ओढते आहे असे म्हणावे लागते. पैसा जाईनाका पण शहर तरी प्रेक्षणीय आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

आगींतून उठलो व फोफाट्यांत येऊन पडलो!

परदेश भ्रमण आज पर्यंत मला अत्यंत सोपे वाटले होते. पण ते किती कठीण आहे याची कल्पना येण्यास आजपासून सुरवात झाली. मी युथ हॉस्टेलर आहे, मला सर्वंकडे व्यवस्था सहजच मिळणार आहे हा माझा भ्रम आज फोल ठरला. आज मी व्हिएन्नाहून म्युनिचला आलो व युथ हॉस्टेलमध्यें गेलो तो माझे वय २५ पेक्षा जास्त आहे म्हणून जागा नाकारण्यत आली. बॅडॅन बरोबर मी खूप वाद विवाद, चर्चा, विनंती केली पण त्यानें मजसाठी कांहींच केले नाहीं. मला दुसरीकडे जागा शोधायच्या प्रयत्नास ४-५ तास फिरावे लागले. शहराची माहीती नाही. नुकताच या शहरात पाय ठेवलेला त्यात जागेचीही चणचण! खूप हॉटेले फिरलो, पण सर्व हॉटेले भरलेली, शिवाय ती भयंकर महागही! १ दिवसाला २० मार्क निव्वळ जागाभाडे, जेवणखाण खर्च वेगळा. मजजवळ तर पैसे अगदी थोडके. सर्व मिळून जर्मनीत खर्च करायला मजजवळ फक्त ६० मार्क.

यांत मला कमींत कमी म्युनिच व बर्लिन मिळून ५ दिवस काढायचे. आता हे कोष्टक सोडवायचे कसे ? जागेला पैसे द्यावे व मग पोटाला काय सांगावे ? मोठा विचित्र पेच प्रसंग पुढे येऊन उभा राहिला ! रात्री ८ वा. पर्यंत हातांत माझे सामान व मी हॉटेल शोधण्यांत फिरतच होतो. शेवटी ८ वा. हॉलंड हॉफ् नांवाचे एक हॉटेल धरावेच लागले. कारण वेळ नव्हता. रात्र होऊं लागली म्हणून 'आडला नारायण गाढवाचे पाय धरी' या नीतिनियमाप्रमाणें हॉलंड हॉफ्चा गेस्ट झालो. या हॉटेलचे भाडे अंदाजे रोज १० मार्क असावेसे वाटले, कारण मालकाला इंग्लीश वर्ज्य, मला त्याची जर्मन वर्ज्य ! असो ! येनकेन प्रकारनें आम्ही या हॉटेलांत विराजमान झालो. दुपारपासून फिरून फिरून अंग घामेघूम झालेले. डोळ्यांतून पाणी यायची वेळ आलेली. आतां हॉटेलांत हे सर्व दुःख विसरून जाण्यासाठीं जेवण करून गाढ झोप (विश्रांती) घ्यायचे ठरवले.

एक दिवसाची व्यवस्था झाली. मूळ प्रश्न जशाच्या तसाच राहिला. म्युनिच शहर पहायचे कां हॉटेले शोधायची कीं कांहीच न बघता लंडनला जायचे ? डोक्यात अनेक विचार येऊ लागले. कां ही परदेश प्रवासाची बुद्धी आठवली ? पैशापरी पैसा खर्च व अशी परिस्थिती आली म्हणजे बघायच्या नावानें पूज्य ! शेवटी म्युनिच व बर्लिन ही दोन शहरे ४ दिवसांत कशीबशी तिरपिट त्रेधा करून बघायची व १० ता. ला लंडनला जायचा विचार पुढे आला. कारण अशा परिस्थितीत हँबुर्ग, कोपन हेगन व अँमस्टरडॅमला जाणेंच शक्य नाहीं. अशी पाळी आलेली आहे.

हिंमतमर्दा तो मदद खुदा । धैर्याचा पाठीराखा परमेश्वर म्हणतात त्याप्रमाणें ता. ७ । ८ । ६१ ला सकाळी उठून एखादी स्वस्ताईची जागा मिळते कां पहावी या चिकाटीनें परत बाहेर पडलो तो रेल्वे स्टेशनवर एक भारतीय विद्यार्थी मुंबईचे श्री. देसाई भेटले. नमस्कार झाले तोंडावळाच आपुलकीचा वाटला व मी त्यांना

स्वस्त जागा कुठे सुचवाल कां? असा प्रश्न केला. लगेच त्यानीं सेंटपॉल कॉलेज हॉस्टेल मध्ये जागा मिळेल, रोजचा दर ३ मार्क असे सांगून धीर दिला. देसाईंचे आभार मानून हॉस्टेलकडे निघालो. वेळ सरळ लागली म्हणजे काय काय होईल सांगता येत नाहीं. या हॉस्टेलच्या ऑफीसमध्यें एक भारतीय विद्यार्थी श्रीं. रमेश वर्मा नांवाचा उभा होता. कारकूनास मी, मला जागा पाहिजे असे इंग्रजींत सांगितले. कारकुनास जर्मनशिवाय भाषा येत नव्हती. श्री. वर्मांनी लगेच आपुलकीनें माझें म्हणणें त्याला सांगितले व माझ्या बद्दल आपुलकीनें जागा देण्यास सांगितले. लगेच ते मला हॉस्टेल सुपरिटेंडंटकडे घेऊन गेले व जागा मिळवून दिली. एवढेच काय म्युनिच शहरांतील स्थळांची माहिती वगैरे सर्व कांही समजावून सांगितली. अतिशय आनंद झाला व आणखी दोन दिवस तेथेंच राहून ता. ९-८-६१ ला बर्लिनला जाणेंचे ठरविले.

दोन दिवस फिरल्यानें गांवाची माहिती जवळजवळ झालेलीच होती. गांव व्यापारी असून मुंबईसारखे मोटारी, ट्राम, बसेस, तितकेच पादचारी यांनी भरलेले असते. सायंकाळी दिव्यांचा झगझगाट, जागो जागों शृंगारलेली दुकानें, हॉटेले व कॅंटिन्स यामुळें विशेषतः रात्रीचें वेळीं गांव अगदी शोभून दिसते.

आज रोथहाऊस चर्च पाहिले. सकाळीं ११ वा. येथें घंटा वाजते ऑर्केस्ट्रा सुरू होतो. व स्वयंचलीत बाहुल्यांचा खेळ होतो. हजारो प्रवासी हे दिव्य पहायला बरोबर ११ वा. या चर्चपुढे उभी असतात. फारच छान अशी मौज वाटली. नंतर मग चर्चच्या मनोऱ्यावर गेलो येथून संपूर्ण म्युनिच शहर दिसते. शिवाय वर टेलिस्कोप बसवले असल्यानें कोणतीही जागा अगदी जवळून पाहिल्या सारखे वाटते. शहर पाहून नंतर डचेस् म्युझियमला गेलो.

डचेस म्युझिक जगांतील एक वैशिष्ठ्यपूर्ण अशी म्युझियम आहे. ही एका नदीच्या छोटयाशा बेटावर असून याचा बराच भाग भूमिगत आहे. मुख्यतः या म्युझियममध्यें भूगर्भातील खोद-कामाचे प्रात्यक्षिक, मशिनरी, विमान, रेडियोपर्यंत सर्वकांहीं खुली ठेवलेली असून आपण कोणत्याही यंत्रावरील बटन दाबून त्या त्या यत्राचे काम कसे चालते हे पाहूं शकतो. मोटारी, रेल्वे गाडया, यंत्रें अगदी पुरातन नमून्यापासून ते अत्याधुनिक मोटार गाडयापर्यंत सर्वकांहीं प्रात्यक्षिक करून दाखवलेले आहे. मी आजवर खूप म्युझियम पाहिल्या, पण असली म्युझियम मी ही एकच पाहिली. सामान्यतः म्युझियम म्हणजे जुने कपडे, ढाली, तलवारी, फुटकी भांडी, जुनी नाणी वगैरें यांचाच संग्रह असतो. त्यामुळें वरचेवर तेच तेच काय पहायचे असें वाटून म्युझियम टाळावी असें वाटे. पण लोकांनीं ही फार चांगली आहे असें सांगितल्यावरून १ मार्क देऊन मी आंत गेलो तो काय एकदम आम्ही आंत आंत तळघरांत म्हणजे खाणीच्या खोली इतके खोल गेलो व खाणीचे खोदकामाचे प्रात्यक्षिक, त्यांची मशिनरी, खाणीमधून वाहतूक, पाण्याचा निचरा कसा केला जातो वगैरें अनेक नवीन प्रकार पाहूं लागलो व मग थोडे वर येतो तो सर्वप्रकारची जुनी व नवी मशिनरी मग ते घडयाळ, वाद्य असो का सायकल ते विमान, जेट असो. जेट तत्वाचे प्रात्यक्षिक दाखवले गेले. मी तर चकित झालो. या म्युझियमचे शैक्षणिक मूल्य किती आहे याची कल्पनाच करवेना. विद्यार्थ्यांनीं अशी म्युझियम पाहिली (अर्थात विद्यार्थी कांहीं कांहीं भाग फार चोकसबुद्धीनें पाहतात व कांहीं यंत्रें चालवायचे प्रात्यक्षिक करत असतात. यांतच त्यांच्या पुढील आवडीनिवडी सहज तयार होतात हे मी प्रत्यक्ष पाहिले) म्हणजें त्यांचा पुढील जीवनाचा मार्ग कोणता हे त्यांचे तेच सहजच ठरवतात व त्याबद्दलचे धैर्य व आवड त्यांचे मनांत ताबडतोब निर्माण होते. मी अर्धे वय संपलेला असूनही आकर्षिला गेलो व असे वाटले कीं मी जर माझ्या विद्यार्थीदशेंत इकडे आलो

असतो तर खास मी एक यंत्रविज्ञ झाल्याशिवाय मायदेशी परत गेलो नसतो. असो. इतकी अमूल्य अशी ही म्युझियम पहायला मिळाल्यावर काय विचारता? मी तब्बल ४ तास याच म्युझियम-मध्यें खर्च केले.

इथेंच आणखीही म्युझियम आहेत. एक चित्रकलेची, एक खेडवळ राहणीची, शेतकी व्यवसायाची, बागकामाची, व राज-घराण्यांतील पोषाखांची. मी यांतील चित्रकलेची व खेडवळ राहणीची पाहिली.

बव्हेरियाचा पुतळा फारच उंच म्हणजे अंदाजे ५० फूट असून तो सिंहावर हात ठेवून, हातांत फुलें घेऊन उभा असलेला आहे. पुतळा ब्रॉंझचा आहे. एवढा मोठा पुतळा असूनही मूर्तीच्या चेहऱ्यावरील सुरेखपणा व मोहक सौंदर्य सहज स्पष्ट उठून दिसण्यासारखे आहे. ही मूर्ती या बव्हेरिया देशाची देवताच मानली जाते म्युनिच गांवांत मोठमोठ्या ठिकाणीं बव्हेरियाचे छोटे मोठे पुतळें खूपच आहेत. मार्कस् II व कार्लोस II चे पुतळेही खूप भव्य व चांगले आहेत. पार्लमेंट हौसकडे जाणाऱ्या राजपथावर जागोजागीं बव्हेरियांतील महापुरुषांचे पुतळे आहेत व गांवभर कमानी आहेत. कमानी एवढ्या मोठ्या आहेत कीं, त्यांतून बसेस, ट्रॅम्स वगैरें सर्व वाहतूक होत असते. कमानींचेगांव पाहिल्यावर आपल्याकडील बडोदा, जयपूर, ग्वाल्हेरची आठवण होते. या सर्व कमानी म्हणजे त्या त्या वेळीं बांधलेल्या विजयोत्सवांतील कमानी आहेत. विजय मंदिरेंही खूप मोठी व रोमन शिल्प पद्धतीची बांधलेली आहेत. पॉगिलॉन हा भाग ३ अमोरासमोर बांधलेल्या विजय मंदिराचा एक मोठा चौकोनी विभाग आहे. या चौकांतच हिटलर आपली स्फूर्तिदायक भाषणें करीत असे. म्हणून या चौकांत अंदाजे १ लाख लोक सहज बसतील एवढी जागा असून सर्व जागा बांधीव आहे. प्रिन्स कॉर्लस पॅलेस व गार्डन व त्याचे

विजय मंदीर पाहिले. फारच भव्य व सुंदर असे बांधकाम आहे. मुख्य पॅलेसवर दुसऱ्या महायुद्धांत बॉंबफेंक झाल्यानें बरीच नासधूस झालेली आहे. गार्डन फारच सुंदर अशी आहे.

म्युनिचमध्यें चर्चें अनेक असून अनेक नमुन्याची बांधणी असलेली आहेत. आंतील नक्षीकाम व रंगकाम फारच सुंदर असे आहे पण बहुतेक सर्व नक्षीकाम चुनेगच्चीत केलेले आहे (प्लॅस्टर मध्यें) त्यामुळें आम्हा भारतीयांना जेथें शिल्पात कोरीव काम इतकेच सुंदर पहायला मिळते त्यानां या कामाचे इतकेसे नवल वाटत नाही तरी पण या इमारतीमात्र गगनचुंबी व भव्य अशा असून त्यांची निगा एक सारखी राखली जाते व ही जुनी असूनही नेहमीच रंगरंगोटीं चालत असल्यानें नवीनच अशी वाटतात. या मोठमोठाल्या चर्चेसची व्यवस्था त्या त्या चर्चसंस्था मार्फतच असून नेहमी खूप भाविक लोक चर्चमध्यें बसून प्रार्थना करीत असतात. देवाची मेणबत्तीनें आरति करणें, घंटा वाजविणें, संगीत सेवा करणें, हात जोडून नमस्कार करणें, देवापुढें कांही सुवर्णपुष्प ठेवणें, वगैरे बऱ्याच गोष्टी भारतीय हिंदू पद्धतीशी मिळत्या जुळत्या वाटतात. आपल्याकडे जसे एका मंदीरात एक मूर्ती शिवाय मंदिराच्या दालनात इतर मूर्ती पहायला मिळतात त्याचप्रमाणें चर्चच्या प्रत्येक दालनात निरनिराळे धर्मगुरु व क्रॉस यांची प्रतिष्टापना व त्या मूर्तीची पूजा पहायला मिळाली हे मला मोठे विचित्र असे वाटलें व मौज ही की लोकही मूर्तींपुढे बसून वेगवेगळी प्रार्थना करीत असतात.

म्युनिच म्युझियम ही म्युनिच व आजूबाजूच्या विभागांतील गेल्या ३–४ शतकांतील लोकांची व राजाची राहणी, घरगुती वस्तू शृंगाराची साधनें, चित्रकला, वगैरेनी भरलेली आहे. या सर्व वस्तू पाहून या विभागांतील लोकांचे जीवन बऱ्याच कालापासून संपन्न असे आहे व युद्धाची झळ या भागाला फारशी लागलेली नाहीं हे स्पष्ट दिसून येते कारण ३–४ शतकामध्यें तरी हा भाग नाशाचा खाईत सांपडलेला दिसत नाहीं वस्तू फारच सुंदर अशा आहेत.

'म्युझियम फॉर व्हॉल्कटकुंदे' ही भारतीय व द. अमेरिकन पुरातन वस्तूंचीं म्युझियम पाहिली भारतीय वस्तूत बुद्धकालांतील मूर्ती, नक्षीकाम, संगीताची साधनें वगैरे फारच सुंदर आहेत वैदीक व हिंदू धर्मातील मूर्ती, दशावतार, जगदंबा, शिवपार्वती नर्तकी, रंभा, नटराज वगैरें मूर्ती काष्ठात कोरलेल्या तर कांही शिल्पात कोरलेल्या उत्तम स्थितीत आहेत. आम्ही आमचेकडे ज्या मूर्ती पाहतो त्या कान तुटक्या नाहीतर नाक, हात तुटक्या म्हणजे कांही अंशी भग्न झालेल्या अशा पाहतो पण इथे मात्र या सर्व मूर्ती उत्तम स्थितीत आहेत. याचे विलक्षण आश्चर्य वाटते. एक दगडी गणपतीची मूर्तीसुद्धा (उजव्या नाहीं पण डाव्या सोंडेचा) पहायला मिळाली व आनंद वाटला. भारतीय कला जर्मनानी किती जपून ठेवलेली आहे याचे कौतुक वाटते व याबद्दल त्यांचे आभार मानावेसे वाटते व त्यांच्या या पुरातत्व प्रेमाचे धडे आम्हीही कांही अंशी शिकावेसे वाटते द. अमेरिकन कलेचे पुरातन नमुनेही आहेत पण मला त्यात एवढे गम्य नाहीं. भारतीय भागात एक पुरातन कानडी ग्रंथ व कांही संस्कृत कोष्टके (बहुतेक ही कोष्टके ज्योतिष शास्त्राची असावीत कारण त्यावर चौकोन आंकडे वगैरे आहेत.) आहेत. म्युझियम मधील नोकरानी मला या देवनागरी व कानडी लिपीबद्दल विचारले मी त्याला दोन्ही लिप्या व त्यांचीं नांवे लिहून दिली त्यानी मला धन्यवाद दिले.

बर्लिन

दि. ९-८-६१ रोजीं सांयंकाळी ५ वा. बर्लिनला येऊन पोहोंचलो. विमानतळ शहराचे मधोमध आहे. त्यामुळें विमान शहरा वरूनच येते त्यामुळें विमानातून शहराचा देखावा पहायला मिळाला. शहर फारच विशाल पसरलेले आहे व जवळ जवळ सर्व शहरभर नदी अनेक प्रवाहानें वळसे घेत घेत वाहते. त्यामुळें नौका विहार मच्छी

मारी अशा अनेक कारणानी ही नदी शहराची शोभा वाढवते आहे. केवढा मोठा जनसमुदाय या शहरांत राहत आहे !

पण आज या शहराचे भवितव्य धोक्यात आहे. बर्लिन शहराबद्दल पश्चिम बलसमूह व पूर्व बलसमूहामध्यें दीर्घ कालीन चालत आलेला तंटा आतां विकोपाला येऊं लागला आहे व युद्धाची आग ! आता युद्ध कसले ? आतांचे युद्ध म्हणजे सर्व नाशच अगदी जवळ येणार कों काय असें वाटूं लागले आहे. रोजची वर्तमानपत्रें वाचली म्हणजे एकेकडून क्रुश्चेव्ह दुसरीकडून कॅनेडी, होम यांच्या गर्जना चालू आहेत. दोन्हीं समुहाना सैनिक, आर्थिक, औद्योगिक शक्ती येथें लावलेली आहे. व त्यांत तो कोणताही रचनात्मक बदल करूं इच्छित नाहीत हा त्यांतील मूळ मुद्दा. दोन्ही शक्ति समूहांच्या मानाचा प्रश्न आहे. व आपला मान राखण्यासाठीं (त्यांच्या सध्याच्या वर्तनाला युद्ध होणार कि काय ?) सर्व जग युद्धाच्या खाईंत सांपडणार कि काय असे वाटू लागले आहे. मानव हाच सर्व भौतिक शक्तीचा निर्माता. सर्वाबरोबर पाशवी शक्ती त्यानेच निर्माण केली व त्याच शक्तीच्या जोरावर आज तो सर्व मानवताच विसरून मनवतेचा संहार करायला तयार झालेला आहे. हा भयंकर प्रसंग अशा परिस्थितींत जर्मन नागरिकांची व विशेषत: बर्लिनच्या नागरिकांची मानसिक स्थिती कशी झाली असेल ? कल्पना करवत नाही. कोणा जर्मनांच्या अंतरंगात शिरल्याशिवाय कल्पना करता येणें शक्य नाहीं. याच बर्लिन शहरांतून १ ले व २ रे महायुद्ध उद्भवले व आतां ३ ऱ्याचे कारणही व त्याची ठिणगी येथेंच पडणार कीं काय ?

येथील प्राणिसंग्रहालय फारच मोठे आहे. जगांतील जवळ जवळ सर्व प्राणी येथें आहेत. त्या त्या प्राण्यांच्या राहण्याच्या पद्धतीप्रमाणें त्या त्या प्राण्याची राहण्याची व्यवस्था केलेली असून आहारही त्याना जो आवडतो तोच घालतात. लहान सहान चिमण्या

तील अनेक प्रकारा पासून तो हत्ती पर्यंत व जलचरांत लहान माशापासून ते पाणघोडे व व्हेल माशांपर्यंत सर्व जलचर ठेवलेले आहेत. आजपर्यंत मी कोणत्याही प्राणी संग्रहालयांत जीवन्त व्हेल मासा, पाहिला नव्हता व कांगरु पाहिले नव्हते ते मी येथें पाहिले.

जुने प्रा. चर्च हे युद्धकाळांत बॉम्बफेकीमुळें पडून गेले आहे. पण त्याचा मनोरा बऱ्याच अंशी शाबूत असल्यानें तो जसाच्या तसाच ठेवण्यांत आल्यापासून उध्वस्त झालेल्या चर्चेस मात्र नव्या अधुनिक अमेरिकन बांधणी पद्धतीनें बांधण्यांत येऊ लागल्या आहेत. बांधकाम चालू असलेनें आम्हाला आंत जाऊन पाहायला प्रवेश मिळाला नाहीं.

ऑलंपिया गॅलरी पाहिली. जागतीक ऑलंपिक सामन्यासाठीं ही गॅलरी खास बांधण्यांत आलेली असून १ लाख प्रेक्षक सहज बसून सामने पाहू शकतील अशी याची बांधणी असून दूरध्वनी क्षेपक, रेस्टॉरेंट वगैरे सर्व सोयी यांत आहेत. हे थिएटर विमानातून फारच छान दिसते सुयोगाने मला हे थिएटर विमानातूनही पहायला मिळालें.

दुसऱ्या महायुद्धात बर्लिन शहराची नासधूस फार झालेली दिसते कारण गेली १५ वर्षे बांधकाम सतत चालले असूनही अजून ध्वंसाविशेष अनेक ठिकाणी पहायला मिळते. नवी बांधणी सिमेंट कॉंक्रीटची व बहूमजल्याची आहे व ती जुन्या बांधणीहून फार निराळी आहे. नवी बांधणी दिसायला सुबक वाटली तरी जुनी जितकी कलापूर्ण व सुंदर वाटते तशी वाटत नाहीं. जुनी बांधणी स्वतः जर्मन लोकांच्या स्वयंस्फूर्तीनें झालेली होती नवी बांधणी रशियन. अमेरिकन, व ब्रिटीश प्रेरणेंनें होत असल्यानें जुन्यांत व नव्यांत हा भेद असणें अगदी सहजिकच उठून दिसण्यासारखा आहे.

भारतांत कुरुक्षेत्र तसेच युरोपमध्यें बर्लिन आहे कीं कायसे वाटते कुरुक्षेत्र हे पुरातन कालापासून युद्धभूमी होते. बर्लिनला स्थान १८ व्या शतकापासून प्राप्त झालेलें आहे येव्हडेंच.

बर्लिन शहरांत गॅसचेदिवे, ट्यूब लाईट, सर्व पद्धतीचे दिवे पहायला मिळतात. वाहतुकीची व दळणवळणाची व्यवस्था फारच छान आहे. शहर फार अफाट असल्यानें पायी पायी फिरणें अशक्य आहे. पण बसेस्, ट्रॅम्स, ट्यूब ट्रेन अशी सर्व साधनें एका पाठो पाठ एक अशी व स्वस्त दरांत आहेत. ट्यूब ट्रेन, भूयरी रेल्वेगाडी सर्व शहरभर भूयारातूनच फिरते व व्यवस्था फारच सुंदर आहे सर्व व्यवस्था स्वयंचलीत विद्युत व्यवस्थेवर केलेली आहे. भूयारीं गाडीचा प्रवास फारच स्वस्त ३५ फिनिक्सचे तिकीट घेतले कि कोणत्याही टोकापासून कोणत्याही टोकापर्यंत कुठेही जावे अर्थात माझे जायचें पल्ले लांब लांबचे असल्यानें मी भू – गाडानेंच फिरे पण यांत एक नुकसान हे कीं गाडा चालते वेळी कांहींच पहायला मिळयचे नाहीं. असो मी मात्र भूयारा गाडानेंच फिरे स्टेशनें वेटिंग रूम किती सुंदर आहेत कल्पनाच करवत नाहीं.

पूर्व बर्लिनमध्यें जायची फार इच्छा होती म्हणून तेथील म्युझियम पहायच्या निमित्तानें जायचे ठरवले. तिकडे जायला बरेच प्रवासी (प्रवासीच काय ? पश्चिम बर्लिनचे लोकसुद्धां दचकतात) दचकतात, मजजवळ पासपोर्ट होता. मी तपासून पाहिला त्यावर फक्त Germany असे लिहिलेले होते. थोडा धीर आला व जायचे ठरवले. ट्यूबचे तिकिट घेतले व गाडीत बसलो. पोष्टरडॅमला पूर्व बर्लिनची हद्द सुरु होते त्या स्टेशनवर खूप रशियन सोल्जर होते. त्यांतील बरेच गाडीत शिरले. मला वाटले आता चेकिंग होणार. पण काय असेल ते असो तसे कांहीं झाले नाहीं व मला तर कुणीच कांही विचारले नाहीं मी आपला सरळ म्यु. जेथें आहेत त्या स्टेशनवर उतरून चालायला लागलो म्यु. चे तिकिट घेतले व म्युझियम पाहिला म्यु. मध्ये गर्दी कांहीच नव्हती, अगदी थोडे लोक होते.

एक म्युझियम जर्मनीचा इतिहास, त्याची नाणी, त्याची कला यांची आहे व बाकीच्या दोनमध्यें युरोपियन व म. आशिया व इजिप्त देशाच्या पुरातन व अैतिहासिक वस्तू, चित्रकला, व शिल्पकला यांचा संग्रह आहे. शिल्पकला संग्रहांत जुन्या इमारतींचे अवशेष सर्वच्या सर्व आणून ते व्यवस्थित बांधवून त्याचे सुंदर प्रासाद मंदिरें अशी उभी केलेली आहेत. या वैशिष्टयामुळें म्युझियमचा हा भाग फारच छान आहे. इजिप्तच्या "ममी" ४ | ५ मला येथें पाहायला मिळाल्या. कांही ममी फुटून हाडांचे सांपळे तुकडे झालेले पाहायला मिळाले त्याचबरोबर इजिप्तच्या पुरातन संस्कृतीचे अवशेष म्हणजे त्यांची सर्व प्रथमची चित्रमय लिपी व या लिपीतील कांहीं आलेख पहायला मिळाले. शिवाय पुतळे वगैरे खूपच पाहिले. सीरीयन शिल्प उत्तम स्थितींत पहायला मिळाले. ग्रीक लोकांचे अक्रोपोल्यच्या वेळेचे शिल्प पहायला मिळाले. प्रत्यक्ष अथेन्समध्यें ते इतक्या उत्तम स्थितींत नाहीं पण इथें त्याची छान व्यवस्था करून बांधणी करून ठेवलेली आहे. त्यामुळें ते उत्तम स्थितींत आहे.

पश्चिम बर्लिनमध्यें Victory Towar पाहिला. हा २२५ फूट उंच असून त्यावर सोनेरी मुलाम्याची अेक देवता जर्मन जनतेला आशिर्वाद देत आहे. सूर्यप्रकाशांत हे दृश्य चमकून दिसे. १८६० च्या सुमारास विल्लीयमनें एकापाठोपाठ ३ युद्धे डेन्मार्क आस्ट्रिया व फ्रान्स अशी जिंकली व त्या उत्सवार्थ हा टॉवर उभारण्यांत आला. याचे बाजूस विस्मार्क व रूप यांचे पुतळे आहेत व विशाल अशी बाग आहे. त्यानंतर नवीनच (अमेरिकन बांधणीं पद्धतीनें) बांधलेला कॉंग्रेस हॉल पाहिला. मोठा मजेशीर व सुंदर हॉल आहे. पार्लमेंट येथें भरते. हा जॉन फॉडलेस यांचे कारकीर्दीत झाला व ते स्वत: त्यांचे उद्घाटनाला आल्यानें या मार्गाला त्यांचे नांव डलेस अॅली असे देण्यांत आलेले आहे. या हॉलच्या उत्तरेस नदी प्रवाह असल्यानें हे दृश्य फारच नयन मनोहर आहे. त्यानंतर टाऊन हॉल जुन्या जर्मन बांधणी पद्धीतीचा असून सुंदर व विशाल आहे.

दुसऱ्या महायुद्धांत उध्वस्त झालेली जर्मन टेक्निकल युनिव्ह-सिटी पाहिली. दृश्य पाहूनच मन कळवळून आले. ज्ञानाचे उगम स्थान या युद्धांत प्रथम भस्म करण्यांत आले ! काय हा अन्याय ! आता परत त्याच जागीं नवीन इमारत बांधणीची आंखणी सुरू झालेली आहे व ही नवी इमारत पहिल्यापेक्षा मोठी होईलसे वाटते.

लंडन.

लंडनला पोहोंचण्याचें आधी हँबुर्ग, कोपनहेगन व ॲमस्टरडॅमला जाऊन मग लंडनला यायचा विचार होता. पण मजजवळ दामाजी पंतांचा तुटवडा होता. मला केवळ माझ्या जवळ असलेल्या तुट पुंज्या पूंजीवरच काम करायचे होते व ते कल्पनेप्रमाणें शक्य झाले नाही. व्हीएन्ना व म्युनिच या दोन शहरांतच माझें सर्व पैसे संपले व मजजवळ अवघे २५–३० जर्मन मार्क शिल्लक राहिले. बर्लिनमध्यें तरी किती वेळ राहूं शकेन याची मला तीभीच वाटत होती. पण बर्लिन मध्यें मला युथ हॉस्टेलमध्यें स्वस्त जागा व स्वस्त जेवण मिळाल्या मुळे मी बर्लिनचा प्रवास २० मार्क मध्यें (३ रात्रीं) केला व सरळ लंडनला जायचे ठरवून ता. १२-८-६१ रोजीं बर्लिन ते लंडन P. A. A. च्या JET Cliper with Dc. 8 together with booing International ने निघालो. विमान इतक्या द्रुत गतीनें व इतक्या उंचावरून निघाले कि व मला सर्वच आश्चर्य वाटू लागले. अत्यंत सुगम गति, उत्तम व्यवस्था व मी हँबुर्ग ते लंडन अवघ्या १ तासांतच आलो. विमान जेव्हा लंडन विमान तळावर उतरूं लागले तेव्हा मी लंडन विमानतळाची पाटी जरी वाचली तरी मला विश्वास होईना म्हणून मी Hostess ला हे विमानतळ कुठले म्हणून विचारले सुद्धा! येणेंप्रमाणें मी ता. १२।८।६१ रोजीं दुपारी १॥ वा. लंडनला येऊन उतरलो. विमानतळापासून व्हिक्टोरिया स्टेशनपर्यंत ५ शिलिंग द्यावे लागले. तेथून टयूबट्रेननें कसाबसा निघालो. टयूबट्रेन ही जरी मी सर्वकडे पाहिली असली

तरी लंडनची टयूब फारच विशाल व गडबड घोटाळ्याची आहे. सर्व शहरांत मिळून ८-१० वेगवेगळ्या लाईन्स असून खूप ठिकाणीं एकमेकांचे क्रॉसिंग आहे व क्रॉसिंगच्या जागेला गाडी बदलायची म्हणजे एव महान परिश्रमच. किती वेळा भुयारांतून चालायचे, जिने चढायचे, उतरायचे, इलेक्ट्रिक लिप्टस् चढायच्या, उतरायच्या, राम राम ! इतका सर्व घोटाळा जरी असला तरी प्रवाशांना मार्गदर्शन पर सूचनाफलक मात्र जागोजागी असल्यानें फलकाबरहुकूम गेलो तर चुकायची भीती नाहीं. ह्या सर्व सूचना फलकांच्या मार्गदर्शना प्रमाणें निघून मला व्हिक्टोरिया ते आर्चवे स्टेशनला येऊन पोहों चायला १॥ तास लागला. आर्चवे टयूब स्टेशनवर उतरलो. बस घेतली व मिल्टन रोडला आलो. पण ज्याना मी भेटणार होतो ते गृहस्थ बाहेर गेले होते व ते रात्री ९॥ चे सुमारास परत येईन अशी चिट्टी ठेऊन गेले होते. खोली मात्र त्यानीं मजसाठीं उघडी ठेवली होती. बसायला जागा तरी मिळाली म्हणून मला समाधान झाले व टेकलो. ४॥ ते ९॥ वेळ कसा काढायचा ही मजपुढें समस्या होती. तोपर्यंत मला त्या खोलींत जुलै १२ पासून २ अगस्ट पर्यंतचे लोकसत्ता, मराठा, केसरी वगैरे मराठी वृत्तपत्रें मिळाली व आनंदाला परिसीमा राहिली नाहीं. पुण्यातील (खडकवासला पानशेंत धरण फुटल्यामुळें) हा: हा:कार वगैरे अनेक पुसट बातम्या मला बेलग्रेडला असल्या पासूनच कळल्या होत्या. त्या मला आतां पूर्णपणें भरपूर वेळसहित वाचायला मिळाल्या व वृत्तपत्रें वाचीत मी वेळ घालविला मी ज्यांच्याकडें आलो होतो त्या गृहस्थांचे नाव दिनकर हरी विद्वांस. ते कसे काय आहेत, त्यांचे वय काय ? त्यांचा स्वभाव कसा, माझ्या राहण्याची व्यवस्था त्यानीं कशी केली आहे, माझ्या पंशाची व्यवस्था त्यानी कशा केलेली आहे, याची मला कल्पनाच नव्हती. त्यामुळें डोक्यांत अनेक विचार येत होते. व ९ वाजल्यापासून मो श्री. विद्वांस यांच्या आगमनाकडे टक लावून पहातच राहिलो. बरोबर ९॥ वाजतां श्री. विद्वांस आले. मनुष्य वयस्क म्हणजे ५० शीतला, खांद्यापर्यंत बंद

असलेली सूट पँट, कोट, टॉय व वर Sport Cap घातलेले असे एक गृहस्थ आपले एक मित्र श्री. पवार यांना बरोबर घेऊन खोलीत आले. यांतील विद्वांस कोण? याचा फारसा विचार न करता मी अगदी विनयपूर्वक दोघानाही नमस्कार केला व मीच शाम वाटवे. दुपारी ४॥ वा. आलेलो आहे. वगैरे सर्व मी सांगितले

श्री. विद्वांसानी मला धीर दिला. माझे पत्र त्यांना पोहोंचल्याचे व त्यानी मजसाठीं सर्व व्यवस्था केली असल्याचे सांगितले. समाधान झाले. श्री. विद्वांस अत्यंत देवभक्त, धर्मिष्ठ, कट्टर शाकाहारी व घरी स्वयंपाक करून जेवण करणारे, तेव्हां त्यानी चटकन कपडे उतरले व त्यांनी भाताचे आधण ठेवले. म्हणाले हे जेवण मला चालेल कां? मी तर उत्तरलो मला तर असलेच जेवण आवडेल या प्रमाणें रात्री ११ वा. जेवण केले भांडी वगैरे धुण्याघासण्याचे स्वावलंबन केले. झोपण्याची व्यवस्था मला शनिवार व रविवार कशी करायची हा त्यांचेपुढें प्रश्न होता. सोमवारपासून त्यानी माझीं व्यवस्था C/o माधवराव गुल्हाणे, 127 Malden Rd. Londer NW 5 मध्यें केली होती, पण दोन दिवस कसे काय करायचे? त्यांचा एक मित्र खोलीची चावी त्याचे कडे देऊन रजेवर गेला होता. सबब त्या खोलीत झोपायला जागा होती पण सदर गृहस्थ रजेवर असल्यानें खोलीचे भाडे भरत नसे व त्यामुळें ती खोली वापरायला येत नसे. शिवाय लँड लेडी (घर मालकीण) याला परवानगी देणें शक्य नाहीं म्हणून दोन दिवस चोरीनें गुपचुप खोलीत झोपायचे ठरले त्याप्रमाणें दोन दिवस गुपचुप खोलीत रात्री जात असे व सकाळी चोरूनच बाहेर येत असे.

सोमवार दि. १४-८-६१ पासून मला राहायला जागा मिळाली जागा म्हणजे अशी झोपायला व ब्रेकफास्टला एकीकडे व जेवण व आंघोळ एकीकडे तरीपण स्वस्तात मिळाली १ आठवड्यास ३ पौंड १५ शिलींग, मालक महाराष्ट्रीयन आहे व सायंकाळी जेवण शुद्ध

शाकाहारी महाराष्ट्रीय पद्धतीचेच मिळते सुख आहे. या जागेत सर्व जवळ जवळ भारतीय लोक व त्यातल्या त्यात विशेषत: महाराष्ट्रीयन आहेत. सर्व इकडे कामधंद्याला आहेत मला या लोकांचेबरोबर राहायचा योग आला. लंडनमधील रीती पद्धती, पोषाख या बाबतींत या जागेचे मालक श्री. माधवराव गुल्हाणे व राहणारे लोक फारच चिकित्सक आहेत. मी ता. १६-८-६१ रोजीं सकाळी कटींग करून घेऊन आलो व नाईटपँट व फूलशर्ट घालून अंघोळीसाठीं रस्त्या वरून निघून आंघोळीच्या जागीं गेलो. मालकानी म्हटले अहो " तुम्ही या ड्रेसात आला ? हा ड्रेस इकडे अजीबात चालायचा नाहीं त्यानां परतताना आपली सूटपँट मला घालायला दिली. व मी ती घालून माझ्या खोलीपर्यंत आलो ही घटना तेथील खूप लोकांना कळली व त्याची चर्चा चालू झाली मीं तर चर्चेला उत्तर द्यायला तयार होतो आम्ही पूर्ण इंग्रज का होणार आहोत ? आम्ही कसेहि नटलो मुरडलो तरी भारतीय ते भारतीयच मग आमचे भारतीयत्व, भारती चालीरीती कांही वेळां उठून दिसल्या तर त्यांत वावगे काय आहे ? विनाकारण इंग्रजी पद्धतीमागें वेडे होण्यांत निव्वळ वेडेपणा व वैचारिक गुलामी आहे आणि काय ? नेहमी गरम कपडे वापरण्यामागील इकडच्या लोकांचा उद्देश येवढाच कीं हा प्रदेश थंड आहे. म्हणून कांहीं गरम कपडेच नेहमी अंगावर लटकावयाचे ? कां येथील फॅशन अशी म्हणावयाचा. इकडील इंग्रज सुद्धा उष्मा झाला तर अंगावरील सर्व कपडे काढूनहि टाकतील अशी इकडील विचारसरणी असून सुद्धां आमचे भारतीय लोक यांतील मर्म न कळता व्यर्थ खुळेपणानी इकडच्या फॅशनच्यामागें कसे पडतात याचेच हे एक उदाहरण आहे. कोंबडी झांकून ठेवली म्हणजे ओरडायची थांबेल कां ? भारतीयत्व प्रकट झाल्याविना राहील कां ?

एकूण या विषयावर खूप चर्चा झाली माझे तरी साफ मत मी सांगितले मी तरी शुद्ध भारतीय पोषाख (अर्थात येथें गरम पोषाख) घालणार असे ठरवले असल्याचे सांगितलेहि.

येथें मी रोज थोडें याप्रमाणें त्यातल्यात्यांत लंडन टॉवर विशेषत: ज्वेलरी व त्यांतल्या त्यांत भारताचा कोहिनूर हिरा पाहिला, त्याच दिवशी लंडन टावर ब्रीज पाहिला. एवढा मोठा ब्रिज असूनहि हायड्रो-पावरनें त्याची उंची वाढवता येते म्हणें. त्यानंतर याच भागांतील मॉन्युमेंट पाहिला. १५ व्या शतकांत जेव्हां तीन दिवस लंडन शहर आगीत जळून खाक झाले याची आठवण म्हणून हा उभारण्यात आला. उंची अंदाजे २५० फ. आहे. त्यानंतर सें. पॉल कॅथड्रल पाहिले इमारत खूप भव्य आहे इतकेच, नेहमीप्रमाणेंच नक्षीकाम वगैरे खूप आहे पण इमारत आता फारच जुनी वाटू लागली आहे दुरस्ती चालू आहे खास १ शिलिंग देऊन Whispering Gallary पहायला वर चढून गेलो. पण विजापूरचा गोलघुमटांत जो आवाज ७ वेळा फिरतो तो गम्मत येथें नाही फक्त एकच आवाज सर्वकडे एकसारखा ऐकू येतो एवढेच. विजापूरची मजा कांहीं औरच आहे व तशी जगांत दुसरीकडे नाहीं विनाकारणच सेंट पॉल चर्चच्या व्हिसपरिंग गॅलरीचा बडेजाव सांगण्यांत येतो तो फोल आहे असे मी अनुभवले. त्यानंतर ब्रिटिश म्युझियमस् पाहिले इतिहास पुरातन संस्कृति, शिल्पकला, अधुनिक संस्कृति, उद्योग वगैरे सर्व विषयानी भरलेली सर्वांगिण म्युझियम आहे.

दुसरे दिवशीं एक उत्कृष्ट म्युझियम पाहिली विशेषत: Industrial Science मध्यें वाहन उपकरणांच्या उत्पादन प्रगतीची म्युझियम तेथे सायकली पासून तो विमानापर्यंत सर्व जुनी नवी वाहने, इंजिनें, मोठ मोठे पंप्स् वगैरे सर्व पहायला मिळतात व कांहीं तर स्वीच दाबून चालवून पहायला मिळतात. उद्योगी सायन्स, शेतकी सायन्स, रेडियो टेलिव्हिजन सायन्स, ॲटॉमिक सायन्स, काय नाही या म्युझियममध्यें ! मला तर एक दिवस पुरला नाहीं पण वेळेलाहि बंधन हे आहेच त्यामुळें मला ज पहायचे होते ते मी पाहून घेतलें आणखीही म्युझियमस् आहेत पण मला पहायच्या नव्हत्या फार

मोठा झू (प्राणी संग्रहालय) आहे, आंत जायची इच्छा झाली नाही परत परत तेच प्राणी किती वेळां पाहायचे ?

टेम्स नदीमध्यें स्टीम लॉंचनें प्रवास केला. नदीचे पाणी खूपच घाणेरडे झालेलें असते त्यामुळें स्वच्छ व शीतल गंगाप्रवाहांत प्रवास करायची हौस असलेल्या मला या प्रवासाचे एवढें कौतुक वाटले नाहीं. लंडन सारख्या शहराची शहर राणी टेम्स इतकी घाणेरडी झालेली आहे याची लंडनवासीयांनां थोडीशीं जाणीव झाली होती. नुकतीच वृत्तपत्रांत चर्चा सुरू झालेली होती.

बकिंगहॅम पॅलेस, पार्लमेंट हाऊस, वेस्टमिनिस्ट अबे, सें. मार्गरेट चर्च वगैरे इमारती पाहिल्या पण कुठेंच आंत जाऊ देण्यांत येत नसल्यानें बाहेरून पहाण्यांतच समाधान मानून घ्यावे लागले. अनेक बागा पाहिल्या, जेम्स गार्डन टेम्स बँक Embantmet Garden, Victoria Garden वगैरे पाहिल्या जागो जागीं इंग्लंडच्या वीर पुरुषांचे हुतात्म्यांचे पुतळे फारच सुंदर असे बसविलेले आहेत. त्यांत मी क्रॉमवेल, विलीयम दी कॉंकरर, हेन्री आठवा, हेन्सी ३ रा. वेलस्ली क्लाइव्ह, वगैरे व कांहीं ठिकाणी अब्राहम, लिंकन जार्ज वशिंगटन, वगैरे पाहिले टॅफल्गार स्क्वेअर पाहिला फारच सुंदर आहे इंग्लंडची अब्रु वांचविणारा नेलसन् याचा स्मारक स्तंभ व त्यावर नेलसन्चा पुतळा फारच सुंदर आहे त्याचे वर्णन वेगळेच करावे लागेल. ट्रॅफल्गारचे वर्णन १ वाक्यांत काय पुरे होणार ?

ॲमस्टर डॅम

दि. २१-८-६१ रोजीं दुपारीं लंडनहून विमानानें येथे येऊन पोहोंचलो लगेच युथ हॉस्टेलला आलो पण ते ४॥ वाजेंपर्यंत बंद असलेनें युगोस्लाव्हियातील श्रम शिविरांतील एक मित्र श्री. होमन यांना भेंटावयास गेलो ते कर्म-धर्म संयोगानें भेटले व त्यानी मला

शहर दाखविण्यासाठीं सायंकाळीं ७ वा. येण्याचे आश्वासन दिले मला ७ वाजेपर्यंत राहायची जागा मिळाली व नंतर मी त्यांचे बरोबर शहर पहावयास निघालो.

हे शहर समुद्र पातळीपासून ४ मिटर म्हणजे अदमासे १०-१२ फूट खालीं असून समुद्र काठांवर तट बांधून याचे संरक्षण करण्यांत आलेलें आहे. अँमसर नदी येथें समुद्राला मिळते याला डॅम बांधून या शहराची वास्तू झालेली असल्याकारणानें याचे नांव अँमस्टर डॅम असें पडलें आहे म्हणें. या शहरांत रस्त्यापेक्षां नदीच्या पाण्याचे व समुद्राच्या पाण्याचे लहान मोठें असें खूपच कालवे आहेत. दर १० पावला गणीक एक कालवा आहे. बरेंच दळणवळण कालव्या तूनच चालते टंचाई आहे ती रस्त्यांची जरी गांवांत सिटीबस, ट्रॅम असली तरी जुन्या शहरांत रस्त्यांची फारच अडचण आहे. नव्या बांधणीच्या शहरांत रस्तें खूपच रूंद करण्यांत येऊ लागले आहेत. रस्तें करणें खूप खर्चाचे आहे म्हणतात कारण खूप भर घालून रस्ता करावा लागतो. रस्त्यावर विटा जोडलेल्या आहेत. घरेंसुद्धां विटांचीच आहेत. या विटा इतक्या सुंदर व कणखर आहेत कीं २००-२५० वर्षे पर्यंत सुद्धां त्याना कांहींच धक्का अगर मोडतोड होणार नाहीं असें म्हणतात.

येथें घरें बांधणें हे सर्वांत मोठें खर्चाचे काम आहे कारण पायाच आधी ४०-५० फूटापर्यंत खणून भरून घ्यावा लागतो त्यामुळें इकडील घराना "लेग हाऊसेस" म्हणतात व ही घरें फारच खर्चाची असतात डचमन् मिळविलेला पैसा घर बांधण्यासाठीं मातीत घालतो म्हणतात. घरें बहूमजली असून त्यावर कौलारूंची छपरे आहेत कारण इकडें पाऊस वर्षभर पडत असतो. त्यामुळें कौलारूच उपयोगाला किफायतशीर असतात. सर्व काम विटांचे, इकडील विट अितकी सुंदर भाजलेली असते कीं ती दगडासारखी कणखर असते.

विजेच्या दिव्यांचा चमत्कार या शहरांत फारच प्रेक्षणीय असा आहे. रात्री दुकानांची, हॉटेलांची, सिनेमागृहांची रस्त्याची रोषणाई रंगी बेरंगी दिव्यानी ट्यूब लाईटनी व न्यूऑन साईन्सची केलेला फारच आकर्षक असते मला तर हे पाहून समाधान झाले नाही व आणखी एक दिवस ही रोषणाई पाहून घ्यावी व रोषणाईच्या जागेत १।२ तास तरी पहातच बसावेसे वाटले. आमचेकडे रोषनाई कशी करावी हे कळत नाहीं का वीज कमी आहे काय उणीव आहे कळत नाहीं पण ॲमस्टर डॅम शहरासारखी रोषनाई मला कुठेंच पहायला मिळाली नाहीं. मी इस्तंबूल, अथेन्स, व्हीएन्ना, बर्लिन, म्युनिच, लंडनची रोषणाई, (सध्यां समर असल्यानें सर्व कडेंच रोषनाई) पाहिली पण ॲमस्टर डॅम सारखी रोषणाई मला कुठेंच आढळली नाहीं आधी विजेचे चमत्कार व मग कॅनॉलच्या पाण्यांत प्रतिबिंब व परत त्यांचा प्रकाश असें कांहीं नानाविध प्रकाशाचे चमत्कार मला येथें पहायला मिळाले.

ॲमस्टर डॅमला येऊन जेथें हॉलंडनें समुद्र थोपविला आहे ती जागा पहायची मनांत फार इच्छा होती अर्थात ही जागा ॲमस्टर डॅमहून अदाजे ८०-९० कि मि. अंतरावर असल्यानें त्याला १ दिवस तरी खर्च होणार असा माझा अंदाज होताच पण आज २२-८-६२ ला Conducted Tour नसल्यानें मला टप्याटप्यानें म्हणजे अलकमार, हारलेम, झूमवर्ट, व किनारा असे करत जायला व यायला पूर्ण दिवस लागला पण हा भाग पाहून एकदा मनाचे समाधान झाले. आकाशाला नाही पण समुद्राला गवसणी घालण्यांत तरी हॉलंड देशाला पूर्ण यश प्राप्त झाले आहे असे म्हणावे लागेल. बिचाऱ्या या देशानें समुद्राला गवसणी घालून स्वतःसाठी जमीन (देश) निर्माण केली असेच म्हणावे लागेल एवढा सर्व भगीरथ प्रयत्न करण्यापेक्षां अितकी जागा याही पेक्षा कमी किंमतीत या देशीयाना सहज खरिदता आली असती पण किंमत व भगीरथ प्रयत्न यांत अंतर नाहीं का ? भगीरथ प्रयत्न तो भगीरथ प्रयत्न

त्याची सर दुसऱ्या कुणाला येईल काय ? हॉलंड देशाच्या लोकांच्या या कामगिरीची कल्पनाच करवत नाहीं. किनाऱ्याचा समुद्र इतका खवळलेला आहे, कि तो संतप्त क्रुद्ध होऊन हॉलंड देश गिळंकृत करणार काय असे वाटते काय ते वारे काय ते वाळूचे स्नान चालणेंसुद्धां महाकठीण होते. किनाऱ्यावर असला हा समुद्र पाहिल्यावर भीती का वाटणार नाहीं ? भस्मासुराची जी गत झाली तीच जवळ जवळ समुद्राची झाली असे वाटते, समुद्र खवळून किनाऱ्यावर आदळतो व आपल्याबरोबर वाळू, मल आदी किनाऱ्यावर आणून टाकतो व अशा रीतीनें त्याची त्यानेंच एक मोठी थोरली भिंत (त्याची त्यालाच गवसणी) निर्माण केली आहे. डच लोक एवढ्या नैसर्गिक स्थितीवर थांबलेलें नाहींत. त्यानी स्वतःही कृत्रिम अशी अंदाजे २० मैल लांबीची Setnw या दिशेनें भिंत (एक टेकडीच बांधली आहे.) व समुद्राला थोंपविले आहे एवढेच नव्हे तर त्याच्या पाण्याचे व पातळीचे नियंत्रण केले आहे. सदर भिंती पासून संरक्षित भूमी समुद्र पातळीपेक्षां १० फू. अंदाजे खाली आहे हा सर्व चमत्कार दुरूनच कां होईना पाहून जीवाचें समाधान झाले.

इतका लांबचा प्रवास बसनें करावा लागला व तोही जाता ४ तास व येता ३ तास त्यामुळें डच लोकांचें खेड्यांतील जीवन राहणी, त्यांची शेती पवन, चक्या, डेअरी, पोल्ट्री सर्व कांहीं पहायला मिळाले. या देशांत जमीनीपेक्षां पाणीच जास्त आहे काय असे वाटते त्यामुळें जमीनीचा इंचन इंच सुद्धां त्यानी सत्कारणी लावला आहे येथें सर्व तऱ्हेची पिके, फळबागा, फुलबागा आहेत. दूध डेअरी, कोंबड्या पाळणें, व मच्छीमारी हा धंदा शेती पेक्षां किफायतशीर आहे. शेती हा पूरक धंदा आहे. शेतामधून बहु मुखानें पाणी वाहत असते त्यात बांध असतात पीक असते छोटें खानी घर तेही विटा, फळ्या व कौले यांचे व तेही सौंदर्यपूर्ण.

ॲमस्टर डॅम शहर प्रदक्षिणा, होडीमधून करणें हा एक महत्वाचा भाग मानला जातो कारण मोठ मोठ्या इमारती, स्मारके, चर्चे राजवाडे, कालव्याच्या किनाऱ्यांलाच असल्यानें होडीतून प्रवास केल्यास सर्व शहराचा महत्वाचा भाग पहायला मिळतो म्हणून मी आज सायंकाळीं १-८५ गिल्डर (डच नाणें) देऊन होडीचा प्रवास केला वाफे-वर चालणारे इंजिन, बसावयाची वगैरे उत्तम व्यवस्था होती. गांवाची माहिती सांगणारी एक मार्गदर्शक मुलगी होती ती लाऊडस्पीकरवर सर्व महिती सांगत होती. अशा प्रकारें आम्ही एक तासभर शहर प्रदक्षिणा व ॲमस्टर डॅम बंदर पाहिले. इमारती तर पाहिल्याच पण बंदर फारच विशाल आहे. अनेक देशांची मालवाहू व लोकवाहू जहाजे आलेली होती. कांहीं जहाजे यार्डमध्ये उभी होती व त्यांची दुरुस्ती व रोंगण वगैरे लावायचे काम चालू होते. बंदर फारच मोठे आहे. जगांतील बंदरांत ५ व्या नंबरचे हे मोठे व सोयीपूर्ण बंदर आहे असे म्हणतात. मुख्य म्हणजे हे बंदर समुद्र किनाऱ्या-पासून खूपच आंत असल्यानें समुद्रीवारे वगैरेंचा या बंदराला अजीबात त्रास नाहीं त्यामुळें माल उतरविणें चढविणें, दुरुस्ती करणें वगैरे सर्वच गोष्टीला सोयीचे असे आहे. एका वेळेला अंदाजे १००।१२५ जहाजे तरी उभी असावीत असे वाटले. माल चढविणें उतरविणें जहाजांची दुरुस्ती करणें वगैरे सर्व कामे विजेवर व विजेच्या जोरा वर चालणाऱ्या क्रेन्सवर चालतात.

हा प्रदेश जरी लहान असला तरी मोठा व्यापारी प्रदेश आहे. हॉलडचा माल जात नाही असा जगांत एकही देश नाही. मशिनरी सामान, सायकली, मोटार-सायकली, मोटारी, जहाजे, इंजिनें, इलेक्ट्रिक सामान, रेडिओ, टेलिव्हिजन, रडर, इलेक्ट्रॉनिक, रगकाम, खेळणी वगैरे सर्व सामान जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांतून जाते म्हणें. पूर्वेकडें जसा जपान तसा पश्चिम युरोपात हॉलंड देश आहे असे म्हणायला कांहींच हरकत नाहीं. फिलीप्स कंपनीचाच एवढा मोठा व्याप या

देशांत आहे कि सर्व देशाच्या उत्पादनाच्या १५% हिस्सा उत्पन्न केवळ फिलीप्स कडून होते.

इकडील लोक फारच नम्र, विनयशील, व परदेशी मनुष्या बरोबर फारच आदरानें व आपुलकीनें वागणारे आहेत. मला वास्तविक डचभाषा येत नव्हती मी जे इंग्रजी बोले ते कसेबसे समजून मला मोडक्या तोडक्या इंग्रजी भाषेत माझ्याशी व्यवहार करित असत व तेही आनंदानें. मला भेटलेलें माझे मित्र फारच आदरातिथ्याचे. मी त्यांना भेटलो मात्र त्यानी माझी त्यांचे कचेरीतील सर्व लोकांशी ओळख करून दिली सायंकाळी ते मजकडे आले व मला बस मधून घेऊन जाऊन त्यानी सर्व ॲमॅस्टरडॅम शहर (जुने व नवेसुद्धां) दाखविले हॉलंडची विशेषता काय काय आहे वगैरे सर्वांही त्यानी सांगितले हॉलंडचे लोक आपली ट्रॅडिशन रिवाज चालरीत राखून चालणारे आहेत असे त्यानी अभिमानानें सांगितले. हॉलंडचे लोक विनम्र व आपला आप राखून चालणारे आहेत असेही त्यानी सांगितले त्याच बरोबर आपले लोक फारच सुसस्कृत व सभ्य असल्याचे ते म्हणाले. मलाहि त्यांच्या म्हणण्याची प्रचिती मी जसजसा लोकांबरोबर मिसळलो तसे मला कळले व अनुभव झाला. १ च दिवसांत मनांत आल्याबरोबर ३-४ बसेच घेऊन हॉलंडच्या बांधाचे बाजूचा समुद्रकिनारा गांठला, व तो बांध दुरून कां होईना पाहून येणें शक्य झाले ते केवळ या लोकां मुळें. मोटारीतील प्रवाशापासून ते ड्रायव्हर पर्यंत सर्वांनी मला मार्गदर्शन व तेही अचूक केले त्यामुळेंच. लोक फार उद्योगी आहेत शेती असो कारखान्यांतील काम असो जो तो आपापल्या कामांत मग्न झालेला असतो. सामुदायीक शेती फार नाही. वैयक्तिक शेती डेअरी पोल्ट्री आहे पण यांत्रिक, तांत्रिक पाणीपुरवठा सर्व साधणें प्रत्येकाला उपलब्ध असल्यानें सर्व कामें भरभराटीनें चालत आहेत युरोपांत बहुतेक सर्वकडे डेअरीचे काम सामुहिक प्रमाणांत मी पाहिले. पण इकडे वैयक्तिक पद्धती मला पहायला मिळाली एक

एक गवळ्याच्या १०-१५ गाई. तो स्वतः आपल्या हातानें गाई पिळतो व दूध टाक्यांत भरून रस्त्यावर टाक्या आणून ठेवतो दूध जमा करून ते शुद्ध करून त्याचा पुरवठा करणारे कारखानदार ते दूध घेऊन पुढील कामे करतात.

ॲमस्टरडॅममधील घरे मोठी चमत्कारीक आहेत. सर्व घरें विटांची. दगडांची फारच क्वचित व जी आहेत त्यांत खालील थर तेवढेच दगडी व वरील भाग परत विटांचा आहे. पण बहुतेक सर्व घरें खालपासून ४, ५, ६ मजल्यापर्यंत विटांची व फळ्यांची (लाकडी) आहेत नवीन जी घरे होत आहेत ती मात्र विटाबरोबरच सिमेंटच्या छावण्या वगैरे घालून झालेल्या आहेत विटांची घरें असूनही कांहीं कांहींतर कालव्यांतील पाण्याच्या पातळीखालीं गेलेली अढळतात. हे पाहून मोठी मजा वाटते ही घरे पाण्याच्या पातळीखालीं असून त्यांच्या भिंती पाण्यांत असूनही कालव्याचे पाणी घरांत येत नाही अथवा झिरपत नाहीं हा यांतील विशेष आढळला. असली ही घरे गेल्या ३ – ४ शेहे वर्षांची आहेत. व ती आज तागायत पाण्यात असूनही शाबूत आहेत याचेच आश्चर्य कालव्याच्या भींती; कांहीं कांहीं ठिकाणी कठडेसुद्धां विटांचेच एवढेच काय ॲमस्टरडॅम मध्यें रस्त्यांत अनेक ठिकाणीं विटा जोडलेल्या (लाल रंगाच्या) आहेत व रस्ते फार सुंदर दिसतात व यांच्या टिकाऊपणा बद्दल मी चौकशी केली तर असे कळले की हे विटांचे रस्ते खूप टिकाऊ असून शिवाय स्वस्त पडतात. व वाटेल तेव्हा अगदी जलदीनें या रस्त्यांची दुरुस्ती अथवा विटां बदलणें लवकर होते. सिमेंटच्या रस्त्यापेक्षां या देशांत विटांच्या रस्त्यांचे प्रमाणच जास्त आहे युरोपांतील कांही कांहीं देशांत तुर्की पद्धतीचे लहान लहान चौकोनी काळे दगड जोडलेलें रस्ते पहायला मिळाले तर हॉलंडमध्यें विटांचे व तेही उत्कृष्ट स्थितीत !!

पॅरिस

एक ऐतिहासिक शहर, सुंदर शहर, सुसंस्कृत शिक्षण व कला प्रेमी लोकांचे शहर उच्च, राहणीचे शहर असा या शहराचा लौकिक असल्यानें युरोपचा प्रवास करायचा अन् पॅरिस न पहातां जायचे? शक्य नाहीं, म्हणून मी ता. २३-८-६१ रोजों दुपारीं पॅरिसला ॲमस्टर डॅमहून आलो. युथ हॉटेलमध्यें जागा मिळाली नाहीं त्यामुळें एका भारतीयाच्या ओळखीनें एका हॉस्टेलमध्यें दिवसाला 10 New-Franks देऊन जागा घेतली व दोनच दिवस राहायचे ठरविले महागऱ्या राहणीचा मात्र अनुभव आला. ही जागा कॉंकर्डी या भागाशी लगत असल्यानें ऐतिहासिक महत्वाचा सर्व ठिकाणें १ दिवसांत पायीं फिरून पाहायला मिळाली डी-यूं म्युझियम पाहिली ऐतिहासिक वस्तू, पुतळे खूपच आहे त्यात रोमन, ग्रीक, इजिप्शीयन सर्व तऱ्हेच्या संस्कृतीचे अवशेष आहेत पण त्याहिपेक्षा म्हणजे मोठे मोठे पेंटींग्स् चांगले आहेत. इमारतीच्या छतावर अथवा भितीवर व प्लेटवर मोठमोठाली तैलचित्रे फारच छान आहेत रंगाचे वैशिष्ठ्य म्हणजे ते जुने वाटत नाहीत व त्यांत चमक आहे व प्रकाश आहे. तशी सर्व चित्रें १६ व्या शतकापासून ती अधुनिक काला पर्यंतची ख्रिस्ती पुराणातील, युद्धवर्णनपर, राज्यभिषेक राजसभा. राजदुतांच्या भेटी, आप्तमिलन, पुत्ररत्नप्राप्ती सोहाळा बाप्टीसम् सोहळा (मुलाचे नांव ठेवणें), तदनंतर सामाजिक घरगुती वागणूकी, चालीरिती, स्वभाव वर्णनपर, अशी अनेक चित्रें वेगवेगळ्या चित्रकारानी काढलेली आहेत फारच सुंदर आहेत. तदनंतर एका मोठ्या खोलीत फ्रान्स मधील उच्च कोटीच्या कलाकारांचे मोठ मोठाले फोटो आहेत असले हे कलाकारांचे स्मारक मला क्वचितच पहायला मिळाले एका खोलीत फ्रेंच राजचिन्हे, राजमुकूट, राजदंड राजतलवारी, पोषाक, वस्त्रें, आभरणें वगैरे फारच छान आहेत पण लंडन टॉवर मधील जडजवाहिरांची तुलना करता ही कोंतीच वाटतात.

नेपोलियन बोनापर्टनें बांधलेली Truimph Arch, पाहिली तदनंतर चर्चे पाहिली, राजवाडा पाहिला राजवाडे खूप आहेत पण कुठेच आंत सोडले जात नाही ऑपेरा (जगांतील सर्वांत मोठे नाटचगृह) पाहिला तेथेंही आंत सोडले जात नाहीं. बाहेरून पाहूनच समाधान करून घेतले. १९०६ पासून १९२३ पर्यंत बांधली गेलेली हुतात्म्यांची स्मारक कमान पाहिली कमानीवर उभे राहिले म्हणजे सर्व पॅरिस शहर फारच छान दिसते या कमानीपासून १२ रस्ते चोहोंबाजूस केलेलें आहेत त्यानंतर Ephil Towar इफिल या गणिततज्ञाचे मार्गदर्शनाखालीं लोखंडी गर्डरनी गोफून बांधलेला Mechanical Towar–पाहिला १००० फूट उंच अमून लिफ्टच्या सहाय्यानें अथवा जिने चढत वर टोका पर्यंत जाण्याजोगे ४ मजले आहेत पायीं चढून जायला परवानगी तिकीट १-५० N. F. आहे. तेवढे देऊन मी वर जाऊन आलो या टॉवरमध्यें पाहण्यासारखी याच्या कल्पकाची कल्पकता आहे पण हा कशासाठीं व कोणत्या उद्देशानें बांधला याचा काही उल्लेख नाही. हा १९२० साली पूर्ण झालेला आहे त्याचे १० वर्षे काम चालू होते. पॅरिस मधील सर्वांत उंच मनोरा हाच आहे. टॉवरवर उभेराहून खालीं पाहिले म्हणजे माणसे चिमण्याइतपत व लहान मोटारी मोठाल्या आळ्या सारख्या दिसतात वरून चोहों बाजूला पहात बसायलाही जागा फारच छान आहे या टॉवरवर जत्रा भरल्या सारखी गर्दी जमलेली असते. हॉटेले वगैरे सर्व सोयी सर्व कडे आहेत. फक्त सर्व कांही भयंकर महाग ब्रेडचा १ तुकडा सुद्धा १ N. F. (अदमासे १ रु.) सोडा लेमन सुद्धा १ N. F. या टॉवर समोरच अमोरा समोर दोन राजवाडे व त्यांच्या मध्यें बागा आहेत.

पॅरिसमध्यें बागातर जिकडे पहाव्या तिकडे आहेत. रस्त्याच्या बाजूनें सुद्धा बांके अंथरलेली आहेत व सायंकाळीं खूप लोक त्यावर बसलेले असतात. आणखीही खूप टॉवर, चर्च, मनोरे पाहिले. नेपोलियन व लूई यांचा Tomb पहायला गेलो होतो पण आत जाऊ शकलो नाही कारण वेळ होऊन गेली होती.

बाजार पेठ दुकानें वगैरे छान सजविलेली आहेत समर (उन्हाळ्याची सुट्टी) मुळें सर्वकडें गर्दीच गर्दी सर्वलोक चोहोकडून पॅरिस पहायला आलेलें त्यामुळें पॅरिसच्या व्यापाऱ्यांची चांदीच काय सोनें होत होते.

पॅरिसचे रस्तें वगैरे सुंदर आहेत पण वाहतुकीची व्यवस्था तितकीशा चांगला नाहीं. मी व्हिएन्ना शहरांतील वाहतूक बलान मधील वाहतूक व लंडन मधील वाहतूक पाहिला त्यामानानें पॅरिसचा व्यवस्था अगदीच सामान्य वाटली येथेही टयूब ट्रेन्स आहेत पण त्या इतक्या गुंता गुंतीच्या आहेत कि नवखा मनुष्य गोंधळून जातो लंडनचा टयूब व्यवस्था फारच सोपा व उत्कृष्ट आहे. प्रत्यक लाईनचा वेगळा रंग, मग तो डब्य पासून तो लहान पाटयापर्यंत त्यामुळें प्रवाशांना सुगमता वाटते, येथें तसे कांहीच नाहीं गाडयाहि जुन्या झाल्या आहत त्यामुळें त्या तितक्याशा चांगल्या नाहात येथील सिटी बसेस् या तर इतक्या जुन्या पुराण्या रद्द आहेत कि त्यात बसावेसे सुद्धां वाटत नाहीं. भारतातील बस व्यवस्था सुद्धा यापेक्षां चांगली आहे असे मला वाटते. रहदारीचे नियत्रण सुद्धा तितकेसे चांगले नाहीं. जागोजागी पोलीस आहत पण त्याना सुद्धा शहराची माहिती विचारली तर ते चटकन सांगू शकत नाहींत आपला नकाशा व डायरी घेऊन मग सांगतात लडन, बर्लीन प्रमाणें येथेही नदी गावातून गेलेली असून तिच्या पाण्याचे नियंत्रण करून त्या पात्रांतून वाहतूकीची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. या नदीवर अनेक पूल आहेत. लहात प्रमाणातील बोटी, लाँचेस होडया यांचीच वाहतूक होऊ शकेल अशी व्यवस्था आहे. लडन व ॲमस्टरडॅम प्रमाणें लहान मोठया सर्वच बोटींची वाहतूक होण्यासारखी व्यवस्था येथें नाही ॲमस्टरडॅम मध्यें तर कांहीं ठिकाणीं पूलच्यांपूल वर उचलला जातो व मोठया बोटीला मार्ग करून दिला जातो.

येथील लोक सुशिक्षित, श्रीमंत असतील, पण सुसंस्कृत म्हणायला मी तयार नाहीं, दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती या लोकांत नाहीं, परकीयांशी त्याला समजेल अशा कांहीं मोडक्या तोडक्या भाषेंत देव घेव ते कधीच करणार नाहीत. ताठरपाणानें फ्रेंच भाषाच बोलतील तो न कळल्यानें परकियांची गैरसोय होते. याची जाणीव त्याना तिळ मात्र होत नाहीं. मी एका पोष्ट ऑफीसमध्यें, रेल्वेच्या तिकिट ऑफीसांत व दोन दुकानांत गेलो. सर्वकडे मला हाच प्रकार दिसून आला. चालू जगांत ही प्रवृत्ती लोकप्रिय होणार नाहीं. आम्हा भारतीयांना तर ही कधीच परवडणार नाहीं. याच्या उलट इंग्लंडमध्यें जर कोणी रस्त्याच्या कडेला कांहीं विचार करत उभा राहिला तर सहजच एखादा इंग्लीश गृहस्थ तुमच्या जवळ येऊन "Can I help you is any way?" (तुम्हाला कांहीं मदत पाहिजे कां?) असे विचारील व मार्गदर्शन करीलहि. पण पॅरीसमध्यें मला अगदी उलटा अनुभव आला. हे लोक आपल्या फ्रेंचशिवाय दुसरे कांहीं बोलायलाचे तयार नाहीत. त्यांना दुसऱ्या भाषा कळतात, पण चढेलपणा एवढा कीं, बोलायचे नाहीं.

सर्व युरोप खंड फिरलो, मला कोणी भिकारी भेटला नाहीं. पॅरीसमध्यें मात्र तीन वेळां भिकारी भेटले. फार दिवसांत भीक घातलेली नव्हती म्हणून एकदम मन पाघळले व तीन्ही वेळां भीक दिली. पॅरीससारख्या शहरांत भिकारी आहेत याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. सामाजिक समान व्यवस्था अस्तित्वांत नाहीं. आर्थिक विषमता फार आहे हेच याचे कारण असावेसे वाटते. तिसऱ्या वेळीं एका ट्यूब स्टेशनमध्यें एक स्त्री अंध होती, अकॉर्डियन वाजवून भीक मागत होती. आंधळी स्त्री पाहून मन भरून आले व तिला 10 F. भीक दिली.

पॅरीस विमान तळावर आणखी एक प्रकार घडला. माझे सामान आजपर्यंत गमावण्याचा अथवा चोरीस गेल्याचा प्रसंग

कधीच आला नाहीं. या प्रवासांतसुद्धां विमानतळावर माझे सामान ठेवून मी कुठेही चहा अगर पाणी प्यायला जात असे. आतांपर्यंत १ डझन विमानतळें पाहिलीं. पण माझे सामान कुठे गमावले अथवा चोरीस गेले असा प्रसग घडला नाहीं. विमानतळावरील वेटींग रूममधील एका खुर्चीवर माझी लेखनसाहित्याची बॅग ठेवली व तहान लागली म्हणून पाणी प्यायला गेलो. पाणी पिऊन येतो तों बॅग गायब! खूप चौकशी केली पण कोण काय सांगणार? विमान सुटायला अवघा अर्धा तास राहिला. माझे सर्व लिखाण, महत्वाची पुस्तकें, फोटो जर सर्वच चोरीस गेले तर काय करायचे? मी प्रवासांत जे पाहिले, अनुभवले ते सर्व लिहून ठेवले व तेच जर असे हरवले तर माझा प्रवास व्यर्थच म्हणायचा! असे अनेक विचार मनांत येऊन अगदी निराश झालो. माझे सामान कधींच हरवत नाहीं असा मी टेंभा मिरवी. आज मात्र माझे गर्वाचे घर खालो झाले, खाली कसले, अगदी रसातळाला गेले! वगैरें अनेक विचार मनांत आले. अगदी गहिंवरून आले. म्हटले निदान पोलीसांत वर्दी तरी द्यावी असा विचार करून पोलीस ऑफीस शोधायला लागलो. पोलीस ऑफीस सांपडायला आणखी ४० मिनिटें गेली. आतां फक्त १५ मिनिटें राहिली तों पोलीस ऑफीसरपुढें हजर झालो. वर्दी दिली तर अगदी निर्विकारपणें त्यानें माझा पासपोर्ट मागितला. याची भाषा मला कळेना व त्यांतच त्यानें मला पासपोर्ट मागितल्यामुळें घाबरून गेलो. पासपोर्ट दिला व म्हटले, माझे विमान सुटायला फक्त १५ मिनिटें आहेत. मी माझ्या गडबडींत त्याचे इंगीत कळूं शकलो नाहीं. त्यानें माझा पासपोर्ट, माझा चेहरा, फोटो पाहिली व आंत जाऊन चटकन् माझी बॅग आणून दिली. म्हणाला एका बाईनें ती हरवलेली बेवारसा बॅग म्हणून त्याच्याकडे आणून दिली. म्हणून त्यानें पूरी चौकशी करून, तपासणी करून मला त्यांतील खाणाखुणा विचारून बॅग परत दिली व पुन्हा असे करूं नका अशी ताकीद दिली. बॅग मिळाली

म्हणून मी अत्यंत आनंदित झालो तसाच ओशाळलोही. विमान सुटायची वेळ ५ मिनिटावरच आली होती. म्हणून बॅग घेऊन धांवतच विमान गांठले.

फ्रॅन्कफर्ट (प. जर्मनी)

२४-८-६१ रोजीं दुपारी ४ वा. फ्रॅन्कफर्ट येथें पॅरिसहून आलो. यूथ हॉस्टेलमध्यें लगेच जागा मिळाली खूपच आनंद झाला. जर्मनी मधील फार मोठे व्यापारी शहर असा या शहराचा लौकिक आहे. सायंकाळीं पेठ फिरून घेतली. खूप मोठी पेठ आहे. मुंबईसारखीच आहे. व्यापारातहि लोक थोडे कमीजास्त करून पटापट व्यापार करित असतात. या शहराचे मधून म्हाईन नदी वाहते. तिचे पात्र खूपच रुंद व खोल करण्यांत आलेलें आहे व त्यांतून जल वाहतूक उत्तम तऱ्हेनें करण्यांत आलेली आहे. अनेक उंचउंच असे पूलही असून गांवाच्या दोन्ही भागास जाण्या येण्याची रहदारी चिक्कार गर्दीची असते.

व्यापारी शहर असल्यानें अर्थांतच महागाई पॅरिस अितपत आहे. व ती फक्त रहाण्या खाण्याची व अिथे निर्माण न होणाऱ्या वस्तूंची! येथें तयार होणाऱ्या वस्तूं म्हणजे यांत्रिक सामान, फोटो सामान, रेडिओ, घड्याळे वगैरे फारच स्वस्त आहेत. भारताच्या दृष्टीनें स्वस्ताई म्हणजे घड्याळे, कॅमेरे, रेडिओ, येवढेंच. मी एक लहानसा रेडिओ व राममाठीं घड्याळ घ्यायचे ठरविले.

या शहरांत पहाण्यासारखे असे फारसे नाहीं. तशी चर्चेस, टॉवर म्युझियम, गॉर्डन्स, झू (प्राणी संग्रहालय) वगैरे आहेत. पण जर्मनी तील म्युनिच, व बर्लीन शहराप्रमाणें अुत्कृष्ठ असे कांहीं नाहीं. त्यामुळें मी तेथील नकाशा वगैरे जरी खरेदी केला तरी येथें

फारसे पहाण्यासारखे नाहीं असे समजून थोडा कानाडोळा केला. टॉवर, रॉथहौस वगैरे कांहीं इमारती पाहिल्या.

सकाळीं उठून शहरांत अिकडे तिकडे खूप फिरलो. पेठेत जाऊन एक रेडियो व घड्याळ घेतले, खूपच स्वस्त मिळाले त्या नंतर असेच एक भारतीय गृहस्थ रस्त्यांतच भेटले त्यानी मला रेडियो विकत घेण्याबद्दल मदत करायची विनंती केली. त्यांचे बरोबर परत पेठेत फिरलो व त्यांचेसाठीहि एक रेडियो घेतला. पेठ फारच छान आहे व सर्व व्यापार सवगवांनें चालत असतात. आणखी एक घड्याळ घ्यायचे आहे पण ते आतां झूरिच किंवा जिनिव्हामध्यें घ्यावे असा विचार केला.

आज येथें उन्हाळ्याचा असा कांहीं सण असल्यानें शहराच्या पूर्व भागांत म्हणजे नदीच्या पूर्वेस तोरणें, पताका, चित्रे वगैरेंची सजावट चाललेली पाहिली. हे काय आहे याची विचारपूस खूप लोकांकडें केली पण त्याना इंग्रजी कळत नसे व मला जर्मन ! पण 'उन्हाळ्याचा सण' आहे एवढें मात्र कळले. घरोघरी व सामाजिक स्थळीं तोरणें, पताका लावण्यात व दिवे लावण्यांत आलेले होते. काही ठिकाणी स्त्री पुरुषांची व्यंगचित्रे, बाहुल्या लावून त्या सजविण्यात आल्या होत्या. यापुढे लोक खूप दारु पिऊन (त्यांत स्त्री पुरुष) खूप नाचत व गात होते बॅन्ड वाजत होता. ॲकॉर्डिनवर गाणी वाजत होती व त्या तालांत स्त्री पुरुष नाचत होते. नाईटक्लबमध्यें तर दारुचा जल्लोष चालला होता. एके ठिकाणी तर दारुचा पिपे सजविली होती. त्याला फुलांच्या माळा घालून त्यावर प्रकाश झोत सोडले होते. उन्हाळ्याचा हा आनंद उत्सव आपल्याकडील जत्रेळ जवळ शिमग्यासारखा पाळला जात असलेला पाहिला व मला खूप मौज वाटली. खूप लोक जोरजोरानें गाणी गात होते, बरळत होते, ओरडत होते असा दंगा चालला होता रात्रौं १० वा. पर्यंत मी हे सर्व पाहिले व नंतर झोपलो तरी पण मध्यरात्रीहि व पहांटेसुद्धा हा आरडाओरडा ऐकूं येत होता.

असला हा प्रकार मला येथें पहायला मिळाला. मोठी मौज वाटली. फक्त रंग तेंवढा नव्हता. बाकी सर्व भारतीयत्व यांत होते एकदा वाटले हे सुसंस्कृत लोकही असे नाचतात ? यालाच का संस्कृतीचे लक्षण समजायचे ? पण मग एकदा असेहि वाटले कि आनंद व्यक्त करायला कांही पद्धत ही पाहिजे. त्यातीलच हा एक प्रकार आहे असे वाटले. मग भारतात हे प्रकार लहान मोठ्या प्रमाणात नेहमीच चालतात !

असो हे व्यापारी शहर आहे. लोक सर्व व्यापारी व उद्योगी आहेत. त्याचा शीण येऊन खुप नाचतात. मजा करतात. मलाही खूप आनंद झाला. अिकडे अशा मजा चालल्या आहेत तर याच देशाच्या राजधानीत बर्लीन शहरामध्यें गंभीर वातावरण निर्माण झाले होते. वातावरण अितके तंग झालेले होते कि अशांति केंव्हा निर्माण होईल, सांगता येत नव्हते. लढवय्या, उद्योग कला व शास्त्र प्रेमी व धडाडीच्या जर्मनांची काय केविलवाणी परिस्थिति पहा ! त्यांच्या देशांत पूर्व व पश्चिम बलसंस्था आपआपल्या अिभ्रतीसाठीं धुमाकूळ माजवून राहिल्या होत्या. जर्मनांना आपलें खेळणें बनवून राहिल्या आहेत व या सर्वांत आपले म्हणणें, आपल्या अखंड जर्मन राष्ट्राचे म्हणणें मांडण्याचा अधिकार व ते प्रस्थापित करण्याचा अधिकार आज जर्मनाना नाहीं. ते फक्त एवढेच म्हणतात 'तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो'

आहे त्यात, जर्मनाना पश्चिमीगट, त्यांतल्यात्यांत अमेरिकन, फार जवळचे व आपलेसे वाटतात. रशियना बद्दलचा असावा तितका आदर नाहीं. त्यावेळीं हिंदुस्थानचे प्रधानमंत्री श्री नेहरू बर्लिन वादावर कांहीं बोलले त्यांचा अभिप्राय पू. बर्लिनला अनुकूल असा असावेसें वाटले (जर्मन लोकांच्या सांगण्यावरून) त्यामुळें जर्मन लोक नेहरूंच्या असल्या विधानावर थोडेसे रागावालेलें वाटले. दोघातिघा विद्यार्थ्यांनी मला तसे बोलून दाखविले. मी त्यांना अखिल जर्मनानां

आपलें म्हणणें मांडून प्रस्थापित करायला व अखंड जर्मनी निर्माण करायला गांधीवादा अहिंसात्मक कार्यपद्धती अंगिकारायला सांगितले. पण तो विद्यार्थी म्हणाला की हा मार्ग फार कठीण आहे व तो जर्मनांना शक्य होईल असे वाटत नाहीं. शिवाय जर्मनांना पाश्चिमात्यांशी हात मिळवणी करण्यात सर्वांगिण हित आहे असे वाटते वगैरे. मी मात्र माझा विचार मांडला. त्याना तो पटला व वळला नाही.

दुसऱ्याच दिवशी आपल्या विधानाबद्दल गैरसमज झालेला आहे असे सांगून आपल्या म्हणण्याचा खुलासा भारतांतील अमेरिकन वकीलापुढें नेहरूनी दिल्याचे वृत्तपत्रांत वाचले. जरा दिलासा वाटला.

झुरिच (स्वित्सर्लंड)

झुरिचला युथ हॉस्टेलमध्यें २५ वर्षे वयाचे वरील लोकांस घेत नाहींत, तेंव्हा हॉटेलांत उतरावे लागणार, खर्च फार होणार, काय करावे या विवंचनेतच सारखा होतो. व्हिएन्नामध्यें श्री. मार्कस मुल्लर नांवाचे एक झुरिचचेच विद्यार्थी माझे मित्र झाले होते. त्यांना मी सांगितले होते कि मी झुरिचला येणार आहे. त्यानी मला कांहीं मदत करावयाचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणें मी त्याना आगाऊ माझ्या येण्याची वेळ कळवून माझ्यासाठीं एखादे स्वस्त हॉटेल अगर हॉस्टेल पहाण्याबद्दल कळविले होते. पण भितीच होती, कोण जाणें ते भेटोत न भेटोत. पॅरिसमध्यें फादर भेटले नाहींत, माझे बरेच काम राहून गेले तसे झाले तर काय करावे? याच विचारांत मी १२-३० ला Swiss air विमानानें फ्रँकफर्ट सोडले दुपारी २ वा. झुरिचला आलो. विमातळावर उतरलो. मी मार्कसला शोधतो आहे व मार्कस माला शोधतोय असे एकदाचे एकमेकांना भेटलो. त्यानी माझ्यासाठीं आपली कारगाडी Willys आणली होती. मला तर अत्यानंद झाला. कारमधून शहर पहायला फिरायचा योग मला कधीच आला नव्हता. माझ्या अत्यंत स्नेहाचे लोक

मुद्दां मी मागितली तर मला कार देणार नाहींत पण निसुटतो दोस्ती व्हीएन्नाला झाली व मी एक पत्र लिहिले तर मार्कस माझ्या व्यवस्थेसाठीं स्वतःची गाडी घेऊन विमानतळावर आला. दोस्तीचे मुल्य व महत्व या स्विस लोकांना किती आहे याचेच मला आश्चर्य वाटूं लागले. मार्कसच्या कारमधून लिंडेनहॉफहिल, लेक व शहर सर्व फिरून पाहिले. एका उत्तम हॉटेलांत जाऊन रात्रीचे जेवण घेतले, दुसरें दिवशीं मार्कसनें मला आपल्या घरी जेवायला बोलावले. काय हे कमालीचे आतिथ्य ? मी याची फेड कशी करणार ? मी त्याला हिंदुस्थान पहायला यायला सांगितले आहे व मीही त्याचेबरोबर फिरेन असे सांगितले आहे. वेळ फारच उत्तम गेला. कल्पनातीत व्यवस्था झाली. सायंकाळी येथील Tourist enlarger मध्यें राहिलो. व्यवस्था ठीक होती व भाडेही फक्त ३॥ फ्रँक होते. माझ्या युरोप प्रवासांत मला Peopls youth organisation युगोस्लाव्हियाचा पाहुणा म्हणून फार फिरायचा, उत्तम हॉटेलांत (Moscoa) उतरायचा योग आला. त्यानंतर एका मित्राकडे अशी व्यवस्था होण्याचा हाच पहिला अपूर्व योग म्हणावा लागेल. " नशीबा ! तुला अनंत धन्यवाद ! असाच माझा पाठीराखा रहा म्हणजे झाले. "

झुरिच शहर हे अगदी आरशासारखे स्वच्छ व सुंदर इमारतींनीं सजलेले आहे. आम्ही रात्री २ तास शहरांतील मुख्य भागांतून रोषणाई पहात होतो, फारच सुंदर रोषणाई, विजेचे चमत्कार सर्व येथे पहायला मिळाले. रात्री सुखानें झोपलो.

ता. २८-८-६१ ला म्हणजे सोमवारी मी शहर पाहिले. मुख्य म्हणजे येथे सरोवर ओलांडायला झुलत्या डोल्या केल्या आहेत. तारेवर या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्यावर त्या जात असतात. एका वेळीं ६ डोल्या जातात व ६ येतात. खरोखर हे एक प्रदर्शनीय दिव्य आहे व त्यानी ते जागतिक प्रदर्शनासाठीं तयार केले आहे.

★

झुरीच शहरांतील माझे एक मित्र श्री. मार्कस् मुल्लर यांच्या घरीं माझे झुरीचमध्यें वास्तव्य होते. त्यांनीं मला झुरीच शहर, आसपासची पाहण्यालायक ठिकाणें, आल्पस् पर्वतांतील कांहीं भाग स्वतःच्या मोटारींतून व स्कूटरवरून घेऊन जाऊन दाखविले. त्यांचा निरोप घ्यायचे दिवशीं आम्ही झुरीच सरोवरांत कांहीं काळ जलक्रीडा केली. निरोपाचा खाना सरोवरावरील हॉटेलांत घेतला व एकमेकांच्या गोड आठवणीसाठीं हे दोन फोटो घेतले. त्यांनीं त्याच्या प्रती मजकडे पाठवून दिल्या. श्री. मार्कस् अजूनहि कॉलेजमध्यें शिकत असून नुकतेच त्यांच्याकडून ख्रिसमस ग्रिटींग्ज आलेल्या आहेत. मीहि त्यांना नववर्षारंभाचा शुभसंदेश पाठविला आहे.

आता ते टुरिस्ट लोकांसाठीं १-५० मार्क तिकिटावर आहे मी तिकीट घेतले व एकदा सरोवर पार केला. लोंबकळत असलेली डोली तारेला बांधलेली असते व तार फिरते. त्याबरोबर ही डोलीपण! खूप मजा आली. विमानांतील प्रवासापेक्षां हा प्रवास खूप चांगला वाटला. मुख्य कारण सरोवरावर ही डोली फक्त १५०, २०० फूट उंच असलेनें सर्व शहर व सरोवर उत्तम रितीनें पहाता आले. जेट विमानांत काय नुसते आभाळ व ढग पहायचे.

त्यानंतर सरोवरावर थोडा फिरलो व येथील कांहीं जुनी म्हणजे १० व्या शतकांतील रोमन चर्चे पाहिलीं. स्विस लोकांनी याचा जिर्णोद्धार करून फारच उत्तम स्थितींत जपून ठेवलेली आहेत. या लोकांचे पुराण वस्तूप्रेम व सौंदर्यप्रियता पाहून फार आनंद झाला.

त्यानंतर येथील झू पाहिला. प्राणिसंग्रहांत सर्व तऱ्हेचे प्राणी उत्तम स्थितीत व भरपूर संख्येनें आहेत. सहजच एक कल्पना सुचली, मी प्राण्यांना म्हटले, "उत्क्रांती वादाप्रमाणें तुम्ही खूप सुधारायला पाहिजे. अजून तुम्ही पहिल्याच जुन्यापुराण्या स्थितींत कसे ?" वगैरे प्रश्न ! तर त्यांनी मला उत्तरे दिली, 'हे मानवा, तू खूप सुधारलास-नवनवीन शस्त्रे शोधण्यांत, हिंसा क्षेत्रात, पंचशीलेच्या निव्वळ बाता मारतोस ! सहजीवन, सहजीवन, म्हणून बरळतोस ! आम्हालाही जीव आहे, प्राण आहे. आम्हाला सुधारायचा प्रयत्न तू कधी केलास का ? शस्त्र निर्मितीच्या कार्यात डोके खर्च करण्या पेक्षां आम्हाला सुधारण्याचा प्रयत्न केलास ?" माझे म्हणणें -

उत्क्रांतीच्या समयीं सगळे सुधारले रे सुधारले।
वा प्राण्यांनो तुम्ही अजूनी कसे असे रे, कसे असे ?
उत्तर:- उत्क्रांतीच्या पंचशीलेच्या बाता मारती आपले जन ॥
आम्हा वगळूनी जे कांही ते हेच कायरे सह जीवन ?

सायंकाळी मित्र मार्कस भेटला. मी त्याला आज स्कूटर आणायला सांगितले होते. तो स्कूटर घेऊन आला होता आम्ही सायंकाळी शहराच्या एका टेकडीवर गेलो. तेथून शहर पाहिले व

नंतर त्याचे घरी सायंकाळच्या जेवणासाठीं गेलो. आज मला त्याचे घरी आमंत्रण होतें. त्याचे वडिल इलेक्ट्रिकल अिंजिनिअर आहेत. आईपण सुशिक्षित आहे, त्याला दोन धाकटे भाऊ आहेत एक आर्टिस्ट आहे व एक मिलिटरी मध्यें आहे. उत्तम जेवण केले होतें. जेवण घेतले व भारताच्या व स्विस देशाच्या खूप गप्पा मारल्या. त्यांच्या देशांत गेल्या ३-४ शतकापासून लोकशाहि सुखानें नांदत असल्याचे त्यानी अभिमानानें सांगितले खूप आपुलकिनें बोललो. मार्कसच्या आईनें मला आपले सर्व घर, स्वयंपाकघर, बाग, वगैरे दाखविली. अितके सुंदर व सजविलेले घर आहे कि सांगायची सोय नाही ! मला खूप आनंद झाला. भारतीय मनुष्याचा आदर करण्यास आम्हाला फार आनंद होत असल्याचे त्यानी सांगितले. माझ्या मुलासाठीं खेळ, व चॉकोलेट त्यानी दिले. मी नको नको म्हणत खूप म्हटले पण ते म्हणाले तुम्ही आलात हेच जास्तीचे, आमचे देणे काय इतके महत्वाचे नव्हे. असो घरची माणसे भेटल्यासारखी झाली. त्याना हिंदुस्थानला येण्याचे मी आमंत्रण दिले त्यानी नेहरूचा खूप गौरव केला. ही मंडळी भेटल्यानें माझ्या प्रवासाला एक नवा रंगच चढला.

रात्री बोलणें वगैरे सपल्यावर कारगाडीमधून मी व मार्कस शहरातून जरा फिरलो व नंतर १ तासभर सरोवरांत लहान पॅडल बोटीतून जलविहार केला. नंतर त्यानी मला माझ्या गेस्ट हाऊसवर पोंचविले. एकमेकांना नमस्कार केला.

ता. २९-८-६१ रोजी सकाळीं शहरांतील म्युझियस, युनिव्ह सिटी वगैरे कांही भाग पाहिले व मार्कसबरोबर विमानतळावर निघालो. मार्कसचा निरोप घेतला. व विमानांत बसलो.

" अिकडील स्त्रियानां श्रेष्ठ मातृहृदय आहे " हे एक पटले. माझा भ्रम विरघळला. रात्री आम्ही स्कूटरवरून परत निघणार होतो तों मार्कसची आई म्हणते 'थंडी वाजेल, वारा झोंबेल कारमधून जा ! ' धन्य आहे असल्या मातृत्वाची !

जिनिव्हा

'ध्यानींमनीं ते स्वप्नीं' अशी म्हण आहे. पण जिनिव्हांत ते नशीबीसुद्धां आले. जिनिव्हामध्यें आपल्या ओळखीचे कुणी नाहीं. येथील यूथ हॉस्टेलमध्यें २५ च्या वरच्या लोकांना परवानगी नाहीं. हे सर्व मला माहीत असल्यानें मी कुठें उतरावे, माझी व्यवस्था कशी होणार वगैरें खूपच विचार माझ्या डोक्यांत घोळत होते व अगदी त्याप्रमाणेंच झाले. दुपारीं २ वाजतां जिनिव्हाला आलो. माहिती खात्यांत एखाद्या स्वस्त दराच्या हॉटेलाची चौकशी केली तर कळले की, सर्व हॉटेलें भरलेली आहेत व जागा कोठेंच नाहीं. मजजवळ युनिव्हर्सिटी हॉस्टेलचा पत्ता होता. तेथें गेलो, तेथेही जागा नाहीं. मोठा कठिण प्रसंग आला. नंतर हॉटेलें शोधूं लागलो, तेव्हां स्टेशनजवळच 'हॉटेल फेडरल' या हॉटेलांत जागा मिळाली. पण निव्वळ भाडे २० फ्रँक, अंदाजे २५ रुपये. यांत जेवण व नाष्टा नाहीं. मी थक्कच झालो. मजजवळ अवघे ३५ फ्रँक होते, त्यांत जिनिव्हा सपवावयाचा माझा विचार. पण आणखी २ पौंड तरी जरूर खर्च करावे लागणार हा विचारच झोंबूं लागला. पण काय करणार? 'आलिया भोगासी असावे सादर' या न्यायानें हेच जागा ठरवली व पथारी टाकली, २० फ्रँक दिले. एवढें होईपर्यंत सायंकाळचे ७ वाजले. आतां रात्रीं सरोवराचे किनारीं फिरायला निघालो. सरोवर फार छान असून उन्हाळ्यानिमित्त सर्वकडे रोषणाई केलेली आहे खूप उत्तम आहे. सरोवरांत २०० फूट उंच उडणारा एक कारंजा आहे. तो फारच सुंदर असून त्यांत दिवा असल्यानें तेही दृश्य फारच सुंदर दिसतें. तसाच पहात पहात चाललो, एक भारतीय गृहस्थ भेटले. ते अमेरिकेहून हिंदुस्थानाकडे निघाले असतां येथे २ दिवसासाठीं उतरले होते. खर्चाच्याबाबतींत आपली एकसारखी हजामत कशी होत आहे, याच्या त्यानीं खूप गमती सांगितल्या व म्हणाले, 'खरोखर केस

कापून घ्यावे किंवा नाहीं याचा मी विचारच करतो आहे.' खूप मजा आली. रात्रीं ९॥ वाजेपर्यंत फिरून हॉटेलांत आलो. सोबत ब्रेड आणली होती, ब्रेड खाल्ली व कपडे धुतले. एवीतेवी २० फ्रँक दिलेच आहेत, पुरेपूरा फायदा घ्यावा म्हणून कपडे धुतले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं गरम पाण्यानें सर्व अंग धुतले, सफाई केली व बाहेर पहायला निघालो.

सर्वप्रथम U. N. O ची युरोपियन कचेरी, असेंब्ली हॉल वगैरें सर्व व जागतिक, मानवीक प्रगतीचा स्मारक गोल (Memorial) पाहिला. जिनिव्हामध्यें मला हीच एक इमारत पहावयाची होती. पाहिली, समाधान झाले. या इमारतीत नाना देशाच्या कलाकारांनीं नानातऱ्हेच्या वस्तू भेटीदाखल दिलेल्या आहेत. जागोंजागीं जागतिक शांतीची व शांततामय सर्वांगिण प्रगतीची चित्रें व स्मारकें आहेत. पाहून असें वाटले की, असे जर झाले तर या अवनितलावर नंदनवन नाचेल. पण जेव्हां पुराणिकबुवांची "पुराणांतील वांगी पुराणांतच" ही म्हण आठवली, तेव्हां माझ्या डोक्यांतील भ्रम नाहींसा होऊन, विचार जागृत झाला. शांतीचे गोडवे गाणारी प्रबल राष्ट्रें क्षणार्धांत सर्व जग उध्वस्त करायला अनमान करणार नाहीत अशा सशस्त्र, जय्यत तयारींत आहेत. फ्रान्स, अल्जिरिया व ट्युनिशियाचे नरडें सोडायला तयार नाहीं. इंग्लंड आपले साम्राज्य गमावूं इच्छित नाहीं. अमेरिका तर सर्वच आपल्या तंत्रानें चालावे म्हणते. रशिया कम्युनिझमचे गोडवे गात क्षणार्धांत बर्लिन प्रश्नावर सर्व जग नष्ट करेन, अशा बढाया मारत आहे.

बर्लिनसाठीं प्रसंगीं तिसरें महायुद्धही पत्करूं असें चारही राष्ट्रें म्हणत आहेत. काय विचित्र पहा ! हे जोंवर आहे तोंवर ही युनोची कचेरी जगावर आपला प्रभाव कसा टाकणार व जगांत शांति कशी निर्माण करणार ?

दुपारीं म्युझियम्स, राजवाडे, स्मारकें व युनिव्हर्सिटी पाहिली व नंतर विमानाच्या तिकिटाचे कन्फरमेशनसाठीं AZ कडे गेलो. ते म्हणाले, – जिनिव्हा-झुरीच जादा आकार द्यावा लागेल. मग TWA कडे गेलो, तेही प्रथम असेच म्हणाले. मी म्हटले, 'तुमच्याच ऑफीसचे तिकीट आहे, तुम्ही असे कसे म्हणता? मी तर जादा पैसे द्यायला तयार नाहीं.' खूप बाचाबाची झाली व मी एक तक्रारी अर्ज लिहून मॅनेजरकडे दिला व त्याचे लेखी उत्तर मागितले. पण पुढें त्यानेंच परत एकदां विचार करून AZ बरोबर बोलणी करून तो प्रसंग मिटविला व जादा आकार न भरतां सर्व प्रवास होईल असे आश्वासन दिले. मी त्याला धन्यवाद दिले व माझा तक्रारी अर्ज मागें घेतला.

नंतर हॉटेलाकडे आलो. मी १२ वाजण्याचे आंत त्या दिवसाचे भाडे दिले नाहीं म्हणून मालकिणीनें माझी खोली दुसऱ्यास देऊन टाकली परत जागा शोधायचा प्रसंग! १०–१२ हॉटेलें विचारली, जागा कुठेही नाहीं. शेवटीं इन्फरमेशन ऑफीसकडे गेलो. तेथें एक बाई आपल्याकडे पेईंग गेस्ट पाहिजे म्हणून आल्या होत्या. माझें नशीब थोर. २० फ्रँकची जागा जाऊन ८ फ्रँक देऊन एका घरीं रहायचा सुयोग आला. मी त्या बाईबरोबर तिच्या घरी गेलो. तिला मी रात्रीचे जेवण शाकाहारी मागितले. तिनें ३ फ्रँक मागितले, मी दिले. बाईनें अवघ्या ३ फ्रँकमध्यें उत्तम पोटभर जेवण दिले. मी 'अन्नदाता सुखीभव' म्हणून ढेकर देऊन उठलो. बाई व तिचे पतिराज दोघेही फार चांगले होते. वयानें उतार होते. त्यांना फ्रेंच येते, मला इंग्रजी! मोठा कठिण प्रसंग! पण खाणा खुणांनी सर्व चालले. बाईनें पैसे घेतले म्हणूनही विकतचे आदरातिथ्य तिजजवळ नव्हते. फार मनमिळावू व सालस होती. माझी व्यवस्था चांगली ठेवली. योगायोग म्हणायचा. विसांत मानगुटी! आतां काय करावे म्हणतो तों १० फ्रँक बचत व्हायचा योग आला, आनंद झाला. वेळ आली म्हणजे अशी येते. हीच वेळ

काल आली असती तर! पण ती काय सांगून येते? रोज अनुभवाव्या त्या त्या नवनवीन गमती वरील यजमानिणीचे घर अगदी लहान. १ स्वयंपाकघर, त्यांत गॅसच्या शेगड्या, रेफ्रिजेटर, कपाटें, कपबशा व प्लेट वगैरें ठेवण्याची जागा, अन्न ठेवण्याची जागा व भांडी धुण्याचा बेसीन. एवढी सर्व कामें उभे राहून अथवा स्टुलावर बसूनच करायची. एक बाथ व वॉशरूम. त्यात वॉश बेसिन आरसा, बाथ-टब व इतर सामान. एक स्वतःची झोपण्याची खोली, डबल बेडची एक पाहुण्यासाठीं रूम. त्यांत १ बेड, कपाट, आरसा, टेबल, खुर्ची, बेडलँप, आंथरूण, पांघरूण वगैरें सर्व व्यवस्था. एक संडास. त्यांत कमोड व घरगुती इतर सर्व कचरा सामान ठेवण्याची व्यवस्था. केरसुण्या युरोपी पद्धतीच्या, उभे राहून केर काढायच्या.

येथें जेवायची पद्धत पूर्ण निराळी. काटा, सुरी व चमचा यांच्या सहाय्यानेंच जेवायचे. कारण हे लोक जेवणांत पातळ पदार्थ घेतच नाहीत. ब्रेड, सँडविच, आमलेट, बटाटा चिप्स, श्रावण घेवडा शेंगा, शिजविलेला सूप असे घेतात. जेवणानंतर कांहीं गोड पदार्थ, फळफळावळ अथवा पुडिंग व नंतर फळाचा रस किंवा चहा अथवा कॉफी घेतात चहा, कॉफी बहुशा दुधाविना व लिंबू घातलेला आणि कमी साखरेचा असतो. भात खायची प्रथाच नाहीं. पण तांदळासारखेच धान्य मिळते. ते शिजविल्यावर जाडधामरड्या घवन्यासारखे होते मग त्यांत सूप मिसळून हे लोक खातात.

मी शाकाहारी भोजन मागितल्यावर यजमानिणीनें मला हाच घवल्यासारखा पदार्थ टोमॅटो सूप मिसळून दिला. बटाट्याच्या फोडी तळून दिल्या, घेवडा (श्रा.) शिजवून दिला व ब्रेड दिली. हे सर्व खाल्यावर तिनें केळी व द्राक्षें दिली व नंतर मी दूध मागितले म्हणून मला दूध व साखरेची कॉफी मिळाली. मला

तर खूपच आनंद झाला. पोट भरले. 'आणखी थोडा खाता?' असे तिनें मला मोठ्या आपुलकीनें विचारले. तिनें अन्नही खूप शिजविले होते, तेव्हां शिल्लक राहिले. मी म्हटले, पोट भरले, धन्यवाद !

रात्रीं लेकवर फिरायला गेलो व ९॥ वाजतां परत आलो. लेकच्या सभोंवताली न्यूऑन साईन्स, दिव्याच्या माळा, ट्यूब व लाईट्स, मरक्युरी लँप्स, कारंज्यांत लाईट असा सर्वकडे दिव्यांचा झगझगाट होता. तासभर बसून समाधान झाले. रात्रीं घरीं आलो, लिहिले, वाचले व झोपलो.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठलो, स्नान केले (टबबाथ) खूप हलके झाल्यासारखे वाटले. नंतर मालकानें कॉफी दिली. (मालकीण झोपली होती. तिचे कान मंद असल्यानें ती उशीरा उठत असे) कॉफी प्यायचा मला आग्रहच केला. त्यामुळे मी घेतलो व मनांत आले, पुन्हा याचे पैसे द्यावे लागतात कीं काय? मला जशी हवी तशी कॉफी दिली, मी प्यालो व सर्वांचा निरोप घेतला या घरांत किंवा या युरोपांतच म्हटले तरी चालेल, स्त्रियांचे प्राबल्य पुरुषांवर जास्त आहे. घरव्यवहारांत तर पुरुषांना हक्कच नाहीं. पुरुषांनीं स्त्रियांच्या सांगण्याप्रमाणेंच ऐकावयाचे. झुरीचमधील मार्कसच्या घरीं, लंडनमधील गुल्हाणेंच्या घरीं पण मला हाच अनुभव आला. मला एका दृष्टीनें आनंद झाला. कारण इकडे स्त्रियांना केवढें महत्वाचे स्थान आहे. भारतांत अशी व्यवस्था केंव्हा प्रचारांत येणार? माझ्या घरीं तरी तशी व्यवस्था आहे व ती पूर्णतःच आणायचा मी आतां प्रयत्न करेन. अधूनमधून घरगुती व्यवहारांत तोंड घालायची मला संवय आहे. ती आतां घालवायलाच पाहिजे. जे चांगले ते स्वीकारायलाच हवे. युरोपांतील स्त्रिया तर कलाकुसरीच्या कामांत, कारखान्यांतील फाईन आर्टस कामांत, ऑफीस कामांत, दुकानांत, रेस्टॉरेंटमध्ये पुरुषांच्या पेक्षां

उत्तम काम करत असव्यात. कारण जिकडे पहावें तिकडे यांचाच भरणा जास्त आहे. कठीण, भारी. धाडसाची व जबाबदारीचा कामें पुरुष करतात. स्त्रिया मिळवत्या असल्यानें त्यांना समाजांत समान व उच्च स्थान आहे.

व्हेनिस.

युरोपचा प्रवास करायचा ठरला तेव्हांच व्हेनिस व रोम पहायचे असा मनाचा निर्धार केला होता. जिनिव्हाहून व्हेनिसला जिनिव्हा झूरिच, झूरिच मिलान, व मिलान व्हेनिस, असे विमान मार्गे जावे लागते. मला मिलान व्हेनिस रिझर्वेशन मिळाले नाहीं, तरी पण मी निघालोच. नेमका मिलानला आलो व विमानांत जागा नाहीं असे सांगण्यांत आले व माझे नांव वेटिंगलिस्टमध्यें ठेवण्यांत आले. मीही उभाच राहिलो पण शेवटच्या ५ मिनिटांत मला जागा मिळेल असे सांगण्यांत आले. खूप धांवपळ केली व विमान गाठले.

हा सर्व प्रवास डाकोटा विमाननें असल्यानें ही विमानें फार उंचावरून जात नव्हती, त्यामुळें सर्व प्रदेश छान पहायला मिळाला. इटलीमध्यें संगमरवरी दगडाचे डोंगर आहेत व तेही पांढरे, असे ऐंकले होते. झूरिच ते मिलान प्रवासात जवळ जवळ १०० मैल असल्या पांढऱ्या संगमरवरी पर्वतांच्या रांगा पहायला मिळाल्या. जेथे जेथें खाणी असत तो भाग अगदी पूर्ण शुभ्र दिसे. प्रथम मला वाटले बर्फ असेल पण चक्क उन पडलेले, बर्फ असलेच तर जवळ पास पाणी थोडे तरी सांचत असावे. पाण्याचा कुठेच पत्ता नाही निव्वळ खडकाळ पर्वत सांठा खूप आहे. म्हणूनच ते पुराणकाला पासून शिल्पकलेत पांढऱ्या संगमरवराचा पुरवठा करून राहिले आहेत. या खडकाळ प्रदेशांत झाडेझूडपे, गवत, कांही नाहीं केवळ पांढरे डोंगर पहायला खूप मजा आली. एवढी सौंदर्यसंपत्ती इटली मध्ये आहे याचा हेवाही थोडावेळ वाटला.

मिलान सोडले, जेवण देण्यांत आले जेवण घेतले व लगेच समुद्रकिनारा दिसू लागला. मी बुचकळ्यांत पडलो व्हेनिस समुद्र किनाऱ्याचे बंदर आहे असा माझा अंदाज. समुद्रावरून तरी आम्ही जातो आहोत. मग व्हेनिस कोठे ? व्हेनिस हे इटालीला लागून असलेल्या छोट्या-मोठ्या बेटांचेच शहर आहे. त्यामुळें ते सर्व शहर पाण्यात तरंगत आहे पण भीती ते बुडते आहे कीं काय अशी. कारण समुद्र चोहोंबाजूनें आपली मिठी अशी जोरांत मारतो आहे कि तशी भिती वाटणारच. कोठेंहि थोडी घराविना जागा म्हटले कि समुद्रमहाराज शिरलेच आंत. त्यामुळें जुन्या व्हेनिस शहरात रस्ते सुद्धा मोठाले रुंद असे नाहीत सरासरी ४-८ फुटाच्या रुंदीचे रस्ते आहेत. व इमारती सर्व ५-६ मजली तरी आहेतच त्यामुळें व्हेनिसच्या लोकांना सुर्योदय व सुर्यास्त गांवात राहून पहायला मिळणें शक्य नाहीं व या शहरात सायकली, मोटारी आदि वाहनाना निसर्गानेच बंदी घातली आहे. पण कालव्यांचे जाळे गांवभर पसरले असल्यानें मोटार - लाँचेच, होडकी वगैरे खूप आहेत. व सर्वप्रकारची वाहतूक यांतूनच होत असते. समुद्राचे पाणी कित्येक घरांच्या उंबरठ्यात. मला आधी वाटले अशा ठिकाणी पोराबाळांची गत काय ? पण समुद्रांत बुडून पोरेबाळे दगावल्याचे ऐकले नाहीं ! धन्य आहे कि नाहीं व्हेनिसच्या नागरिकांची ? परसात समुद्र असून त्याना धोका वाटत नाहीं. आमचेकडे तर समुद्रच काय पण आहेत त्या विहरी नाल्यातून पाणीसुद्धा असत नाहीं. तरी दगा धोका अंकावात आहेच, मी तर बहुतेक सर्व फिरणे होडी व लाँच मधूनच केले. दुपारी मुद्दामच गांव पहावे, रस्ते पहावे. दुकानें पहावीत, घरे पहावीत स्वच्छता पहावी म्हणून शहरांत गेलो होतो. ३-४ फु. रुंदीच्या बोळकांड्यातून जाताना भितीच वाटे कारण वर पहावे तर ६-६ मजली इमारती.

असल्या या जलमय शहरात पुरातन इमारती मुख्यतः राजवाडे व चर्चे फारच रम्य व सुंदर आहेत. यावरून कयास असा

करावासा वाटतो कि पूर्वी व्हेनिस शहराची भरभराट आजच्या पेक्षांही जास्त झालेली असावी. सर्वच इमारती उत्तम व प्रेक्षणीय व प्रत्येक एक एका नवीन पद्धतीची व घडणीची शहरांत खूप उंच मनोरे (Tower) आहेत. त्यात पिसामधील Slanting Tower सारखा एक आहे. त्याची बांधणीच तशी आहे म्हणें. मलातरी हा टॉवर पाहून पिसा टॉवर पाहिल्यापेक्षाही जास्त समाधान झाले. सेंट मार्कोचे चर्च व जवळच असलेला राजवाडा वगैरे फारच प्रेक्षणीय आहेत त्यालाच लगत एक मनोरा आहे त्या मनोऱ्यावरून सर्व शहराचे विहंगमावलोकन उत्तम केले.

व्हेनिस शहर एक मोठे थोरले बंदर आहे. अगदी मोठमोठाली टोलेजंग मालवाहू जहाजे एकसारखी येत जात असतात. वरदळ रात्रंदिन चालूच असते. मोटारी वाहनांची नाहीं म्हटली तर होड्या लाँचेच व जहाजे यांची वरदळ फारच आहे. समुद्राला कोणीच विश्रांती द्यायला तयार नाही, समुद्र व्हेनिसला गिळेल म्हणतो पण वामनानें बळीराजाला पाताळात घाडल्यासारखे व्हेनिस नगरवासी समुद्राला असे एकसारखे पायाखाली तुडवित आहेत कि काय बिशाद आहे याची व्हेनिस नगर गिळायची माणसानी येथें उत्कृष्ट इमारतीही बांधून ठेवल्या आहेत. व शहराची एकसारखी भरभराट होत आहे.

शहरातून फिरताना अेक मूर्तिकार शिल्पी भेटला. मी हिंदुस्थानी असे ओळखून त्यानें मला बोलावले. आपला कारखाना दाखविला तो १९४२ मध्यें दुसऱ्या महायुद्धांतील युद्धकैदी म्हणून भोपाळ जेलमध्यें दोनवर्षे होता म्हणें! भोपाळमधील सैनिक स्मारकाच्या कामांत त्यानें खूप काम केले होते म्हणें ! त्यानें भारताबद्दल फार गौरव व्यक्त केला. नेहरू फार शहाणें पंतप्रधान आहेत असे सांगून त्यांची त्यानें तोंडभर प्रशंसा केली. भारत फार समृद्ध देश आहे फक्त तेथें खूप उद्योगधंदे पाहिजेत असे तो सांगत होता. खूप बोलणें झाले मी त्याला धन्यवाद दिले व त्याचा निरोप घेतला.

तेथून समोरच समुद्रांत सेंट मायकेल कॅथड्रल दिसले. मोठे थोरले कंपाऊंड होते. पहायला गेलो, तर आंत एक विशाल ख्रिस्ती स्मशान होते. अनेकांनीं आपआपल्या आप्तांच्या दफत भूमीवर क्रास, कुणी पुतळे, कुणी कळस, बसविले असून त्याना झुडपे लावली आहेत. कुणी नंददीप ठेवलेले तर कुणी इलेक्ट्रिक दिवा ठेवला आहे. श्राद्ध दिनीं आप्तअिष्ट मंडळी मृताःयाची आठवण काढून तेथे येऊन दफनभूमी साफसूफ करून पाणी शिंपडून त्यावर फुले वाहून थोडावेळ बसलेली मी पाहिली, आमचेकडे श्राद्धविधी आहे तर अिकडे हा विधी! कांहीतरी जरूर आहे खास, हे पाहून मला समाधान वाटले.

इकडील लोक दारु फार पितात, पाणी प्यायचे त्याना माहीतच नाही असे म्हटले तरी चालेल. मी हॉटेलांत पाणी मागितले तर वॉटर हा शब्द सामान्यपणें कुणाला ठाऊकच नाहीं. दारू इतकी पितात कि सायंकाळीं त्यांची स्मृती अर्धी अधिक गेलेली असते. पण सर्व लोक उद्योगी आहेत. गरीबीही थोड्याफार प्रमाणांत आहेच. लोक परकियांचा खूप आदर व विचारपूस करतात.

लिडो एक याच शहराचे दक्षिणोत्तर, लांबच लांब, रुंदी अगदीच कमी असलेले एक बेट आहे. नवीवस्ती इकडे फार छानच वसलेली आहे. नव्या इमारती खूपच सुंदर असून रस्ते वगैरे प्रशस्त आहेत. थेयें मोटारी आदी सर्व वाहनांच्या सुखसोयी आढळतात. व्हेनिस शहराचे चैन करणारे सर्व लोक येथें येतात. कारण या बेटाच्या पूर्वेस समुद्र किनारा खूप उथळ असल्यानें पोहण्याची वगैरे खूप सुखसोय आहे. सायंकाळी तरी हा भाग भरलेला आढळला मी सहजच नवा भाग पहावा म्हणून इकडे आलो. पाहिल्यानें पूर्ण समाधान झाले.

इकडे भाजीपाला, खूपच प्रकारचा मिळतो, नारळ मिळतात खोबरे (ओले) सर्वकडे विकत मिळते. मी खूप खोबरे खाल्ले,

बायका जरी साड्या नेसत नसल्या तरी खूप बायका वेण्या, बुचडे वगैरे प्रकारे केस बांधतात. गळ्यांत, कानांत मण्यांचे व मोत्यांचे अलंकार घालतात. बाकी वस्त्र म्हणजे झगेच आहेत. पुरुष अगदी इंग्रजासारखे पोषाखात पुराण प्रिय नाहीत. पँट, मँनिला सर्वकांही प्रकारचे पोषाख पहायला मिळाले. गवतीटोप्या हे येथील वैशिष्ठ्य ! अनेक लोक असल्या टोप्या वापरतात. उन्हाळा फारच आहे. त्यामुळें उन्हापासून रक्षण करण्यासाठीं वरील टोप्या घालतात.

लोकांच्या स्वभावात सर्व प्रकार आढळतात. प्रामाणिक, अप्रामाणिक, साधे, पोषाखी सर्व प्रकारचे लोक पहायला मिळाले. घरे बऱ्याच अंशी जुन्या पद्धतीची आहेत. पण त्यात नव्यानें वीज व पाण्याची व्यवस्था करून घेण्यात आलेली आहे घर बांधणींत खालचे थर दगडाचे व वर विटा व लांकूड, छपरावर कौलें अशी व्यवस्था आहे.

फ्लॉरेन्स.

सकाळीं ९-४० ला विमानानें व्हेनिसहून निघून १०-३० ला फ्लॉरेन्सला आलो. फ्लॉरेन्स विमानतळावरचे हे विमान इटली देशांतील अंतरीक वाहतूक करणारे, भारतांत जशी डाकोटा आहेत तसलेच विमान होते. अवघ्या २८ जागा होत्या, विमान पूर्ण भरलेलें होते. लहान असल्यानें फारसे उंचावरून उडत नव्हते. त्यामुळें इटली देशाची जमीन, शेती, डोंगर, जंगल, नद्या, ओढे पहायला मिळाले. हा भाग मला जरासा आमचेकडील भागासारखा वाटला. (थोडा उष्ण) जंगलांत झाडी फारच कमी व जास्त डोंगर पथ्थरांचेच. नद्या उन्हाळ्यामुळें सुकू लागल्या आहेत. ओढ्यांचे तर केव्हांच निवाळे निघून गेलेले आहे. वास्तविक अितर ठिकाणीं शेते सदा हिरवीगार म्हणजे कांहीतरी पिके केलेली आढळतात पण इकडे बरीच जमीन नांगरून पावसासाठीं तयार करून ठेवलेली दिसली. शेतीचे काम बहुतकरून सर्व ट्रॅक्टरनें व कांहीं प्रमाणांत घोडा अगर गायी बैलानें

केले जात असल्याचे पाहिले. मात्र देशभर वीज व पाणी पुरवठा आहे. मधे मधे मोठमोठाले कारखानें, खाणी वगैरे पाहिल्या. उंचावरून पाहिल्याकारणानें निश्चित कसले कारखानें असावेत सांगतां येणार नाहीं पण जागोजागीं उद्योगधंदे खूप आहेत हे मात्र खास. हा देश रिपब्लीक म्हणजे प्रजाराज्याचा आहे व लोक खूप उद्योगी आहेत.

शहरांत आलो व उद्यांच्या रोमच्या प्रवासाची जागा निश्चित करायचा प्रयत्न केला. जागा नाहीं. नांव वेटिंगलिस्टमध्यें ठेवले गेले. उद्याच काय ते कळायचे. पण मी उद्या जर विमानांत जागा मिळाली नाहीं तर रेल्वेनें रोमला जावे म्हणतो आहे. अंदाजे २० रुपये तिकीट बसेल. अंतर ३०० K. M. असून गाडी ४ तासांत रोमला जाईल, देशही पहायला मिळेल. विमानानें फक्त आकाशी उड्डाण झाले. युरोपांतील देश पहावा म्हणतो, पाहूं कसे काय जमेल ते फक्त प्रश्न आहे तो २० रु. जादा खर्चाचा.

येथील हॉस्टेल दुपारीही उघडे असल्यानें दुपारीच तेथें गेलो व कित्येक दिवसानंतर (युगोस्लाव्हिया सोडल्यापासून) आज दुपारचे जेवण घेतले. सहाजिकच नंतर थोडी वामकुशी.

शहर फारच छान अगदी रेखीव व बांधीव आहे. सर्व इमारती उत्तम स्थितींत असून सर्वच्या सर्व दगडी व बहुमजली आहेत. चर्चें, राजवाडे तर उत्कृष्ठ दगडांचे व चांगल्या स्थितीत आहेत. बांधकाम संपून शतके लोटली तरी इमारती उत्तम स्थितींत राखण्यांत आलेल्या आहेत. चेसा कॅथेड्रल व त्याचे बाजूचा टॉवर खूपच उंच आहेत प्रत्येकी ४१० पायऱ्या चढाव्या लागतात. अेक अेक पायरी अंदाजे ८–९ इंचाची आहे. टॉवरवर उभे राहीलयावर सर्व शहराचे विहंगमावलोकन सहज करतां येते. चढून जायला त्रास झाला पण चढल्यावर सर्व शीण नाहींसा झाला. या शहराच्या चारी बाजूस डोंगर आहेत व डोंगरमाथ्यापासून तो समतळ अशा गांवठाणापर्यंत सर्वकडे वस्ती आहे. डोंगरावर हवेल्या बांधल्या गेल्या आहेत. जाय

यायला सुंदर रस्ते आहेत पण झाडी कातरलेली, तोडलेली नाहीं ती तशीच राखलेली आहे. त्यामुळे आजूबाजूचे सृष्टीसौंदर्य फारच छान वाटते. आमचे हॉस्टेलही पश्चिमेकडील टेकडीवर आहे. जागा फारच रम्य आहे. हॉस्टेल कसले एक सरकारी गेस्ट हाऊसच आहे. टॉवरवरून हॉस्टेलची जागासुद्धा पाहिली. टॉवरवर चढल्यानें शहराची पूर्ण माहिती झाली. या शहरांतील गांवठाण्याचा मध्यभाग हा अगदी दाट वस्तीचा व घरे व ऐतिहासिक इमारतीनें भरलेला आहे. येथें रस्ते इतके लहान आहेत कीं मोटारीसुद्धा अगदी मुष्कीलीनें चालतात. त्यामुळें रहदारीची फारच अडचण आहे. बरे, रस्त्यांची रुंदी वाढविण्यासाठीं इमारती सरकविणें स्तुत्य नाहीं, कारण सर्वच इमारती मग तो घरे, दुकानें कांहींही असो, एकेकापेक्षा सुंदर आहेत व त्यांची निगा पण चांगली राखलेली आहे. हा मधला भागच एवढें जुनें शहर. त्याचे भोंवताली वर्तुळाकार डोंगराच्या पायथ्याशी जो नवी वस्ती झालेली आहे तो नवा भाग. येथें रुंद रस्ते, बस गाड्या, ट्रॉली बसेस् वगैरे सर्व वाहतूक व्यवस्थित चालते पण वास्तूकलेची सुंदरता या भागांत दिसून येत नाहीं. आहेत ही घरे अमेरिकन चौकोनी बांधणीची, त्यांत नाविण्य कांहींच नाहीं.

शहर तसे फार मोठ्या वस्तीचे नाहीं. सर्व मिळून ७–८ लाख फार तर वस्ती असेल पण शहराची बांधणी फारच छान आहे. त्यांत या शहरामधून नदी वाहत असल्यानें शहराचे सौंदर्य अधिकच वाढले आहे. मात्र या कालांत नदीचे पाणी रोडावलेले आहे. तळ दिसू लागला आहे. ऐतिहासिक इमारतीमधून शिल्पांत नक्षीकाम पुतळे, व रंगीत मोठमोठाली चित्रे फारच छान काढण्यांत आलेली आहे. ५–६ शेहे वर्षापूर्वीही फ्लॉरेन्स शहर किती सुंदर होते व त्याकाळीं त्याचे सौंदर्य किती होते याची कल्पना करतां येते.

मात्र या शहरांत सुट्टीत रहायला येणारे लोक फार असलेनें व हे थंड हवेचे ठिकाण असल्यासारखे असलेनें येथें महागाई फार आहे. व्हेनिसपेक्षा हे शहर थोडें महागच आहे. पण शहर मात्र स्वच्छ आहे. घाण कोठेही दिसून येत नाहीं. असले स्वच्छ शहर पाहिले म्हणजे मनाला आल्हाद वाटतो.

येथील रेल्वे स्टेशनही अगदी अत्याधुनिक बांधणीचे असून शेकडो गाड्या इटली देशाच्या सर्व भागाकडे सुटतात. मात्र येथें स्थानिक रेल्वेगाड्या नाहीत. भुयारीगाडी काढून रहदारीचे नियंत्रण सुद्धा स्वयंचलित नाहीं. पोलीसलोक चौकाचौकांत उभे राहून हात दाखवून हिरवा, लाल दिव्यानें नियंत्रण करीत असतात. रस्ते अरुंद असल्यानें रहदारीची गर्दी वाटते.

सकाळी उठून येथील आर्ट गॅलरी पाहिली. युद्धचित्रे फारच भव्य व सुंदर काढलेली मला आढळली. एका भल्यामोठ्या महाला मध्ये अवघी चारच भली मोठी युद्धचित्रे आहेत. फार वेळ पहात होतो. केवढ्या मोठ्या प्लेटस् त्या व सर्व चित्रें बहुरंगी व उत्तम स्थितीत आहेत. आणखीही खूप चित्रे पाहिली. इथला विशेष वरील चित्रांचा !

फ्लॉरेन्सला आणखी एखादा दिवस रहायला पाहिजे होते, शहर जरी लहान असले तरी खूपच गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. आजूबाजूचा निसर्गसुद्धा एकवेळ पहावा असा आहे पण रोमही तितकेच चांगले व Must be seen असे शहर असल्यानें मला फ्लॉरेन्स नाइलाजानें सोडावे लागले. हॉस्टेल तर एक हवेचेच ठिकाण आहे (Summer Palace) असे म्हणावे लागेल (पण येथील जेवण मात्र मला मुळीच आवडले नाहीं. पाणीही कांही विचित्रच होते.

रोम

युरोपांत मला शेवटपर्यंत साथ दिला असेल तर माझ्या चिकाटीनें स्टॅट फोर्ड अपॉन ॲव्हॉनवरील हॅम्लेट नाटकाचा एक अपवाद सोडला तर सर्वचकडें माझ्या चिकाटीमुळें माझी कामें होत गेलेली आहेत. आतां परत याची परीक्षा व्हावयाची वेळ आज आली. Alitalia विमान सर्व्हीसनें मला आज रोमला जागा मिळायची शक्यता नाहीं असे सांगितले व सोमवारी जागा मिळेल म्हणाले. मी तरी रविवारीच रोमला जायचा कार्यक्रम आंखलेला. जर जागा मिळाली नाही तर रेल्वेनें रोमला जायचे हा माझा विचार पण असें करण्यांत एकतर माझ्या युरोपच्या हवाई प्रवासाचा सांखळी मध्येंच तुटणार यांचेच मला फार वाईट वाटत होते. वाईट वाटूनहि चांगले म्हणजे रेल्वेतून गेल्यास देश जवळून पहायला मिळेल हा एक आनंद ! पण त्याच बरोबर २० रु. जादा तिकीट खर्च असा कांहीं प्रसंग होता. मी आज सकाळी आर्ट गॅलरी पाहिली व विमान कचेरीत १० वा. चे सुमारास येऊन बसलो. अधिकाऱ्यानें माझे तिकीट मागून घेतले व बसावयास सांगून म्हणाले " आतां तुम्ही चिकटपणानें येऊन बसलाच आहात जागा झाली तर तुमचे नशीब " मी ही बसलोच १०॥ वाजले सर्व लोक आपापली तिकीटें घेऊन विमान तळाकडें जाणाऱ्या मोटारीत जाऊन बसले मी विमान कचेरीच्या अधिकाऱ्याकडें व तो मजकडें असें पहातो आहो. त्यानें शेवटी विमानतळाला फोन केला व नशीब माझे कीं एकच जागा आहे असे कळले. चटकन तो म्हणाला, " वाटवे तुम्हीं मोटारीत चला." मला अगदी भयंकर आनंद झाला व मी धावतच मोटारीत चढून बसलो. विमान कचेरी अधिकाऱ्याला धन्यवाद देऊन त्याचे आभार मानले व अशाप्रकारे विमान प्रवास वर्तूळ पूरे होणार या आनंदांत विमानाकडें निघालो. विमानांतही मला फार छान जागा मिळाली (खिडकीची). विमान लहानसे डाकोटा असल्यानें सर्वप्रदेश अगदी

थोडक्या उंचावरून पहायला मिळाले. इटलीमध्यें शेतीसुद्धा खूप कसोशीनें केली जाते. डोंगराच्या माथ्यावरसुद्धा शक्यतो शेती केलेली आढळली. जमीनीचा इचन् इंच शेतीसाठीं उपयुक्त असा उपयोगांत आणला आहे. भाग डोंगराळ असल्यानें सुकी शेती आहे. पणशेती केलेली आहे ही गोष्ट मला फार आवडली. जागोजागीं कारखानें विखुरलेले आहेत. पण जर्मनीपेक्षां इकडें कारखान्याचे प्रमाण थोडे कमः असावेसे वाटते. कारण खनिज संपत्ती थोडी कमी आहे. पाणी मग तो ओढा असो अथवा नदी; सर्वकडें बांधलेले आढळले व त्यापासून कालवे काढून शेतीला त्याचा उपयोग केला आहे. त्यामुळें जागो जागीं थोडे मोठे जलसमूह पहायला मिळाले. कांहीं ठिकाणी जलविहार चाललेले पाहिले. वीजपुरवठा सर्वकडें पाहिला. रस्ते बहुभागांत डांबरी व डोंगराळ भागांत दगडा पाहिले. रोम शहर १२-१५ ला दिसले. विमानतळांवर उतरलो. मोटारींतून रोम शहराकडे निघालो. रोम शहर विमान तळापासून ३० K. M दूर आहे अगदी द्रुत गतीनें जाणारी मोटार होती. तरीसुद्धा शहरांत येऊन पोहोंचायला ४५ मि. लागली. पण वाटेंत रोमचे अवशेष विमानतळापासून ते गांवांत सुद्धां सर्वकडें पहायला मिळाले. पुरातन रोमचा केव्हडा विस्तार होता याची कल्पना यावरून आली.

सर्वप्रथम आज व्हिक्टर इमॅन्यूअल II नें बांधवलेले विजय स्मारक (मॉन्यूमेंट) पाहिले. ते १७-१८ व्या शतकांतले असल्यानें उत्तम अवस्थेंत आहे. सर्व इमारत पांढऱ्या संगमरवरामध्यें असून विजय देवतेचा व व्हिक्टरचा पुतळा ब्रांझमध्यें बनवलेला आहे. या मान्युमेंट वरून सर्व नगरी दिसते. नगरीचे अवलोकन केले व कोठें कोठें पहाण्याच्या इमारती आहेत याचा अंदाज घेतला.

सर्वचकडें रोमन बांधकामाचे अवशेष विखुरलेले आहेत. आधीं फोरम पहायला गेलो. फोरमची कल्पना अत्यंत अपूर्व वाटली. अंड्याच्या आकाराप्रमाणें ७ मजली इमारत आहे. तळमजल्या

पासून वरपर्यंत दुकानें, कचेऱ्या व इमारती एकाच गोलाकृती इमल्यांत आहेत. व्यापार, उद्योग, सामाजिक राजकीय संस्था सर्व कांहींची व्यवस्था या फोरममध्यें केलेली होती व हे फोरम ५ व्या शतकापर्यंत उत्तम स्थितींत होते म्हणें ! पुढें परकीय आक्रमकांनी हे बरबाद केले म्हणें ! कल्पना फारच आवडली व इमारतींचा बराच भाग अजून कल्पना करण्याच्या स्थितींत असल्यानें पाहण्यांत फार वेळ घालविला. हे शहराच्या अगदी मध्य भागीं आहे व मोठमोठाले बारा रस्ते या फोरम पासूनच जातात.

नंतर रोमन अवशेष पहायला गेलो. राजसभा, राजवाडा, चर्च, स्नानगृहे, नाटयगृहे, अशी सर्व एकत्रित असून त्याच्या दक्षिण व उत्तर दोन्हीं बाजूंनी विजय कमानी बांधवलेल्या आहेत. दोन्हीं कमानी अजून शाबूत असून बाकीच्या इमारतीचे कांहीं संगमरवरी खांब तेव्हडेच मधे मधे उभे असलेले दिसतात. कोठें कोठें नक्षी कलेचे भग्न अवशेष पहायला मिळतात. सर्व व्यवस्था सुंदर आहे. मुख्य म्हणजे सर्व बांधकामाला तळघरें आहेत. गटारे भूमीगत असल्याचे प्रत्यक्ष पुरावे आहेत. जागोजागीं लहान लहान विहिरी आहेत. यावरून ज्या प्रमाणें विजय नगराचे अवशेष पाहून तेथील राजधानीच्या बांधणीची कल्पना करतां येते, त्याचप्रमाणें येथील बांधकामाची कल्पना करतां येते. जवळ जवळ ३ तास हा भाग पाहण्यांत गेल्यामुळें भरपूर शीण आला.

नंतर सेंट मार्कस्चे चर्च पाहिले. बाजारांत थोडे फिरलो. रेल्वे स्टेशन समोरील चौक फारच भव्य व विशाल आहे. बसेस ट्रॉली-बसेस, ट्रॅम, अंडरग्राऊंड रस्ते सर्व व इतर वाहनें या सर्वांचेच ठिकाण हे आहे. शिवाय लोकांना बसायला छोटीशी पार्क पण आहे. त्या मुळें हा भाग फार विशाल वाटला इतका विशाल चौक मला युरोपांत इतर कोठेंच पहाला मिळाला नाहीं.

आज सकाळी प्रथम नाष्टा आटोपला. ते बसनें व्हेटिकन सिटीकडें निघालो. रोमच्या राज्यांतील ही व्यवस्था फार छान आहे. सर्व भक्त मंडळींना बसण्याठीं, विश्रामासाठीं निमगोलाकृती असा खूप मजा असा मंडप बांधलेला आहे. मंडपाचे खांब गोल व खूपच रुंद अप आहेत. बरेच लोक पोपच्या निवासस्थानाकडें निघाले होते. मीही तेथें गर्दीत उभा राहिलो आंत गेलो तो गव्हर्नरचे ऑफिसात. मला कांहीच माहीत नाहीं, कुणाची भाषा कळत नाही. हे गव्हर्नर रो. कॅथॉलिकानें पोपच्यातर्फे म्हणून लेखी संदेश देत होते. माझी पाळी आली, मी इंग्रजीत म्हटले मी भारतीय आहे. व मठ पहायला आलो. वंदन केले. त्यानी मला संदेश कांहीं दिला नाहीं पण पॅलेस, सें पीटर चर्च, व म्यूझियम पहा असें म्हटले. पॅलेस कांहीं तितका चांगला नाहीं. बाग मात्र फारच उत्कृष्ट आहे. मात्र सध्याचा पोप जॉन हा बराच लोकप्रिय आहे असें कळले. कारण आम्ही पहाण्यासाठीं फिरत असतां कांहीं इटालियन लोक बोलत असता एकले. हा पोप लोकांत मिसळतो. चर्चमध्यें स्वत: लोकांसमोर येतो. प्रसंगी गोरगरीबाना भेटतो वगैरे वगैरे. एकूण पोपनेंहि हा काल ओळखला आहे हेहि बरेच म्हणावे ! बाकी ज्याला राजशाही वैभव अनुभवायचा हक्क आहे व केवळ जगाला संदेश देण्याचे काम त्यानें जनता उन्मुख कां व्हावे ? पण नाहीं त्यानीही कालाचा ओघ ओळखला आहे हे ऐकून मला जरा बरे वाटले.

पॅलेस पाहिल्यावर सेंट पीटर कॅथड्रल पहायला गेलो. शेंकडो मंडळी पहायला आलेली. चर्च तरी सर्व संगमरवरी. सोनेरी मुलाम्याचा चित्रे व नक्षी चौकटीनें भरून गेलेले ! जगांत सर्वांत विशाल असे हे एकच चर्च आहे. या इमारतीत आतापर्यंत झालेल्या सर्व पोपाच्या प्रतिमा बसविल्या आहेत. नंतर पोपचा खजिना पहायला गेलो. तिकीट २ रु. पण पोपचा तो धर्मदंड पूर्ण सोन्याचा व क्रॉस व चक्र रत्नजडित त्याचा तो हिरे माणिके, पाचू आदि रत्नांनी सुशोभित असा मुकूट सोन्याच्या जरांची नक्षी व रेशमी

झग्यावर रत्नें गुंफलेला त्याचा तो झगा उपरणें वगैरे सर्व पाहून डोळे दिपून गेले. किती किंमती रत्ने गुंफलेला हो पण कांहीही म्हणा मी येथें असंख्य रत्नें जरी पाहिली तरी कोहिनूरची चमक कशांतच नाहीं. कोहिनूर हा भारताचा हिरा म्हणतो असे नाहीं खरेच तसे आहेच ही जगमान्य गोष्ट आहे. त्यानंतर पोपचे पूजा साहित्य वस्त्रे वगैरे सर्व पाहिलो. त्यानतर सें. पिटरचा वरचा भाग पहायला शिखरावर गेलो. हे शिखर सर्व रोम मध्ये उच असल्यानें येथून सर्व शहर पाहून घेतले. तसेच आजचा हा माझा युरोप प्रवासाचा शेवटचा दिवस असल्यानें शिखरापाशीच एका फोटोग्राफर कडून शिखराच्या पार्श्वभूमीवर एक फोटो काढन घेतला (जत्रेतला फोटो) कसाबसा निघाला पण ५०० लिराना ६ प्रती. तेथेच थोडी विश्रांती घेऊन खाली उतरलो १ वाजला होता पोटांत भूक लागलेली पण जेवणाकडे लक्ष द्यावे तर म्युझियम २ वा. बद होते म्हणून ऐकलेले त्यामुळें पोटाकडे दुर्लक्ष केले व ३०० लि. देऊन म्युझियममध्ये गेलो.

सर्व ठिकाणी पाहिलेली तीच तीच चित्रे येथेहि आहेत. धार्मिक चित्रेच तीही! त्यामुळें मला याचे फारसे नवल वाटले नाहीं. वाचनालय फार मोठे आहे तेहीं धर्मग्रंथाचे व इटालियन भाषेत मला काय कळायचे? कांही पुस्तके, अलंकार, जुनी वस्त्रें, जुने पूजा साहित्य वगैरे आहेत पण मी ज्या मोठ्या उत्सुकतेनें म्युझियमकडे आलो होतो ती उत्सुकता पार विसरूनच गेलो म्युझियम अगदीच क्षुल्लक आहे. पोपचे धार्मिक साम्राज्य केवढे आहे याचे नकाशे आराखडे वगैरे सुद्धां येथें व्यवस्थित पहायला मिळाले नाहीत निराशा झाली असमाधान झाले. पोटानें आपले घोडे पुढे दामटायला सुरूवात केली पोट अगदी कळवळून आले पण जवळ म्हणजे १ मैलावर रेस्टॉरेंट नाईलाजानें कसे बसे चालत गेलो तर तेथें १ ब्रेड व्यतिरिक्त कांहीं शिल्लक नाहींच तेवढोच ब्रेड घेतली व एक स्पेशल चहा मागविला तेवढे घेऊन पोप राज्याला राम राम ठोकला.

नंतर आलो सम्राट हॉडियन यानें बांधवलेला सेंट एंजिलो या नांवानें ओळखला जाणारा किल्ला पहायला. हॉडियन हाच रोम साम्राज्याचा प्रधान शिल्पी व यानें तो दुसऱ्या शतकांत बांधवला. किल्ला गोलाकृती असून किल्यांत किला ! वर बाले किल्ला ! चोहोंबाजूनी तट, तटाखालीं खंदकपाणी सर्वव्यवस्था असून किल्यांतून पोपच्या मठापर्यंत जाण्या-येण्याची गुप्त भूयारी रस्ता आहे. बांध कामाच्या कल्पकतेची कमाल आहे. सर्व बांधकाम दगड व विटा यांचेच आहे. त्या काळीसुद्धां गुलामाकडून ओढली जाणारी लाकडी लिप्ट तयार केलेली आहे ती पाहिली. तळघरे, बंदीखाने, कत्तल खाने, दारुखाने, महाल वगैरे सर्व व्यवस्था अगदी आटोपशीर अशी या किल्यांत आहे एका रखवालदाराला कांहीं विनती करून व नंतर थोडी खुशी देऊन राजानें बांधलेला गुप्त कैदीखाना, कत्तलखाला, दारूखाना व भूयारी रस्ता वगैरे महत्वाच्या गोष्टी पहायला मिळाल्या किल्याचा व्यास अदाजे १००० यार्ड भरेल फार तर पण बांधणी वगैरे फारच छान, सुमज्य व आटोपशीर अशी आहे. १६००-१७०० वर्षे होऊन गेली तरी इमला अजून किती तरी शाबूत स्थितीत आहे आता तर इटली सरकारनें जागोजागी याची डागडूजी करून त्याचे पूर्वीचे स्वरूप शाबूत ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. एवडे पहायला तिकाट २५० वि. पण किल्ला पाहण्या लायक वाटला. टायब्रिस नदीच्या काठावर पूर्वी या नदीचेच पाणी किल्याच्या खदकात फिरवलें होते. आता सर्व बाजूनी पूल व रस्ते झाल्यानें किल्ला पूर्णपणें हम रस्त्यावर आलेला आहे. येथ पर्यंत ४॥ वा. व तसाच चालत स्पॅनीश स्टेप्स पहायला गेलो.

५ व्या ६ व्या शतकांत फार विशाल व भव्य अशा पायऱ्या बांधलेल्या आहेत. एका चर्चच्या या पायऱ्या पण पायऱ्यांची रूंदी अदाजे १०० यार्ड व उंची १०० फूट तरी आहेच फारच भव्य दिसतात व स्पॅनिश लोकांचीही वास्तूकला उच्च स्वरूपाला पोहोचलेली होती याची कल्पना करता येते. चर्चहि छान आहे. पणया पायऱ्यांच्या भव्यतेपुढें चर्चकडें व मनोऱ्याकडें कोण लक्ष देतो. म्हणतात

ना 'बिजापूरमें बिजारवाले हजार' येथें अनेक उत्तमोत्तम चर्चे मनोरे, स्मारके असताना या चर्चकडे कोण लक्ष देणार? हे येवढे पाहीपर्यंत पावसानें आपले अस्तित्व दाखवायला सुरवात केली. गेले आठ दिवस सर्वचकडे (झूरीच पासूनच) कडक उन्हाळ्याची सुरवात झाली होती. मी उन्हाळी भागांतील असूनही मला येथील हे ऊन असह्य वाटत असे. व आज सकाळपासून निसर्ग बदलला व आकाश मेघाच्छादित झाले. सायंकाळी तर तासभर पाऊसच झाला मी कसा बसा पळापळी करून बस गाठली व हॉस्टेलकडे आलो.उद्या पहाटे ५ वा. हॉस्टेलमधून जायला परवानगी मिळण्याबद्दल हॉ. वार्डन बरोबर खूप रदबदली केलीपण ती कोठे ऐकायला? म्हणाले स्टेशनवर रात्री जावा अथवा आज रात्री एखाद्या पेन्शनमध्यें झोपा. येथे खिशाला कुणाच्या चाट बसते ह्याचे त्याला काय? "हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवायला कुणाचे काय जाते?" मी म्हटले बरे बाबा दोन दिवस रोमसारख्या महागडया शहरांत मला स्वस्ताओचो जागा दिलीस हे काय कमी उपकार केलेस मजवर? जेवण घेतले बांधाबांध केली व सामान घेऊन वार्डनला रामराम करून स्टेशनाकडे आलो स्टेशनांत क्लोकरूममध्ये सामान ठेवले व कोठे स्वस्ताओचे पेन्शन (लहान हॉटेल) मिळतेका पहावे म्हणून चौकशी सुरू केली कमीत कमी दर १ रात्रीला १५०० लि. येवकच झालो. विचार सोडले व स्टेशन जवळच Y M. C A. Hostel आहे तेथें गेलो त्यांचें कडे म्हणे तीन बेडचो १ रूम असून त्याला १ रात्रीला १००० लि. द्यावे लागतील मी तर हा मार्गच सोडला व आजची रात्र Air Termins वर काढायची ठरविले. चांगले गादीचें कीच आहेत म्हटले खूप लिहावे वाचावे, थोडीशी झोप शक्य तर घ्यावी असा विचार करून निघालो तो एका सिनेमागृहात 'पूर्व बर्लिनर' East Berliner नांवाचा सिनेमा लागलेला पाहिला भाषा इटालियन २०० लि. दिले व आंत जाऊन बसलो सिनेमा संपल्यावर संवाद गाणी व नाच आदी खूप बहुरंगी भाषिकांत तेवढयाच तिकीटांत पहायला मिळाले अंदाजे ११॥ वा. पर्यंत मनरंजन झाले.

मायदेशी परत.

ठरल्याप्रमाणें ठीक ८॥ वा. रोमहून विमान सुटले. केवढे ते रोमचे विमानतळ! जगाच्या पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर सर्वकडें जाणारी विमाने येथें थांबतातच. हे विमानतळ मी पाहिलेल्या तळा पेक्षां फारच मोठें. याचे एकूण २० प्लॅटफॉर्म वीसमार्गांसाठी वेग-वेगळ्या दिशेने जाण्यासाठीं येथील सर्व व्यवस्था स्वयं चालीत! माझे विमान १३ व्या प्लॅटफार्मला लागलेले होते. न्यूयॉर्क ते टोकीयो हा त्याचा प्रवास मार्ग. TWA चे ते 707 Boing होते. माझ्या प्रवासाचा हा शेवटचा टप्पा तो मी बुओंगनेंच प्रवास करावयाचा ठरविला होता. त्याप्रमाणें मला बुओंग विमान मिळालेहि. बर्लीन ते लंडन मी P. A.A. च्या बुओगनेंच गेलो होतो. विमान ठरल्या वेळेला आले. १५० च्याही वर ज्यांत बसायची व्यवस्था त्यांत आम्ही फारतर ७५-८० प्रवासी होतो. अत्यंत उत्कृष्ट असे हे विमान रोमवर जे उड्डाण झाले ते इतक्या उंचावर गेले कीं या जगाचा व आमचा संबंध तुटलाच असे वाटले. पण तसे झाले नाहीं. रोम ते देहरान मार्गावर ग्रीसजवळ आल्यावर अथेन्स नगरावरून विमान जात असतां ते कमी उंचा वरून चालविण्यांत आले व विमानांतील गाईड-मार्गदर्शकानें अथेन्स शहराची माहिती द्यावयास सुरवात केली.

मी यापूर्वीच अथेन्स शहर पाहिले होते. परत एकदा हार्डीयन पॅलेस व ग्रीक संस्कृतीचे अवशेष पहायला मिळून मला आनंद तर झालाच शिवाय हा रस्ता जणूं वहिवाटीचाच आहे असे वाटले. माझ्या बाजूस बसलेल्या एका प्रवाशाला मी म्हटले " मी हे सारे पूर्वीच पाहिले आहे ' त्यानें माझ्या प्रवासाची माहिती विचारली मी माझ्या वर्तुळाकार प्रवासाचे वर्णन करून सांगितले. त्याला त्याचे कौतुक वाटले. ग्रीस देश ओलांडल्यावर आमचे विमान परत वर चढले.

ज्यू लोकांचा इझरेल देश आल्यावर थोडे खाली आले व आम्हाला ज्यूंनी लोकांनीं नंदीचा प्रवाह परतवून एक दिव्य करून आपला देश फळाफुलांनी कसा सुजलां, सुपलां करून टाकला आहे याचे विहंगम दृश्य पहायला मिळाले. त्यावेळी माझे ज्यू दोस्त यहुदा, मायकल यांची आठवण झाली. यहुदाचे तर आग्रहाचे आमंत्रण आहे पण त्याचेकडें जाण्याचा कांहीं योग दिसत नाहीं तरी मित्राचा देश पाहून समाधान मानले. परत विमान वर गेले ते देहरान विमानतळावर एकूण ३ तास प्रवासानंतर उतरले. अरबी लोकांचा हा देश. अितका भयंकर उन्हाळा व उष्ण वाऱ्यानें वाळू इतकी जोरांत उडून अंगाला झोंबत होती! कशाला एअर कन्डिशन विमानांतून उतरून सरबत घ्यायला हॉटेलकडे गेलो असे एकदा वाटले. पण उतरल्याशिवाय हा अनुभव कसा प्राप्त व्हायचा? एवढ्या अनुभवाऱूनच येथील जीवन किती कष्टसाध्य आहे? याची कल्पना आली. भयंकर गरीबी अनुभवाला आली. या विमानतळावर ½ तास विश्रांती घेऊन विमानांत बसलो, विमान सुटले. विमानांत आम्हाला जेवण देण्यांत आले आणि हां हां म्हणता सायंकाळ झाल्याचे वाटूं लागले. रोम ते मुंबई येतांना ६ तासाचा एकदम फरक अनुभवास आला. आम्ही सकाळीं ८॥ वाजतां सुटलो, ९ वा. मुंबईस आलो पण प्रत्यक्ष ६॥ तासच विमानात होतो. बाकीचा वेळ वजावाटीचा! काय मजा आहे पहा! त्यांत हवा फारच छान असल्यानें विमानाची गती साहजीकच वाढली व ते २० मि. ठरल्यावेळीं आधी मुंबईस आले. मुंबई जवळ आलीं व ढगाळ हवा पाऊस सुरू झाला. मुंबईत त्यावेळी रात्रीचे ९ वा. होते. सर्व शहर वीजमय असूनही पावसामुळें तो अंधूक अंधूकच दिसत होता.

एकदाची मुंबई सुखरूप गांठली. मोटार व्हॅनमधून विमान तळाच्या कस्टम ऑफीसात आलो. बरोबर एक रेडियो होता त्याची जकात द्यायला पैसे नव्हते व मला उतरवून घ्यायला येणारी मंडळी तरी कोठे दिसेनात आमचे विमान सुमारे अर्धातास आधी आल्यानें ती मंडळी वेळेवर येऊ शकली नव्हती. एका भारतीय

सहप्रवाश्यानें मला जकातीएवढे ७५ रु दिले. मी त्याला ते पैसे नंतर परत दिले. बाहेर येतो तोंवर आमची सर्व मंडळी माझी श्रीमती, मुलगा, भाऊ, सर्वच मजकडे धांवत आले. हारतुरे गांठी भेटी कडकडून झाल्या, फोटो झाले. कांही वेळ बोलणी झाल्यावर आम्ही श्री बलराम कुंदरगी यांचेकडे गेलो. ता. ७, ८, ९ मुंबई, नाशिक, पुणे असे राहून ता. १० ला जमखंडीस जायचे ठरविले. त्याप्रमाणें जमखंडीस कळविलेही. अत्यंत द्रुत गतीच्या विमानानें गेले तीन महिने फिरणारा मी, आतां गाडी मोटारीनें सट्टखुट्ट प्रवास सुरू झाल्यावर कसेसेच वाटूं लागले. परदेशांत मोटारीचा प्रवास सुद्धा सरासरी ४० मैलाचे गतीनें सहज होतो. पण मी माझ्या देशात आलो हे विसरून कसे चालेल ? प्रवासांत माझी कोठेंच खोटी झाली नाहीं वा विलंब झाला नाहीं. पण कुडची जमखंडी रस्त्यावर मात्र रोड वायडनींगच्या फंदांत P. W. D. ने कच्ची सडक केल्यानें व त्यावर पाऊस होऊन सडक मऊ झाल्यानें आमची S T बस घसरून कलंडली. सुदैवानें दुखापत कुणालाच झाली नाहीं. शेवटपर्यंत प्रवास सुखरूप होऊन अगदी कांठ लागल्यावर बुडायचा प्रसंग, पण वांचलो. अपघातांतून वर येऊन मार्गांत यायला ६ तास लागले, जमखंडीत मला उतरवून घ्यायला येणारे लोक माझी वाट पाहून पाहून कंटाळले. एकदाचा १२ वा. मोटार जमखंडीला आली. मला भेटायला आलेल्यांची खूप गर्दी झालेली. स्टँड भरला होता. उतरलो, फोटो झाले. मित्रमंडळीबरोबर प्रवासाच्या गमती बोलणी झाली. येणेप्रमाणें जमखंडीहून सुरू झालेला प्रवास जमखंडीस पूर्ण झाला.

ग्रामीण-जीवन.

युरोपचा प्रवास कसा झाला याबद्दल मी लिहले पण तेथील जीवन कसे आहे ? त्यावरील माझा अभिप्राय मी व्यक्त केला तर वाचकांना जास्त स्पष्ट कल्पना येईल म्हणून युरोपांतील ग्रामीण व नागरी जीवन यांवर एक दोन शब्द लिहावें असे वाटले.

युगोस्लाव्हिया देशांतीलच ग्रामीण-जीवन पडताळून पाहण्याचा मला योग आला. हा देश युरोपांतील इतर देशाहून मागासलेला आहे. तरीपण तेथील खेडी व आमचे कडील खेडी यांत जमीन अस्मानाचा फरक वाटला. ग्रामीण जीवनाचे केंद्रस्थान म्हणजे घर, तिकडे आम्ही वळूंया. जवळ जवळ सर्व खेड्यांतून वीज आलेली आहे व पाण्याचे नळ आलेले आहेत. त्यामुळे जळणासाठीं लाकूडफांटा, शेणकुटें जाळून चूल पेटविणें तेथे नाहीं. विजेच्या शेगड्या अथवा गॅसच्या शेगड्याच कोठेही पहायला मिळतील. त्यामुळें अस्वच्छतेचे साम्राज्य घूर, जळमटे, व म्हणून लोकांचा कळकटपणा तेथें पहायला मिळाला नाहीं. येथें चूलीचे कामच कमी आहे. ब्रेड बेकरींत तयार होतो. दूध डेअरीमधून तापवून थंड होऊन तयार होऊन येते, मांस तयार होऊन फॅक्टरींतून येते, चुलीचें काम फक्त चहा, कॉफी करणें, सूप करणें, मांस व पाव भाजणें अथवा तेलांत भाजणें हे असले काम वीजेच्या शेगड्यानी होते. भाज्या बहुतेक कच्याच खातात, भाताचे नाही, पुरण पोळ्या, श्रीखंड, बासुंदी आदी खाद्यांचे नांव नाहीं. त्यामुळें स्वयंपाक हे मोठे काम तेथे फार हलके झ'लेले आहे. कोणतीही खाद्य वस्तू खेड्यांतसुद्धा दुकानांतून मिळते. थंडी पासून बचाव होण्यासाठीं मात्र रात्रीचे वेळी खोल्या खोल्यातून विजेच्या शेगड्या पेटवून जरूर तेवढी ऊष्णता केली जाते.

पाण्याचे नळही सर्वंकडें आहेत. म्हणून जिकडे तिकडे सांड पाणी पडून घाण झालेली दिसली नाहीं हे कसे ? हा प्रश्नच आहे. आमचेकडें सांडपाणी पडले की घाण झालीच. तेथे खेड्यातील

प्रत्येक घराभोवती बाग मिळेल त्याजागेंत भाजीपाला, फळे, फुले आढळतील त्या झाडानाच सांडपाणी फिरवलेले असते. लोक आप आपल्या दडींत शेतकाम मोठ्या हौसेनें करीत असतात. अंडरग्राऊंड ड्रेनेज खेड्यांतून नाहीच पण कांहीं ठिकाणी सांडपाण्याचे खंदक आढळले. गांवात घाण निर्माण व्हयचे दुसरे कारण म्हणजे संडास. आमचेकडें गावच्या प्रवेश रस्त्याच्या दुतर्फा मैल्याची घाण कायम असते. युरोपातील खेड्यांत हा प्रकार मुळीच पहायला मिळणार नाहीं. एकतर खंदकी सडास सर्वंकडें आहेत. किंवा सेप्टिक टँक्स सडास आहेत. लहान लहान मुलेसुद्धा रस्त्यावर बसत नाहीत त्यांची सोय घरांतच किंवा संडासांत केलेली असते. मुत्रोलाही इकडे तिकडे बसायचा प्रघात कोठेच आढळला नाहीं. घरोघरी मुत्र्यांची व्यवस्था असते व लोक त्याचाच उपयोग करतात.

रिकामे लोक क्वचितच मिळतात. बायका पुरुष सर्वंच मिळून शेतकामांत किंवा जवळपासच्या कारखान्यात कामाला जात असतात तीन त्रिकाल कामाची गडबड आढळते. त्यामुळें " हरटी कट्टी गप्पांचा चौक " आमचेकडे जसा आढळतो तसे कोठेच पहायला मिळाले नाहीं. तेथें नाचांचे चौक किंवा सार्वजनिक नृत्यालये मात्र गल्लो गल्ली आढळतात. रोज रात्री जेवण झाल्यावर स्त्री पुरुष आपला परका भेद विसरून एकत्र गाणी म्हणणें नाचणें हा रोजचाच सामाजिक कार्यक्रम असतो. कोणीही कुणाच्याही हातांत हात घालून नाचण्यात, गाण्यात गर्क झालेला असतो. व हा सामाजिक आनंद लुटत असतो. मी माझ्या मित्राबरोबर दोन ठिकाणी गेलो असता मलाही त्या लोकानी बोलावून घेतले. हातांत हात घातले. नाचायला सुरवात केली गाणी त्यांच्या भाषेतील ऊंच स्वरांत गायची. समूह गीते ती. नाचण्यानें खूप आनद निर्माण होतो. हा कार्यक्रम रोजचाच असल्यानें नाच हा तेथील जीवनाचा आत्मा आहे असे म्हणावे लागते. पण भारतीय संगीत व नृत्य याशी त्याची तुलना केल्यास ते कमकस वाटते पण आमची विद्या सामान्यांना अवगत

होण्यास कठीण. त्यांची नाच गाणी सर्वसामान्यांचीच. हा भेद आहे. मद्यपान सर्रास आढळते. पण आमच्या सारखा अतिरेक क्वचितच आढळतो. दुपारच्या जेवणात, सायंकाळच्या जेवणांत व नंतर ह्याच मद्यपानाच्या वेळा ! आमचेकडे अतिरेकी मद्यपान हे मोठेपणाचे लक्षण. त्याशिवाय प्याला आहे असे लोक म्हणत नाहीत अशा कांही खूळचट कल्पना आहेत.

खेड्यांतून व्यापार, उद्योग हा खाजगी मालकीचा क्वचितच आढळतो. सघ संस्थांचीच लहान मोठी दुकानें आढळतात. त्यामुळें व्यापारांत लांडी लबाडी कमीच खाद्यपदार्थांच्या दुकानीं भाजीपाल्या पासूनचे अन्नधान्यापर्यंत सर्व वस्तू मिळतात " घरोघरी स्वयंपाक " हा विषय तेथें अगदी सामान्य आहे. कारण मांस लोणची मुरबे सर्वच विकत मिळतात त्यामुळें बाजारांतून कांही विकत आणायचे व मग त्याचे नीट करणें, पाखडणें, दळण, कांडण, मीठ, मीरची, फोडणी ही भानगडच नाहीं. त्यामुळें कितीतरी व्यवहार आपोआपच बंद पडलेले आहेत. त्यामुळें घरकाम हे आमच्या इतके गुंतागुंतीचे राहिलेले नाहीं. दुकानांतून वस्तू आणायची फारतर गरम करायची, चहा कॉफी करायची. झाले याव्यतिरिक्त स्वयंपाकाचे काम नाहीं.

कांदा, लसूण मिरचीचे मात्र स्वयंपाकघरांत कोठेच स्थान असलेले मला आढळले नाहीं. एका खेड्यात मला चुकून एक बोंगी मिरची दिसली. मी ती घेतली व खावू लागलो तर अनेक लोक माझ्याकडें टकमक बघू लागले. याचे उलट आमचेकडें कांदा लसूण तर आमचा मूळ मसाला !

खेड्यांतूनसुद्धां वैचारिक जागृति फार आढळली. मी भारताचा. भारताचे प्रधान नेहरू (नेहरू) यांना तिकडील सर्वच लोक ओळखतात. कोठेंहि जावो, तेथील ग्रामीणांना भेटलो म्हणजे ' नेहरू ती तो जीवियो, दोन्नो दोन्नो ' असें ते लोक म्हणून हस्तांदोलन

किंवा आलिंगन देत आपल्या देशांतील घडामोडी, राजकारण याबद्दलहि जनसामान्यांना आसक्ति फार. वर्तमानपत्र वाचायची आवड कमालीची पाहिली. आमच्याकडें कोणी मेले, विहिरींत पडले, जळून मेले, चोरी झाली असल्या बातम्यांचे आकर्षण फार, तर तेथील वृत्तपत्रांत राष्ट्रीय क्षेत्रांतील मजकूर फार. देश लहान. त्यामुळें हें असें होत असेलहि.

शहरी पेहराव व ग्रामीण पेहराव यांत इकडे कमालीचा फरक आढळतो तो मात्र आम्हाला तेथें आढळला नाहीं. दोन्ही-कडील पेहराव जवळजवळ सारखाच वाटला. सौंदर्यप्रसाधनेंसुद्धां सर्वकडे सारखीच आढळली. तिकडील चामडीच गोरी आहे, त्यांना स्नो-पावडर कशाला असें समजूनच कीं काय, तिकडील बायका रोज रोज तेल-फणी, स्नो-पावडर करायचे कमी. केश फार तर बॉबकट केलेला. रविवार चर्च सर्व्हिसला जातेवेळीं अथवा विशेष नाच-गाण्यासाठीं सुगंध, अत्तरें लावून घेण्याची प्रथा जरूर असते पण आमच्यासारखे डोक्यावर 'तेलघाणें' कोठेंच पहायला मिळाले नाहींत. डोक्याला तेल फारच तुरळक लावले जाते. गरज काय? थंड प्रदेश, उन्हापासून मेंदूचे रक्षण करण्यासाठीं तेल लागते. तेथें तेवढी उष्णताच नाहीं. केस मात्र स्त्री असो, पुरुष असो, रोज धुवून साफ करून घेतात. स्नान २-४ दिवसांना सवडीनें केले जाई. पण हात, पाय, तोंड, डोके मात्र रोज स्वच्छ धुतले जाते.

घरें सर्वप्रकारची पहायला मिळाली, पण जमीनीवर बसणें, झोंपणें कोठेंच पहायला मिळाले नाहीं. खुर्च्या, स्टुलें खाटी याचा उपयोग सर्रास केला जातो. जेवणासाठीं टेबल मग ते साधेसुधे कां असेना, असायचेच. आळस हा इकडील खेड्यांचा विशेष, तर चुरचुरीतपणा हा तेथील विशेष!

युरोपांतील शहरें.

गलिच्छ पाण्याचा विचार जर सोडूनच दिला तर युरोपांतील शहरासारखी आमच्या देशांत मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली अशा शहरें आहेत. आमच्या शहरांतील लोकांना स्वच्छतेची जाणीव मुळींच दिसून येत नाहीं. मलमूत्र विसर्जन कोठेंही होते, कागद कपटे, सिगरेटची थोटके कोठेही टाकली जातात, त्याची कुणालाच कांहीं खंत वाटत नाहीं वा कोणी विचारत नाहीं युरोपांतील शहरांत असला घाणेरडेपणा कोठेच दिसून येणार नाही. लंडन, पॅरीस सारखी अत्यंत गर्दीची शहरे पण तेथेसुद्धा स्वच्छता कमालीची. रस्त्याच्या बाजूनें जागोजागी कचऱ्याच्या बंद बारड्या लावलेल्या. लोक बारडीचे झांकण काढून त्यांतच कचरा टाकायचे, जागोजागी मुताऱ्या, संडास (सेप्टिक टॅंकचे). लोक त्याचाच उपयोग करतात. खाकरणें, थुंकणें तर तिकडील लोकांना माहीतच नाही जसे कांही ! तेथील लोक कांदा, लसूण, मसाला खात नाहींत म्हणून कदाचित त्यांना खाकरणें थुंकणें आठवत नसेल. मलाही तीन महिने वरील प्रिय मसाले (अनावश्यक) मिळाले नाहीत व म्हणूनच कीं काय मीही हे दुर्गुण विसरूनच गेलो होतो.

चौकाचौकांतून रस्त्याचे मधोमध गप्पा मारत समूह करून उभे राहणे कोठेच पहायला मिळत नाहीं. जो तो आपआपल्या कामाच्या भाऊगर्दीतच असतो कामाशिवाय क्वचितच कुणी उभे असलेले दिसते. नागरी वाहतूकही भरगर्दीनें चालली असते पण कोठे गडबड, व्यर्थ विलंब अनुभवाला येत नाही. साऱ्या युरोपभर मोठमोठ्या शहरांतून भूमीगत लोकल रेल्वेगाड्यानें वाहतूक फार मोठ्या प्रमाणांत चालते. एखाद्या जमीनीतील बिळांतून मुंग्या-मुंगळे बाहेर पडावे तसे भूगर्भांतून लोक बाहेर पडलेले दिसतात. हे अंडर ग्राऊंड रेल्वेस्टेशनवर उतरून बाहेर येणारे लोक.

शहरांतील सर्व जीवन यांत्रिक असल्याचे वाटते. या शहरांतून आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे कम ताकतीची व कुशलतेची सर्व कामें स्त्रिया करीत असतात. रेल्वे, पोष्ट, तार, बँक वगैरे सरकारी, निम सरकारी कचेऱ्यांतून स्त्रिया काम करीत असलेल्या दिसतात. व्यवस्थापकीय कामे, जास्त ताकतीची कामे मात्र पुरुष करीत असतात. मोटारीताल कडक्टर स्त्रिया तर ड्रायव्हर पुरुष असेल, कारखान्यांतून कुसरीची कामे करणाऱ्या स्त्रिया. जास्त ताकतीची कामे, लेथवर्क, बॉयलर वगैरे कामे पुरुष करतात. प्रत्येक घरांतील स्त्रिया व पुरुष दोघेही कामावर असतात. त्यामुळें स्वयंपाक पाणी हे सर्व बंद. हॉटेलांतून जिन्नस आणणें व जेवणें. फार तर सर्व मिळून घरांत करायचे. घरोघरी सकाळची न्याहरी सर्व मिळून घेतली जाते. दुपारचे जेवण कोठेतरी हॉटेलमध्ये होते. रात्रीचे जेवण मात्र घरी सर्वांचे मिळून होत असते अथवा तेही कोठेतरी एखाद्या बागेतील सरोवरावरील हॉटेलात घेतले जाते.

शहरामधून सुद्धा नाचाचा शोक फार आहे. गल्लोगल्ली डान्सिग क्लबस् आहेत. नरनारी स्वयंस्फूर्तीनें एकेठिकाणीं जमून नाच करीत असतात. यांत आपला परका असा भेद केला जात नाहीं. नाच अवगत नसलेलाच ओशाळून बाजूला बसेल. तिकीट लावून पैसे देऊन ही नाचमंदिरे जागोजागी आढळतात. पॅरिसमध्येंतर असल्या नाचगृहांची रेलचेल आहे. रात्रंदिन हाच धंदा तेथे चाललेला असतो. तेथे प्रेक्षकांना पैसे देऊन जायला, प्यायला अवकाश असतो पण अशल्या क्लबमध्यें अंध आराम, मद्यपान, यालाच प्राधान्यदिले जाते.

एक सबंध आठवडा काम करून अखेरच्या सुट्टींत सहकुटुब सहपरिवार कोठेतरी सहलीला, पर्यटनाला अथवा वनभोजनाला, मनरंजनार्थ जाण्याचा प्रघात सर्व शहरांतून आढळतो. उन्हाळा म्हणजे जुलै, अगस्ट, सप्टेंबरमध्यें तर याला बहर आलेला असतो. कोणतीही बाग असो, तलाव, सरोवर असो, समुद्र किनारा असो अथवा पर्वत शिखर असो, सर्वंकडे कशी जत्रेची गर्दी लागलेली

असते. लोक हॉटेलांतून अथवा खुल्या जागेत लहान लहान राहुट्या घालून मजेंत राहिलेले असतात. पोहायला गेले तर सूर्य अस्त होई पर्यंत तेथेंच राहतील, तेथेंच खातील, तेथेंच विश्रांती घेतील परत पोहतील असे हे चालायचे.

काम मग ते फॅक्टरींतील असो वा कुठलेही असो, कसूर थोडी सुद्धा सांपडत नाहीं. यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणांत झालेले आहे. त्या प्रमाणांत यंत्राचे नियंत्रण करण्याइतकेसुद्धा मनुष्यबल नसल्यानें प्रत्येकाला आपल्या मर्यादेपेक्षाही जास्त डोळ्यांत तेल घालून काम विश्रांती न घेता, करावे लागते. यांत थोडीही हयगय होत नाही. घड्याळाच्या सेकंद काट्याच्या बरोबरीनें काम चालले असते. कामाची वेळ संपल्या सेकंदालाच सुट्टीही अनुभवली जाते. हेही तितकेच महत्वाचे. " कामाचे वेळी काम विश्रांतीचे वेळी विश्रांती यात कधीही कसूर व्हायची नाही.

आपण श्रेष्ठ, जास्त सुधारलेले ही भावना तिकडील सर्वच लोकांत जास्त प्रमाणांत वावरत असली तरी परकीयाबद्दल अनादर कधी दाखवला जात नाही. युरोपांतीलच छोट्या छोट्या राष्ट्रांत तशी थोडीफार तेढ आढळलेहि. पण दुसऱ्या खंडांतील लोकांबद्दल तसा अनादर नाहीं. उलट परकीयाकडून त्यांचे देशांतील माहिती विचारून घेण्यास लोक उत्सुक आढळतात. भारताबद्दल येथील जातींपातींच्या धर्मांधर्माचा भेद, येथील गरीबी येथील राजकारणा वर गांधी वादाचा पगडा (अहिंसा तत्व), येथील योग सिद्धी या बाबत कुतुहलानें विचारणा केली जाते.

सामाजिक क्षेत्रांत विनावेतन काम कोठेच पहायला मिळत नाहीं. सर्व कार्यकर्ते लहानापासून ते थोरापर्यंत केवळ पगारी. विना-वेतन काम करणें मानाचे, गौरवाचे येथे मानले जाते. युरोपांत याचे नांवसुद्धा नाही त्यामुळे सर्वच संस्थांची कामे कचेऱ्या चालल्या सारखी चाललेली असतात.

व्यापारांत सौदेबाजी (बारगेनिंग) फार कमी पहायला मिळते. मालाची किंमत मालावर लिहून ठेवलेली असते. माल घ्यायचा व कौंटरवर पैसे द्यावयाचे एकच काम. बहुतेक सर्वंकडें डिपार्टमेंटल स्टोअर्स, प्रत्येक प्रकारच्या मालाचे वेगवेगळी दालनें असल्यानें व अशी सर्व दालनें असलेली म्हणजे जीवनावश्यक वस्तू एकाच दुकानांत मिळणारी विशाल दुकानें फार आहेत. पैसे देणें घेणें, बेरीज वजाबाकी करणें, हिशोब ठेवणें सर्वच कामें कॅलक्यूलेटर, ट्रॅन्सीस्टराईज्ड कॅलक्यूलेटरिंग मशीनच्या सहाय्यानें केली जातात. त्यामुळें एका सेकंदात असंख्य सख्यांचा हिशोब होऊन जातो व त्याचा तक्तसुद्धा टाईप होऊन मिळतो. बँकांतून तर याचा उपयोग इतका केला जातो कि चलन बदलू घेण्यास चेकचे पैसे घेण्यास अगर भरण्यास एका मनुष्याला क्वचितच एखाद्या मिनिटापेक्षां जास्त वेळ लागेल, आमचेकडे इतके जलद काम जर झाले तर गिऱ्हाईकाला पैसे दिल्याचे घेतल्याचे समाधानच लाभायचे नाही. तो म्हणेल हजार रुपये भरले व अर्ध्या मिनिटांतच ?

व्यर्थ क्यू मध्यें जो वेळ जातो तो वाचविण्यासाठीं मनुष्य-बळाचा कमीत कमी उपयोग करण्यासाठीं जागोजागी सर्वप्रकारची स्वयंचलित यंत्रे बसविलेली आढळतील कांही यंत्रे अशी ॲटोमॅटिक ट्रॅफिक कंट्रोल सिग्नल्स्, लडनमध्येतर कांहीं भागात टेलिव्हिजनच्या सहाय्यानें रहदारीचा वर्दळ रेकार्ड होते व ट्रॅफिक सिग्नलस् मिळत असतात. रेल्वेस्टेशवर तिकिटांची यंत्रे, यंत्रात पैसे टाकायचे व तिकिट आपोआप बाहेर येते. सिगरेट, काडी, बिडी, चिरूट ची यंत्रे, यंत्रांत पैसे टाकायचे कीं अिच्छित वस्तू हातात येते. दुधाची यंत्रे. पैसे यंत्रांत टाकले कीं दुधाची बाटली व नळी हवी असल्यास ब्रेडसुद्धा आपोआप बाहेर येऊन मिळते.

अंडरग्राऊंड रस्त्याना जाण्यायेण्यासाठीं स्वयंचालित जिनें हाही एक गमतीचा भाग. नुसते जिन्यावर उभे रहायचे कीं इच्छित

स्थळीं आपोआप जाते. अशा अनेक गमती शहरांतून विशेषत: लंडन, पॅरिस, रोम, बर्लिन अशा शहरांतून पहायला मिळतात व यांचा दिवसाचे चोवीस तास एकसारखा वापर चाललेला असतो.

मोठमोठ्या चौकाखाली भूमीगत बाजार हेहि तिकडील वैशिष्ट्यच आहे. मोठमोठ्या चौकांतून पादचाऱ्यांना रस्ते ओलांडणें त्रासाचे असते म्हणून रस्ता ओलांडायचे मार्ग भूमीगत असतात. अर्थातच त्याच चौकाखाली प्रशस्त भूमीगत बाजार, विश्रांतीगृहें वगैरे बसवलेली सर्वकडे आढळतात. या भूमीगत बाजारांतील दुकानांची सजावट व शोभा इतकी डोळे दिपवून टाकणारी असते कीं रस्ता ओलांडण्यासाठीं मनुष्य भूमीगत मार्गांत उतरतो तो त्याला भानच राहत नाहीं व त्यांचे शॉपींग सुरू होते. या बाजारांत सर्व प्रकारच्या वस्तू, खाद्यपदार्थ, पेये वगैरे मिळतातच कांहीं ठिकाणीं तर वाचनालये सुद्धा आहेत. त्यामुळें एखाद्याला विश्रांती हवी असल्यास तेहि सहज साध्य असते.

फलश्रुती

सुखमय जीवनाची परमावधी किंवा ज्याला आम्ही स्वर्गसुख म्हणून मानत आलो आहोत तशीच जणू स्थिती युरोपीय राष्ट्रांत असल्याचा मला अनुभव आला. अशी ही परम स्थिती युरोपीय लोकांना प्राप्त झालेली आहे. तो त्यांच्या उद्योगी, संशोधक व जिज्ञासू वृत्तीचेच त्याना फल प्राप्त झालेले आहे हे कोणी विसरून चालणार नाहीं कामाचे वेळी भरपूर काम विश्रांतीचे वेळी मनसोक्त विश्रांती असेच त्या लोकांचे आहे. अेक अेक व्यक्ति आमच्या अेकाच्या चौपटीने जास्त राबते मग ते काम श्रमाचे असो का कलेचे असो वा बुद्धीचातुर्याचे असो.

याचे उलट आमची वृत्ती आहे. राबायचे वेळी सुद्धा चुकार-पणा करून कमीत कमी राबायचे व विश्रांती तर हवीच. आळस अगभर भरलेला व यांतच आम्ही आमच्या जीवनाचा आनंद लुटत असतो. जीवन आधी कष्टून समृद्ध करूया मग त्या जीवन सुखाचा उपभोग घेऊया अशी वृत्ती भारतीयांची व्हायला हवी.

आमच्यांत व त्यांच्यांत तुलनेनें फरक पाहायचे ठरवले तर जमीन आस्मानाचा फरक दिसून येईल. ते (युरोपीय-पाश्चिमात्य) प्रगतीशील विचाराचे भोक्ते तर आम्ही परंपरागत जुन्या सांप्र-दायिक विचारांतच घोटाळ्यांत परमसुख मानणारे. काम, उद्योग, हे त्यांना भूषणावह वाटते तर कमीत कमी काम करणें किंवा कामाविना काळ कंठणें यांत आम्हाला मोठेपणा वाटतो. सदा उद्योगाला माळ घालणारी लक्ष्मी दोघांच्याकडेही त्या त्या प्रमाणांतच आहे. त्यांनी आपल्या उद्योगशीलतेनें मृत्युलोक स्वर्ग लोकासारखा बनवला आहे तर आमच्या आळशी वृत्तीनें आम्ही मृत्यूलोकाखाली कोणता लोक आहे हे पाहू लागलो आहो.

प्रगतीच्या आड येणारे बंधन तोडून टाकून आपले जीवन विकसित करीत जाणारे ते लोक आज आपल्या प्रगतीच्या गतीनें काळाला मागे टाकायच्या स्थितीला येऊन पोहोचले आहेत तर आमची प्रगती नाना अडीअडचणी, वैचारिक, धार्मिक, सांस्कृतिक बंधनें, सांप्रदाय आदीनी जागोजागी अडवली जात आहे म्हणूनच आम्ही स्वतंत्र होऊन एक तर उलटले तरी आम्ही कोठे आहोत? असा स्वतःला प्रश्न विचारला तर निरुत्तर व्हावे लागते.

परदेश प्रवास करावा अशी लहानपणापासूनची सुप्त इच्छा ती अेकदा पूर्ण झाली. पाश्चिमात्य राष्ट्राबद्दल खूप वाचले होते, अैकले होते, ते प्रत्यक्ष पाहायला मिळाले; अनुभवायला मिळाले. युरोप म्हणजे वेगवेगळ्या विचारसरणींचा, आधारांचा सुसंस्कृत लोकांचा अेक संग्रहच वाटला. त्यांच्या सहवासानें त्यांच्या बरो-

बरच्या चर्चेने, त्यांचे जीवन त्यांच्यांतच राहून न्याहाळायला मिळाले. मी खूप बहुश्रुत झालो. जीवनाविषयीचा मला नवा जीवन दृष्टीकोन प्राप्त झाला. वृत्तीतील कर्मठपणा पूर्ण नाहींसा झाला. नव्या विचाराशी समरस होऊन तो विचार पडताळून पाहून योग्य वाटल्यास तो आत्मसात करून घ्यायची प्रवृत्ती झाली. प्रत्येक गोष्ट ती परकीय आहे म्हणून न सोडतां त्यांत चांगले काय आहे ते घ्यायची वृत्ती वाढली. विश्वबंधुत्वाचे विचार माझ्या मनांत वाढू लागले व ही कल्पना रम्य वाटू लागली व हा विचार आचारांत आणण्यात आनंद वाटू लागला.

या प्रवासाने बरेच परदेशी मित्र मला मिळाले. अर्थात यांतील कितीनां मी पुन्हा भेटू शकणार किंवा ते केंव्हा आमच्या देशांत येणार? हा अेक प्रश्नच आहे. तरीसुद्धा मैत्री मात्र कायम राहील. अेकमेकांना वरचेवर पत्ररूपे भेट, विचारांची देवघेव होईल व जमीनीचे व वेळेचे अंतर जरी वाढत गेले तरी विचारानें स्नेहाने आम्ही जवळ जवळच येऊ लागू असे वाटल्यावाचून रहात नाहीं.

या माझ्या प्रवासाने पैशाच्या दृष्टीनें; नोकरी धंद्याच्या दृष्टीनें; असा कोणताही लाभ मला आपेक्षित नव्हता व तसा कोणताच फायदा झाला नाहीं. माझ्या राजकीय, सामाजिक जीवनातही मला अेखादा फ़ायदा होईल असे मला वाटत नाही. प्रवास संपवून परत आल्यावर माझ्या अेका स्नेह्याने विचारले "पदर मोड करून प्रवास करून आला आता तरी इच्छा पूर्ण झाली का? मी उत्तरलो आता कुठे निम्मे जग पाहिले. उरलेले निम्मे जग पाहायची इच्छा केंव्हा पुरी होते हे पाहणार आहे.

जय-हिंद जय-जगत.

दि. ६-९-१९६१ रोजीं रात्रीं ९-३० वाजतां T. W. A. Boeing 707 या विमानानें मी माझा प्रवास संपवून मुंबईस सांताक्रूज विमानतळावर उतरलो. विमानतळावर मला उतरवून घेण्यासाठीं माझी पत्नि, मुलगा, दोघे थोरले भाऊ व मुंबईचे माझे मित्रमंडळ व नात्यागोत्याची मंडळी आलेली होती, त्यावेळीं घेतलेला फोटो.

फोटोत डावीकडून श्री. के. के. कुलकर्णी, श्री. राम जोग, श्री. किशाभाऊ आपटे व उजव्या बाजूस अनुक्रमें श्री. बलराम कुंदरगी, श्री. बाबूराव वाटवे, श्री. वसंत कानेटकर, श्री. किशाभाऊ कडके दिसत आहेत. मधोमध आम्ही उभयता चिरंजीवासमवेत बाकीची आमच्या नात्यागोत्याची मंडळी.